सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, ०६ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २५२ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


### देवेंद्र फडणवीसांनी घेतली मुख्यमंत्रीपदाची शपथ

# राज्यात देवेंद्रपर्व सुरु!

## अजित पवार, एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्रीपदी

### पंतप्रधान मोदींच्या उपस्थितीत झाला सोहळा

मुंबई, ०५ डिसेंबर : महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी आज, गुरुवारी शपथ घेतली. राज्यपाल बी.सी. राधाकृष्णन यांना त्यांना पद व गोपनियतेची शपथ दिली. यावेळी फडणवीस यांच्यासह शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी देखील उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणारे फडणवीस हे महाराष्ट्रातील एकमेव नेते ठरले आहेत.

मुंबईच्या आझाद मैदानावर आयोजित या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदीं, भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रीयमंत्री, दिग्गज भाजपा नेते, चित्रपट अभिनेते, क्रिकेटपटू, उद्योगपती, आमदार, खासदार आणि हजारोंच्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. राज्यपाल राधाकृष्णन यांनी देवेंद्र फडणवीस यांना शपथ दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आगमनानंतर राष्ट्रगीत आणि महाराष्ट्र गीत गाऊन शपथविधी सोहळ्याला सुरुवात झाली. महायुतीमधील ३ प्रमुख नेत्यांचा शपथविधी झाल्यानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

या सोहळ्यास छत्रपती संभाजीनगर येथील विवेक देशपांडे हे देखील उपस्थित होते.



विधानसभा निवडणुकीत भाजपने देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात मोठा विजय मिळवला, महायुतीला राज्यात २३७ जागांवर यश मिळत स्पष्ट बहुमत मिळाले. त्यामध्ये, १३२ जागा जिंकमारा भाजप हा राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्यामुळे, भाजप नेताच मुख्यमंत्रीपदी शपथ घेणार हे जवळपास निश्चित होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून शिवसेना नेते एकनाथ शिंदे नाराज असल्याची चर्चा होती. त्यामुळे ते उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार की नाही याबाबत साशंकता होती. अखेर यांचीही नाराजी दूर झाली असून त्यांनीही उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यामुळे, राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार स्थापन झाले. लवकरच मंत्रिमंडळ विस्तार होणार असल्याची माहिती आहे.

## अजित पवारांनी सहाव्यांदा घेतली उपमुख्यमंत्रीपदाची शपथ

मुंबई , ५ डिसेंबर : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी आज (५ डिसेंबर) राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून सहाव्यांदा शपथ घेतली. अजित पवार यांनी आपल्या कामाने राज्यातील राजकारणावर वेगळी छाप पाडली आहे. शरद पवार यांच्या पावलावर पाऊल टाकत त्यांनी राजकारणावर आपली पकड मजबूत केली. पक्षामध्ये आपलं वेगळं अस्तित्व निर्माण केलं. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासून पक्षविस्तारापर्यंत सगळ्या जबाबदाऱ्या अजित दादांनी चांगल्या निभावल्या. असा विक्रम करणारे देशातील एकमेव नेते आहेत.



अजित पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील महत्त्वाचे नाव असून, त्यांचे चुलते शरद पवार यांच्याप्रमाणेच त्यांनी कृषी, सहकार क्षेत्रात विविध संस्थांचे जाळे निर्माण केले आहे. पवार हे १९९१ मध्ये पहिल्यांदा महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य झाले. त्यानंतर बारामतीमधून सलग आठवेळा त्यांनी याच मतदारसंघातून विजय मिळवला आहे. याआधी काँग्रेस-राष्ट्रवादीच्या आघाडी तसेच महाविकास आघाडी सरकारच्या काळात त्यांनी जलसंपदा, ऊर्जा, अर्थ-नियोजनसारख्या खात्यांसह उपमुख्यमंत्रिपदही सांभाळले आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये अजित पवार यांनी वेगवेगळ्या सरकारांमध्ये तीनवेळा उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्याने ते सध्या चर्चेच्या केंद्रस्थानी आहेत.

२०१० मध्ये पहिल्यांदा त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यानंतर २०१२ मध्ये पुन्हा ते उपमुख्यमंत्री बनले. त्यानंतर जवळपास चारवेळा ते उपमुख्यमंत्री राहिले आहेत. २३ नोव्हेंबर २०१९ ते २६ नोव्हेंबर २०१९ या काळात ते औटघटेकेचे उपमुख्यमंत्री बनले हते. देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत त्यांनी या पदाची शपथ घेतली. परंतु, हे सरकार अवघ्या ८० तासांत कोसळलं. हे सरकार कोसळल्यानंतर लागलीच ३० नोव्हेंबर २०१९ ते २९ जून २०२२ पर्यंत ते उद्धव ठाकरेंच्या नेतृत्त्वाखालील सरकारमध्ये उपमुख्यमंत्री होते. जून २०२३ मध्ये त्यांनी राष्ट्रवादीत बंडखोरी करून महाविकास आघाडीतून काढता पाय घेतला.

## महायुतीच्या शपथविधीला मान्यवरांची मांदीयाळी

मुंबई, ०५ डिसेंबर : महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी आज, गुरुवारी पद व गोपनियतेची शपथ घेतली. राज्यपाल बी.सी. राधाकृष्णन यांनी त्यांना शपथ दिली. तर शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांनी देखील उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणारे फडणवीस आणि सहाव्यांदा उपमुख्यमंत्री होणारे अजित पवार यांनी या शपथविधी सोहळ्यात एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. या शपथविधी सोहळ्याला देशाच्या पंतप्रधानांपासून ते सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत विविध क्षेत्रातील दिग्गजांची अलोट गर्दी झाली होती.

मुंबईच्या आझाद मैदानावर आयोजित या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान, केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे, केंद्रीय मंत्री पियुष गोयल, केंद्रीय मंत्री रामदास आठवले, उत्तर प्रदेशचे योगी आदित्यनाथ, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्रभाई पटेल, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंह धामी, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत या राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसोबतच क्रिकेटपटू भारतरत्न सचिन तेंडुलकर आणि त्याची पत्नी अंजली, उद्योगपती मुकेश अंबानी, अनिल अंबानी, अनंत अंबानी, राधिका अंबानी, अभिनेता शाहरुख खान, सलमान खान, रणबीर कपूर, रणवीर सिंग, रितेश देशमुख, अभिनेत्री माधुरी दीक्षित, विद्या बालन यांची प्रमुख उपस्थिती होती. या विशेष आमंत्रितांसोबतच राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले कार्यकर्ते, लाडक्या बहिणी आणि राज्याच्या विविध भागांमधून आलेल्या काही निवडक पत्रकारांचाही समावेश होता.

## नौसेना दिनानिमित्त राज्यपालांच्या उपस्थितीत बिटिंग रिट्रीट समारोह संपन्न

मुंबई : नौसेना दिनानिमित्त भारतीय नौदलाच्या पश्चिम विभाग मुख्यालयातर्फे गेट वे ऑफ इंडिया येथे आयोजित 'बिटींग रिट्रीट' आणि 'टॅटू सेरेमनी' समारोह राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी नौदलातर्फे हेलिकॉप्टर्सचे फ्लाय पास्ट, नेव्हल सेंट्रल बँड, कुठल्याही मौखिक आदेशाशिवाय सातत्यपूर्ण कवायत आणि सी कॅडेट कोअरच्या लहान मुलींतर्फे 'हॉर्नपाईप सेलर्स डान्स' सादर करण्यात आले. नौदल दिनानिमित्त समुद्रातील जहाजांवर आकर्षक रोषणाई करण्यात आली होती.



सन १९७१ च्या भारत - पाक युद्धादरम्यान चार डिसेंबर रोजी कराची बंदरावर झालेल्या निर्णायक हल्ल्यातील शौर्याच्या स्मृतीनिमित्त तसेच नौदलाच्या शहीद जवानांना आदरांजली वाहण्यासाठी दरवर्षी चार डिसेंबर रोजी नौदल दिन साजरा केला जातो.

कार्यक्रमाला नौदलाच्या पश्चिम विभागाचे मुख्य ध्वज अधिकारी व्हाईस डमिरल संजय जे सिंह, नौदलाचे वरिष्ठ अधिकारी, माजी अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील निमंत्रित उपस्थित होते.

व्हाईस ऍडमिरल निवासस्थानी स्वागत समारंभाला उपस्थिती

या कार्यक्रमानंतर राज्यपालांनी 'नेव्ही हाऊस' येथे आयोजित केलेल्या स्वागत समारंभ व चहापानाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहून निमंत्रित नौदल अधिकारी व माजी अधिकारी तसेच गणमान्य व्यक्तींना नौसेना दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी व्हाईस ऍडमिरल संजय जे सिंह यांनी राज्यपालांना निमंत्रित मान्यवरांचा परिचय करून दिला.

## नव्या भाजपा सरकारने महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला धक्का लावू नये : नाना पटोले

मुंबई, ५ डिसेंबर : निवडणूक आयोगाच्या मदतीने मतमोजणीत घोटाळे करुन महाराष्ट्रात जनतेच्या मतांची चोरी करणारे सरकार राज्यात स्थापन झाले आहे. चोरीचे बहुमत असतानाही नव्या सरकारची स्थापनाच वादाने झाली असून या तीन पक्षातील अंतर्गत वादामुळे महाराष्ट्राची प्रतिमा देशात मलीन झाली आहे. महाराष्ट्राच्या माथी पुन्हा गुजरातधार्जिणे सरकार बसले असले तरी छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, फुले, आंबेडकर यांच्या महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला धक्का लावू नये, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.

नव्या सरकारच्या स्थापनेसंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, महायुतीकडे बहुमत असतानाही सरकार स्थापन्यासाठी कसरत करावी लागली. एकनाथ शिंदे व अजित पवार यांना या सरकारमध्ये फारसे महत्व दिले जाईल असे वाटत नाही. दिल्लीत वाऱ्या करुन मंत्रीपदांची भिक मागण्याची वेळ या दोघांवर आली. मोदी शाह यांच्या मेहरबानीवर शिंदे, अजित पवार सरकारमध्ये असतील. एकनाथ शिंदे यांची तर भाजपाला आता काहीच गरज नाही त्यामुळे बहुमत मिळाल्यापासूनच शिंदे व अजित पवारांना भाजपा व मोदी शाह यांनी जागा दाखवून दिली आहे. भाजपाने पुन्हा एकदा दोन प्रादेशिक पक्षांना संपवले आहे.

भाजपाचे सरकार स्थापन झाले असून निवडणूक त्यांनी दिलेली आश्वासने पूर्ण करावी लागतील. शेतकरी कर्जमाफी, कृषी पंपाची विज बिल माफ, लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये, २.५ रिक्त सरकारी पदांची भरती याची तातडीने अंमलबजावणी करावी. काँग्रेस पक्षाची विधानसभेतील संख्या कमी झाली आहे परंतु हिम्मत व ताकद कायम असून जनतेच्या प्रश्नांवर सरकारला जाब विचारल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असेही पटोले म्हणाले.

## मी 'काडतूस' आहेझुकेगा नहीं! चित्रा वाघ यांनी विरोधकांना डिवचले

मुंबई : राज्यात आज संध्याकाळी महायुती सरकारचा शपथविधी सोहळा पार पडणार आहे. देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. त्यामुळे भाजपा कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. यावेळी भाजपा आमदार चित्रा वाघ यांनी केलेली एक सोशल मीडिया पोस्ट चांगलीच चर्चेत आली आहे.

चित्रा वाघ यांनी द वर केलेल्या पोस्टमध्ये म्हटलंय की, मी काडतूस आहे, झुकेगा नहीं. 'मेरा पानी उतरता देख, मेरे किनारे घर मत बसा लेना, मैं समंदर हूं, वापस आऊंगा', असं तो म्हणाला, तेव्हा त्याची खिल्ली उडवली गेली. पण आज हा समुद्रासारख्या विशाल अंतःकरणाचा, समुद्राएवढ्या कर्तृत्वाचा, समुद्राइतकी वैचारिक खोली असणारा देवाभाऊ परत आलाय, असं चित्रा वाघ यांनी म्हटलंय.

'आम्ही आधुनिक अभिमन्यू आहोत, आम्ही चक्रव्यूह भेदणं जाणतो', असं हा आधुनिक अभिमन्यू म्हणाला, तेव्हा त्याची चेष्टा झाली, पण त्यानं कावेबाजांचा, कुटिल कारस्थानांचा चक्रव्यूह भेदला. असा काही भेदला, की त्यातून उडालेल्या तेजाच्या किरणांनी भल्याभल्यांचे डोळे दीपून गेले.

कुरुक्षेत्रावरचं युद्ध खूप जटिल, अवघड असणार आहे, हे या अभिमन्यूला माहीत आहे. पण त्याला कर्तृत्वाची कवचकुंडलं मिळाली आहेत. ती घेऊन सर्वशक्तिनिशी तो परत आलाय.

'मी पुन्हा येईन' असं देवाभाऊ म्हणाला, तेव्हा त्याच्याविरुद्ध पाच वर्षं सातत्यानं कटकारस्थानांचे डोंगर रचले गेले; पण तो परत आलाय!!! परत आलाय गावांना जलयुक्त करण्यासाठी, शहरांचा चेहरा बदलण्यासाठी, महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी, नवमहाराष्ट्राच्या निर्मितीसाठी.

'देवाभाऊ जो बोलता है, वो करता है, और जो नहीं बोलता वो डेफिनेटली करता है' असं म्हणणारा देवाभाऊ पाच वर्षांआधी जे बोलला, ते त्यानं करून दाखवलंय दोस्तों आणि जे नाही बोलला, ते 'डेफिनेटली' करण्यासाठी आता परत आलाय.

'फडतूस नाही, काडतूस आहे. झुकेगा नही घुसेगा साला' असं तो म्हणाला होता. येस्स. या देवाभाऊनं 'फडतूस' लोकांना 'काडतूस' बनून पाताळात गाडलं. .. आता 'झुकण्या'साठी नाही, तर 'घुसण्या'साठी तो परत आलाय.

देवाभाऊचा पाच वर्षांचा मुख्यमंत्रिपदाचा काळ हा महाराष्ट्राच्या विकासाच्या इतिहासातला सगळ्यात सोनेरी कालखंड होता. त्यानंतर अडीच वर्षं तो विरोधी पक्षनेता बनून कुटिल लोकांवर तुटून पडला.

पुढची अडीच वर्षं धोरणीपणानं डावपेच आखत राहिला. आता तो परत आलाय. त्याचा पिक्चर संपलेला नाही. उलट त्याचा पिक्चर आता क्शननं भरपूर असणार आहे. त्याच्या पिक्चरचं नाव कुणी तरी 'अकेला फडणवीस' असं ठेवलं होतं पण त्याला चौदा कोटी जनतेनं पुन्हा एकदा 'हिरो' बनवलं. येस्स. तमाम महाराष्ट्राचा लाडका, जिगरबाज, चाणक्यनीतीत तरबेज, बहिणांचा पाठिराखा, शेतकऱ्यांचा सच्चा साथी, वंचितांचा खंदा आधार असलेला देवाभाऊ पाच वर्षांसाठी अवतरला आहे. आता तो काय करतो ते बघाच. देवाभाऊका असली पिक्चर अभी बाकी है मेरे दोस्त असं देखील चित्रा वाघ म्हणाल्या आहेत.

## राज्यस्तरीय मोफत दिव्यांग शिबीर १६ डिसेंबरला

### खराडीतील ढोले पाटील कॉलेजमध्ये आयोजन, रा.स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत राहणार उपस्थित

संभाजीनगर दि. ०५ : भारत विकास परिषदेच्या विकलांग केंद्राच्या वतीने दिव्यांगांना अत्याधुनिक कृत्रिम मोड्युलर पाय आणि हात व कॅलिपर मोफत बसविण्यासाठी राज्यस्तरीय दिव्यांग शिबीर पुण्यात आयोजित करण्यात येणार आहे.

सोमवार दिनांक १६ डिसेंबर २०२४ रोजी खराडी येथील ढोले पाटील कॉलेज, इऑन आयटीपार्क जवळ हे शिबीर पार पडेल. संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित हा उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती भारत विकास परिषद विकलांग पुनर्वसन केंद्राचे विश्वस्त व केंद्र प्रमुख विनय खटावकर यांनी दिली.

ते पुढे म्हणाले, भारत विकास परिषद ही सेवा व



संस्कार क्षेत्रात निस्वार्थपणे काम करणारी राष्ट्र व्यापी संघटना आहे. दिव्यांगांना कृत्रिम अवयव बसविणे हा प्रमुख राष्ट्रव्यापी सेवा प्रकल्प आहे. भारतातील १३ विकलांग केंद्रांपैकी पुण्यात एक केंद्र कार्यरत असून, कायमस्वरूपी असलेले हे केंद्र गेल्या २५ वर्षापासून अखंड कार्यरत आहे. कोणत्याही सरकारी मदती शिवाय समाजाच्या आधारावर दरवर्षी सुमारे पाच हजार दिव्यांगांना याचा लाभ होत आहे.

अत्याधुनिक कृत्रिम मॉड्युलर पायाची माहिती देताना ते म्हणाले कि, गेल्या ५ वर्षापासून परंपरागत जयपूर फूट



ऐवजी पन्नास हजार रुपयांचा अत्याधुनिक कृत्रिम मोड्युलर पाय आणि हात व पोलिओ कॅलिपर मोफत बसविण्यात येतात. केंद्रातील वर्कशॉपमध्ये अत्याधुनिक यंत्र सामुग्री व प्रशिक्षित तज्ञांच्या द्वारे सर्व कृत्रिम अवयव बनविले जातात. पाय बसविल्यानंतर अपंग व्यक्ती चालणे, पळणे, पोहोणे, उडी मारणे, वाहन चालविणे, इ. प्रकारची दैनदिन क्रिया करू शकतात. त्याबाबत केंद्रावर तज्ञांमार्फत सराव / मार्गदर्शनही केले जाते. पुण्यातील या शिबिरात एक हजार दिव्यांगांचे उद्दिष्ट आहे. लाभार्थींना कोणतेही आर्थिक निकष नसून राज्यातील सर्व होतकरू दिव्यांग यात सहभागी होऊ शकतात.

मोफत दिव्यांग शिबिराचा लाभ घेण्यासाठी दिव्यांगांनी स्वतः त्वरित पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे. प्रथम नोंदणीस प्राधान्य राहील. नोंदणीसाठी संपर्क: साठे ९१७५५५८३५६, अनिकेल ९४२२७९७१०६, राजेंद्र ८५५१०६४२०४, सोमवारी १६ डिसेंबरला दुपारी साडेतीन वाजता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प. पू. सरसंघचालक मा. डॉ. मोहनजी भागवत यांची दिव्यांग शिबिरास भेट आणि रौप्य महोत्सवी वर्षाच्या समारोप प्रसंगी मार्गदर्शन होईल. सर्व सेवा भावी नागरिकांनी या जाहीर कार्यक्रमास अवश्य उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले.

या शिबिरासाठी महाराष्ट्र नॅचरल गॅस लि., ब्रिज नेक्स्ट, ऑटो हँगर, ढोले पाटील एज्युकेशन सोसायटी, वात्सल्य ट्रस्ट, रोटरी क्लब ऑफ पुणे हेरिटेज यांचा आर्थिक सहयोग लाभलेला आहे. अधिक माहितीसाठी विश्वस्त आणि विकलांग केंद्रप्रमुख विनय खटावकर ९३२६७३०६६६




## वीवो स्विच ऑफ २०२४ सर्वेक्षण

पुणे : मानवी संबंधांवर, विशेषत: पालक आणि मुलांमधील अत्याधिक स्मार्टफोन वापराच्या परिणामाचा अभ्यास करण्यासाठी, विश्वासार्ह जागतिक स्मार्टफोन ब्रँड वीवो ने त्याच्या सहाव्या आवृत्तीसाठी सायबरमीडिया रिसर्च सोबत सहयोग केला आहे संशोधन अभ्यास बंद. 'स्मार्टफोन्सचा पालक-मुलांच्या नातेसंबंधांवर परिणाम' या शीर्षकाने केलेल्या या अभ्यासात असे दिसून आले आहे की स्मार्टफोनचा अतिरेक आणि अनियंत्रित वापर मुले आणि त्यांच्या पालकांमधील नातेसंबंधांवर विपरित परिणाम करत आहे. सहा वर्षांपूर्वी सुरू करण्यात आलेली, वीवो ची स्विच ऑफ मोहीम जबाबदार स्मार्टफोन वापराचे समर्थन करते, कुटुंबांना वास्तविक जीवनापेक्षा नातेसंबंधांना प्राधान्य देण्यास प्रोत्साहित करते. हा उपक्रम भारतातील यशाचे दशक साजरे करताना अधिक चांगले संबंध वाढवण्याच्या विवोच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करतो. वीवो स्विच ऑफ अभ्यासाच्या सहाव्या आवृत्तीत चिंताजनक माहिती समोर आली आहे जी पालक आणि मुलांनी त्यांच्या दुर्लक्षित स्मार्टफोन वापरावर विचार करण्याची तातडीची गरज दर्शवते. अभ्यासानुसार, पालक आणि मुले दोघांनाही एकमेकांशी जवळचे नाते हवे असते, परंतु त्यांच्या अवाजवी आणि निरर्थक स्मार्टफोनच्या सवयींवर अंकुश ठेवण्यास कोणीही तयार नाही. सरासरी, पालक त्यांच्या स्मार्टफोनवर दिवसातून पाच तासांपेक्षा जास्त वेळ घालवतात, तर मुले चार तासांपेक्षा जास्त वेळ घालवतात. विशेषतः, ७३% पालक आणि ६९% मुले स्पष्टपणे त्यांच्यातील संघर्षाचे कारण स्मार्टफोनचा वापर मानतात.

## 'बजाज फिन्सर्व्ह हेल्थकेअर फंड' सादर

मुंबई : बजाज फिन्सर्व्ह एएमसीने आज बजाज फिन्सर्व्ह हेल्थकेअर फंड या ओपन एंडेड समभाग योजनेच्या अनावरणाची घोषणा केली असून ही योजना आरोग्य आणि वेलनेसशी संबंधित क्षेत्रांत गुंतवणूक करून दीर्घकालीन वाढीला चालना देते. हा फंड ६ डिसेंबर रोजी सबस्क्रिप्शनसाठी खुला होणार असून नवीन फंड ऑफर कालावधी २० डिसेंबर २०२४ रोजी संपेल. बजाज फिन्सर्व्ह हेल्थकेअर फंड फार्मास्युटिकल्स, रूग्णालये, निदान केंद्रे आणि वेलनेस अशा क्षेत्रांतील कंपन्यांच्या समभाग तसेच समभागांशी संबंधित साधनांमध्ये प्रामुख्याने गुंतवणूक करून मालमत्ता निर्मितीच्या क्षमतांचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी सुयोग्य आहे. तो पाच वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त गुंतवणूक कालावधीसाठी योग्य आहे. ही योजना बीएसई हेल्थकेअर टोटल रिटर्न इंडेक्स (टीआरआय)वर चिन्हांकित करण्यात आली आहे.

## येत्या रब्बी हंगामाच्या प्रधान मंत्री फसल बिमा योजनेची अंमलबजावणी

हिंगोली/ उस्मानाबाद- एचडीएफसी अर्गो जनरल इन्शुरन्स कंपनी या भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील सर्वसाधारण विमा प्रदाता कंपनी ला महाराष्ट्र सरकार ने प्रधान मंत्री फसल बिमा योजना (पीएमएफबीवाय) ची अंमलबजावणीची जबाबदारी दिली असून ही योजना धुळे, पुणे, हिंगोली, अकोला आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील कर्जधारक आणि बिगरकर्जधारक शेतकर्यांसाठी असून २०२४ च्या रब्बी हंगामातील पिकांचा विमा काढला जाणार आहे.या योजनेची अंमलबजावणी ही महाराष्ट्र सरकारच्या योजनेअंतर्गत विविध प्रकारच्या खालील पिकांकरता असून त्याकरता असलेली अंतिम तारीख नमूद करण्यात आली आहे.पीएमएफबीवाय योजने अंतर्गत शेतकर्यांना विविध प्रकारच्या बाह्य धोक्यांपासून विमा संरक्षण दिले जाते, यामध्ये दुष्काळ, पूर, पावसाने ओढ घेणे, दरड कोसळणे, चक्रीवादळ, वादळे, धुळीची वादळे, पूरपरिस्थिती, कीडीचा प्रादुर्भाव होणे, आजार आणि अन्य गोष्टींचा समावेश आहे. पिकाचे नुकसान समजून घेण्यासाठी राज्य सरकार कडून या योजनेअंतर्गत समावेश असलेल्या पिकांचे क्रॉप कटिंग एक्सपिरिमेंट्स (सीसीईज) चे नियोजन आणि आयोजन करण्यात येते. जर सीसीईज चे आयोजन केल्यानंतर उत्पादनाची आकडेवारी कमी आढळल्यास शेतकर्यांना उत्पादनातील फरक दिला जातो.

# श्रीखंडोबा पालखी मिरवणूक वादाच्या भोवऱ्यात घटस्थापनेनंतर मूर्ती कशी हलविता : पळसकर

### पालखी मिरवणुकीची परंपरा : देवकर

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

शहराचे ग्रामदैवत असलेल्या सातारा गावातील खंडोबा मंदिरात परंपरेनुसार सालाबादाप्रमाणे मार्गशिर्ष महिन्यात खंडोबा षडरात्रोत्सव भरवण्यात येतो. घटस्थापना झाल्यानंतर चंपाषष्ठीच्या दिवशी परंपरेनुसार जहागीरदारांच्या वाड्यात पालखी मिरवणूक काढण्यात येते. पालखी मिरवणुकीस देवस्थानच्या विश्वस्तांचा विरोध असून, संस्थापक विश्वस्तांनी मात्र मिरवणुकीची पुरातन परंपरा असल्यामुळे कोणत्याही परिस्थित मूळ मूर्तीची पालखी मिरवणूक काढणार असल्याचे सांगितले. दरम्यान, याबाबत राज्य पुरातत्व विभाग काय निर्णय घेणार, याकडे ग्रामस्थांसह भक्तांचे लक्ष लागले आहे.

जहागीरदार गेल्यापासून दांडेकर हे त्या वाड्यात वास्तव्य करीत असल्यामुळे ही पालखी मिरवणूक आता दांडेकरांच्या वाड्यात जात आहे. चंपाषष्ठीनिमित्त सकाळी ७ ते संध्याकाळी ७ पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांसह महाप्रसादाचे आयोजनही करण्यात येते. त्यानंतर पालखी मिरवणूक काढण्यात येते. मात्र, यावर्षी ही पालखी मिरवणूक वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे.

देवस्थानचे सचिव साहेबराव पळसकर यांचे म्हणणे आहे की, पालखी मिरवणुकीतून मूळ तांदळा मूर्ती वाड्यात नेली आणि तेथे मूर्तीची तोडफोड, विटंबना झाली, तर त्यास जबाबदार कोण ?, तर जुनी मूर्ती चल असून, पालखीतून दांडेकर वाड्यात मिरवणुकीने नेण्याची पुरातन परंपरा आहे, त्यामुळे पुरातत्व विभागाकडून मिळालेल्या तोंडी उत्तरामुळे आम्ही कडक पोलीस बंदोबस्तात मिरवणूक काढणार आहोत, असे संस्थापक विश्वस्त दिलीप दांडेकर आणि विठ्ठल देवकर यांनी सांगितले.

साताऱ्यातील पुरातन हेमाडपंथी श्रीखंडोबा मंदिर हे राज्य पुरातत्व खात्याच्या अखत्यारित येते. याप्रकरणी दोन्हे गटांनी पुरातत्वकडे संपर्क केला असता कोणालाही लेखी पत्र दिलेले नाही. पुरातत्व विभागाकडून यासंदर्भात कोणतेही लेखी उत्तर आले नसल्याचे देवस्थानचे सचिव साहेबराव पळसकर यांनी सांगितले आहे. आम्ही मूळ मूर्तीची पालखी मिरवणूक काढण्यावर आम्ही ठाम आहोत, असे पळसकर म्हणाले. देवस्थानचे संस्थापक विश्वस्त दिलीप दांडेकर व देवकर म्हणाले, आम्हाला पुरातत्व विभागाच्या सहायक संचालक जया वाहणे यांनी मूर्तीचे पावित्र्य राखून पोलीस बंदोबस्तात मिरवणूक काढावी, असे तोंडी सांगितले आहे. सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत देव वाड्यात असतो. तेथे पूजाविधी, ब्राम्हण भोजन वगैरे सोपस्कार केले जातात. याबाबत खंडोबा देवस्थानचे अध्यक्ष व सचिव यांनी ८ नोव्हेंबर २०२४ रोजी एक लेखी पत्र पुरातत्व विभागाला सादर केले आहे. त्यामुळे यावर्षी होणारी पालखी मिरवणूक निघणार की नाही, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जहागीरदार यांनी वाडा सोडल्यानंतर सदरील खंडोबा देवस्थानातील खंडोबाची मूर्ती दांडेकर यांच्या वाड्यात घेऊन जाण्यास अनेक गावकरी व भक्तांचा विरोध होत होता, उत्सवात कोणा एका व्यक्तीच्या घरी मूर्ती किंवा प्रतिमूर्ती देणे अशी कोणतीही परंपरा नाही, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. सदरील मूर्ती सद्यस्थितीत पुरातत्व खात्याच्या अखत्यारित, अधिकारात आहे. सदरील मूर्ती हलविण्याबाबत आपले मार्गदर्शन आवश्यक आहे. सदरील मूर्ती उत्सव काळात कुठेही न हलवण्याबाबत विश्वस्त मंडळाने यापूर्वीही ठराव पारित केलेला आहे. विश्वस्त मंडळास सदरील मूर्ती किंवा सदरील मूर्तीची प्रतिमूर्ती मंदिर संस्थान सोडून कोणाच्याही वाड्यात किंवा घरात देणे उचित वाटत नाही. त्याचे मुख्य कारण म्हणजे दांडेकर यांच्या वाड्यात सदरील मुर्ती करिता आवश्यक सोईसुविधा, संरक्षण उपलब्ध नाही. तेथे मूर्तीची विटंबना होण्याची शक्यता नाकारता येत नाही आदी मुद्दे पत्रात नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी पुरातत्व विभागाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होवू शकला नाही.

## क्षयरोग निर्मूलन मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवा : सिद्धाराम सालीमठ

अहिल्यानगर दि.५- क्षयरोग निर्मूलन मोहीम अंतर्गत व्यापक प्रमाणात जनजागृती घडवून आणण्यासाठी विविध शासकीय विभाग आणि सामाजिक संस्थांनी १०० दिवसांच्या विशेष मोहिमेत सक्रिय सहभाग घ्यावा आणि सर्व शासकीय अधिकाऱ्यांनी 'नि-क्षय मित्र' म्हणून मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन मोहिमेबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागनाथ चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी बापूसाहेब नागरगोजे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. अविनाश आहेर आदी उपस्थित होते.



श्री.सालीमठ म्हणाले, आरोग्य विभागाने क्षयरोग रुग्ण शोधून त्यांच्यावर वेळीच उपचार करण्यासाठी मोहीम राबवावी, यासाठी तपासणीचे प्रमाण वाढवावे. खाजगी रुग्णालयात क्षयरोग रुग्ण आढळल्यास त्यांच्यावर योग्य उपचार होतील याबाबत लक्ष द्यावे. आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी मोहिमेबाबत आवश्यक प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. शहरातील झोपडपट्टी भागातही तपासणीचे प्रमाण वाढवावे. औद्योगिक संस्थांचे सहकार्य घेण्याबाबत लवकरच बैठकीचे आयोजन करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

श्री.येरेकर यांनी मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी विविध संबंधित यंत्रणांचे सहकार्य घेण्याबाबत सूचना केल्या. आरोग्य केंद्रात क्षयरोगाबाबत नमुने घेण्याचे प्रमाण वाढविण्यात यावे, असेही त्यांनी सांगितले.

डॉ.आहेर यांनी मोहिमेबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली. मोहिमेअंतर्गत शाळा-महाविद्यालयातून क्षयरोगाबाबत प्रबोधन करण्यात येणार आहे. या मोहिमेत लोकप्रतिनिधींचाही सहभाग घेण्यात येईल. औद्योगिक संस्थांचे सहकार्य घेण्यासोबत चांगले काम करणाऱ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. ग्रामपंचायत स्तरावर आणि शहरातील झोपडपट्टी भागात व्यापक जनजागृती करण्यात येईल. एनसीसी, एनएसएस आणि नेहरू युवा केंद्राच्या माध्यमातून जनजागृती उपक्रमात युवकांना सहभागी करून घेण्यात येईल. सार्वजनिक ठिकाण, आश्रमशाळा, आयुष रुग्णालयात क्षयरोग तपासणी करण्यात येणार आहे. तपासणीनंतर उपचार आणि आवश्यक सहकार्य करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

ज्येष्ठ नागरिक, व्यासनाधिन व्यक्ती, कुपोषित नागरिक, झोपडपट्टी भागातील रहिवासी आदी साडे आठ लाख नागरिकांची मोहिमेअंतर्गत तपासणी करण्यात येणार असून प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्राच्या ठिकाणी क्षयरोग तपासणीच्या सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. नॅट यंत्र, एक्स रे सुविधा, फिरते एक्स रे वाहन, आवश्यक औषधे उपलब्ध असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. गेल्या ५ वर्षात १३ हजार ९६५ रुग्ण उपचारांती बरे झाल्याची माहितीही डॉ.आहेर यांनी दिली.

### जिल्हाधिकारी कार्यालयतील कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण

## प्रशासकीय पत्रव्यवहार निर्दोष आणि सोपा असावा-जिल्हाधिकारी स्वामी

छत्रपती संभाजीनगर,दि.५(जिमाका)- शासकीय पत्र व्यवहार ,टिपणी लेखन निर्दोष आणि सहज समजेल अशा भाषेत असायला हवे. यासाठी भाषा, व्याकरण, शुद्धलेखन यावर विशेष लक्ष देऊन अधिकारी-कर्मचाऱ्यांनी प्रशासकीय कामकाज करावे,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज प्रशिक्षण कार्यक्रमात दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांसाठी प्रशासकीय कामकाजातील पत्रव्यवहार, टिपणी लेखन, नस्ती, अहवाल लेखन याबाबत प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. मार्गदर्शक महसूल प्रबोधिनीतील प्रशिक्षक अरुण जोशी उपस्थित होते. अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन संगीता राठोड यांच्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की शासनाचा पत्र व्यवहार ,विविध प्रस्ताव तयार करण्याचे काम हा लिपिकवर्गीय कर्मचारी करत असतो. या कामकाजात मराठी भाषेचा वापर करतांना व्याकरण, शुद्धलेखन, व सर्वसामान्यांना समजेल अशा सोप्या शब्दांचा वापर करावा. भाषेविषयीचे नियम, शासकीय नस्ती इ. अवलोकन करून आपले ज्ञान अद्ययावत करावे. विविध शब्दांचे अर्थ व त्याप्रमाणे शब्दांचा योग्य उपयोग करून प्रशासकीय काम लोकाभिमुख आणि सोपे करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

शासकीय पत्र व्यवहार, टिप्पणी लेखन यामध्ये असणाऱ्या विविध विषयाच्या मुद्देनिहाय माहिती अंतर्भूत करणे. चूका होऊ नये त्यासाठी आवश्यक ती घ्यावयाची काळजी घेणे. परिपूर्ण पत्रव्यवहारासाठी संबंधित शासन निर्णयांचे संदर्भ देणे इ. बाबी आवश्यक असल्याचे प्रशिक्षक अरुण जोशी यांनी सांगितले.

या प्रशिक्षणात जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व कर्मचारी सहभागी झाले.

## डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी महाविद्यालय, विळदघाट येथे कृषी शिक्षण दिन मोठ्या उत्साहात साजरा

नगर (प्रतिनिधी): ०३ डिसेंबर हा दिवस भारताचे पहिले राष्ट्रपती व कृषी मंत्री डॉ. राजेद्र प्रसाद यांचा जन्मदिन राष्ट्रीय कृषी दिन म्हणून संपूर्ण भारतभर साजरा केला जातो. यानिमित्त लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील कनिष्ठ महाविद्यालय, विळदघाट येथील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांची कॉलेजच्या परिसरात कृषी शिक्षणाच्या अनुषंगाने विविध विषयावर शिवार फेरी आयोजित करण्यात आली. त्याच प्रमाणे या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन देखील करण्यात आले.

या दरम्यान भारतीय कृषी संशोधन परिषदेचे (शिक्षण) उपसंचालक डॉ. आर .सी. अग्रवाल यांनी कृषी शिक्षणाबाबत सविस्तर प्रबोधन केले. सद्यस्थितीतील शिक्षणाचे महत्व, सद्यस्थिती, भविष्यातील संधी आणि गरज तसेच राष्ट्रीय स्तरावर उपयुक्त आणि त्यावरील गरजेनुरुप उपाययोजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन त्यांनी केले. तसेच चालू वर्षापासून कृषी शिक्षणात नवीन राष्ट्रीय शिक्षण प्रणाली - २०२० नुसार बदल सुचविण्यात आलेला असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर धोंडे तर व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. एम. बी. राऊत, सहयोगी प्राध्यापक डॉ. एच. एल. शिरसाठ, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. किरण दांगडे, डॉ. व्ही. एस. निकम, प्रा. किशोर मोरे यांच्यासह सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका व शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मधुकर धोंडे यांनी विद्यार्थ्यांनी कृषी क्षेत्रातील पूर्वस्थितीतील कृषी व्यवसाय परिस्थिती आणि सद्यपरिस्थितीत सुधारित शेती व्यवसाय उदा. उच्च तंत्रज्ञान, सेंद्रिय शेती, अन्नद्रव्य व्यवस्थापन, सिंचन पद्धती, पशुसंवर्धन तंत्रज्ञान, फळबाग तंत्रज्ञान, एकात्मिक शेती पद्धती इत्यादी बाबत झालेला बदल कृषी शिक्षणाद्वारे झालेला असून पुढील काळात देखील अजून अद्ययावत असा बदल दिसून येईल. तसेच नवीन पिढीने कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञान नाविण्यपूर्ण संशोधन या क्षेत्रात स्वतःची आवड निर्माण करावी या अनुषंगाने मार्गदर्शन केले. तसेच सहयोगी प्राध्यापक डॉ. एच. एल. शिरसाठ यांनी विद्यार्थ्यांना कृषी शिक्षणाचे महत्व व उपप्राचार्य डॉ. एम. बी. राऊत यांनी कृषी क्षेत्रामधील संधी याविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एम. एस. अनारसे व आभार प्रा. के. एस. दांगडे यांनी केले.

## सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनास मंगळवार पासून प्रारंभ

छत्रपती संभाजीनगर,दि.५(जिमाका)- सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा प्रारंभ मंगळवार दि.१० रोजी होणार आहे. यानिमित्त माजी सैनिक,वीरपत्नी, विधवांचा मेळावाही आयोजीत करण्यात आला आहे, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर सय्यदा फिरासत यांनी कळविले आहे. हा सोहळा मौलाना अबुल कलाम आजाद संशोधन केंद्र सभागृह, टी.व्ही.सेंटर रोड येथे मंगळवार दि.१० रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. या सोहळ्याचे उद्घाटन विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांच्या हस्ते होणार आहे. तर अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हे उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस आयुक्त प्रविण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांची उपस्थिती राहील. कार्यक्रमास जिल्ह्यातील माजी सैनिक, वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, माजी सैनिकांच्या पत्नी व त्यांचे अवलंबित तसेच नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर सय्यदा फिरासत यांनी केले आहे.

## स्वप्नीलचा बेधडक डॅशिंग अंदाज

मराठी सिनेसृष्टीतील ग्लॅमरस आणि चॉकलेट हिरो अशी ओळख असणारा अभिनेता स्वप्नील जोशी ह्याचा बेधडक डॅशिंग अंदाज



लवकरच पहायला मिळणार आहे. वेगवेगळ्या भूमिकांमधून प्रेक्षकांचे मनोरंजन केल्यानंतर स्वप्नील आता आगामी 'जिलबी' या मराठी चित्रपटात विजय करमरकर या डॅशिंग पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाचे दमदार मोशन पोस्टर नुकतेच प्रदर्शित झाले आहे . आनंद पंडित मोशन पिक्चर्स निर्मित ही खुमासदार 'जिलबी' १७ जानेवारीला आपल्या मनोरंजनासाठी सज्ज झाली आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन नितीन कांबळे यांनी केले आहे.

आपल्या भूमिकेबद्दल बोलताना स्वप्नील सांगते की, 'आपला पोलिसी खाक्या दाखवत चोख कामगिरी बजावणारा हा पोलीस अधिकारी आहे. माझ्या आजवरच्या भूमिकांपेक्षा वेगळी भूमिका मला करायला मिळाल्याचा आनंद आहे. विशेष म्हणजे पोलिसांचा अंदाज, त्यांच्या जबरदस्त व्यक्तिमत्वाचा लहेजा हे सगळं करण्यात एक वेगळीच मजा आली. प्रेक्षकांचे निखळ मनोरंजन करणारा 'जिलबी' हा चित्रपट आहे. भूमिका कोणत्याही प्रकारची असली, तरी ती चांगली व्हावी यासाठी कलाकारांना कष्ट घ्यावे लागतात. एकाच प्रकारच्या भूमिकांमध्ये अडकून पडायचं नसल्याने ही वेगळी भूमिका स्वीकारल्याचं स्वप्नील सांगतो.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

पु.ता.२०/०१/२०२५

सिव्हील एम.ए.नं. ५४७/२०२४

अर्जदार : १. शोभा अशोकलाल जैस्वाल नग५७ गर्ग धंदा. शेती २. सुशील अशोकलाल जैस्याल गय. ३९ वर्ष नंदा. शेती १ त २ श. घर नं. १-१९-३०, जुना बजार, इरम मेडिकल जवळ, बुड्डी लाईन छ. संभाजीनगर ता.जि. छ.संभाजीनगर ३. संतोष अशोकलाल जैस्वाल वग. ३५ वर्ष चंदा. शेती रा. पेंढापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ४. भारती रितेश जैसवाल वय ३७ वर्ष धंदा. शेती रा. घाटनांद्रा ता. सिल्लोड जि.छ.संभाजीनगर ५. पूजा रिकेश जैसवाल वय.२८ वर्ष धंदा. शेती रा. प्लॉट नं. ७५२, रिंग रोड, साई मंदिरासमोर, खुशी नगर, जरीपटका, नागपूर ता.जि. नागपूर.

विरूद्ध

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, असे की, अर्जदार नं. १ यांचे पती व २ ते ५ यांचे वडिल नामे अशोकलाल गंगुलाल जैस्वाल हे दि. १४/१२/२०२० रोजी मौजे पेंडापूर ता. गंगापूर येथे मयत झाले आहे. अर्जदार हे मयत अशोकलाल गंगुलाल जैस्वाल यांचे कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत अशोकलाल गंगुलाल जैस्वाल यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याकामी व इतर शासकीय कामासाठी आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत अशोकलाल गंगुलाल जैस्वाल यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्द्दीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत अशोकलाल गंगुलाल जैस्वाल यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुद्द्दी नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक — सहा. अधिक्षक

दिवाणी जदारी न्यायालय गंगापूर

**मा. दिवाणी न्यायाधिश, क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, जि. औरंगाबाद.**

### जाहिर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २०४/२०२४.

अर्जदार : १ सुशिलाबाई जम्मन तेलंग्रे वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, २. दत्ता जम्मन तेलंग्रे, वय ३० वर्षे, धंदा, मजुरी, दोघेही रा. आमखेडा, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर, ३ ज्योती सुरेश बारी, वय ४० वर्षे, धंदा, घरकाम, ४. दिपाली विजय बारी, वय ३६ वर्षे, धंदा घरकाम, दोघेही रा. कुन्हे पानाचे, ता. भुसावळ, जि. जळगांव

-विरुध्द-

गरअर्जदार : कोणीही नाही.

प्रकरण : वारस प्रमाण-पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितांस या जाहीर प्रगटणांद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. वाय. आर. जावळे, सोयगांव, ता. सोयगांव, जि. संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयांत अर्ज केलेला आहे. मयत जम्मन शिवराम तेलंग्रे हे दि. २२/०६/२०२२ रोजी आमखेडा, ता. सोयगांव, जि. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यु झालेला असुन, त्यांच्या पश्चात वरील अर्जदार हे वारस आहे असा अर्ज न्यायालयांत वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क्रे १ व ४ हे मयत जम्मन शिवराम तेलमे यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकिय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे

तरी ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्यांकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहिर प्रगटनांद्वारे प्रसिध्द आल्यांपासुन ३० दिवसांच्या आंत या न्यायालयांत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यांसह अजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशिररीत्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यांत येईन पुढील तारीख १३/०१/२०२५.

आज दि. ०४/१२/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यांसह दिले

आदेशांवरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय, क. स्तर, सोयगांव.

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ५४८/२०२४

अर्जदार : १. ताराबाई भ्र.आण्णासाहेब फाळके, २. संतोष अन्ना उर्फ आण्णासाहेब फाळके, दोन्ही रा.भागाठाण, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त, अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. व्ही.जे. कसाने, गंगापुर यांचे मार्फत इेलरू ठशर्सीश्ररींळेप -लीं तखखख १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ चे पिता नामे आण्णासाहेब कचरु फाळके हे दि. ०८/०४/२०२३ रोजी मौजे भागाठाण, ता.गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झाले आहेत. मयत आण्णासाहेब कचरु फाळके यांना अर्जदार नं. १ व २ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत आण्णासाहेब कचरु फाळके यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामांसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता' असल्याने, त्यांनी इेलरू ठशर्सीश्ररींळेप -लीं तळश्रश्र १८२७ अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस याव्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

०५/१२/२४ करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक /२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

### जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 549/2024

मालनबाई पुंजाराम उबाळे व इतर

विरुध्द

निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सुनावणी तारीख : १०/०१/२०२५

ज्याअर्थी मयत पुंजा देवराव उबाळे दि.०१/०९/२०२१ रोजी मौजे वरखेड, ता. गंगापुर येथे मृत्यु पावले असुन १. मालनबाई पुंजाराम उबाळे, रा. वरखेड, ता.गंगापुर जि. औरंगाबाद २. शकुंतलाबाई मुरलीधर वाघ, रा. चिंचडगाव, ता. वैजापुर जि. औरंगाबाद ३. कडु पुंजाराम उबाळे, रा.पंढरपुर, ता. जि. औरंगाबाद ४. नंदा दादासाहेब शिरसाट, रा.खार पुर्व, मुंबई ५. शोभा अशोक जाधव, रा.वरखेड, ता. गंगापुर जि. औरंगाबाद ६. मंदा रमेश पगारे, रा. पिंपळखुटे बु., नाशिक यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री. पीबी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ६ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.०४/१२/२०२४

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ. आदेश/प्र.क्र.४१३९/कावि-४८१६

उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :- १३.११.२०२४.

### जाहिर प्रगटन

अर्जदार - वैभव कैलास निंभारे, वय-१९ वर्ष व्यवसाय- शिक्षण, रा. बाळापुर ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर,

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय बाळापुर. ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय : जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी वैभव कैलास निंभारे, रा.बाळापुर ता. सिल्लोड जि. छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचा दिनांक २४.०४.२००५ रोजी मौजे बाळापुर येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की वैभव कैलास निंभारे, यांचा दिनांक २४.०४.२००५ रोजी मौजे बाळापुर येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर /आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

# जवळ्याच्या विद्यार्थ्यांचे जडले मातीशी नाते...!

## जागतिक मृदा दिनानिमित्त जाणून घेतले मातीचे महत्व

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०५ डिसेंबर**

दरवर्षी ५ डिसेंबर रोजी जागतिक मृदा दिवस साजरा केला जातो. जागतिक अन्नसुरक्षेच्या दृष्टीने मृदेचं महत्व अन्यसाधारण असं आहे. अलिकडच्या काळात झपाट्याने वाढतच चालेले शहरीकरण, सिमेंटचे रस्ते यामुळे मृदेची अधिक प्रमाणात झीज होत आहे. त्याचबरोबर शेतीमध्ये वापरण्यात येणारी भरमसाठ रासायनिक खते, शहरीकरणासाठी आणि उद्योगधंद्यांसाठी करण्यात येणारी जंगलतोड आणि इतर अनेक कारणांमुळे मृदेची झीज होण्याची प्रक्रिया मोठ्या प्रमाणात सुरु आहे. मानवाच्या बदलत्या जीवनशैलीचा परिणाम, पर्यावरणाचा ऱ्हास आणि अशा प्रकारच्या इतर अनेक कारणांमुळे मृदेची झीज मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे यासंदर्भात शेतकरी आणि सामान्य माणसांसह विद्यार्थ्यांमध्येही मृदेसंबंधी जागरुकता करण्याच्या उद्देशाने जवळा देशमुख येथे विद्यार्थ्यांचे 'जडले मातीशी नाते' हा कार्यक्रम घेण्यात आला.

जागतिक मृदा दिनानिमित्त जवळा देशमुख येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत सकाळीच विषय शिक्षक उमाकांत बेंबडे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना मातीच्या विविध प्रकारांची माहिती देण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, सहशिक्षक संतोष घटकार, हैदर शेख, मनिषा गच्चे यांची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना बेंबडे म्हणाले की, केवळ एक इंच सुपीक मृदेचा थर तयार होण्यासाठी ८०० ते १००० वर्षांचा कालावधी लागतो. मृदेचं संरक्षण म्हणजे संपूर्ण सजीवांचं संरक्षण. जगातील ९५ टक्के अन्नधान्य मृदेच्या माध्यमातून येतं. तसेच मृदेत पृथ्वीवरील एकूण सजीवांपैकी २५ टक्के सजीव आसरा घेतात. फळे, भाज्या आणि अन्नधान्याची गुणवत्ता ही मातीच्या गुणवत्तेवरुन ठरते. सध्या या मृदेच्या संवर्धनासमोर वातावरण बदलाचं मोठं आव्हान उभं आहे. माती हा एक जिवंत स्त्रोत आणि २५% पेक्षा जास्त ग्रहांचे जीवन आहे. आपले ९५% अन्न मातीमधून येते फळे, भाज्या आणि धान्य यांचे गुणवत्ता व प्रमाण मातीच्या आरोग्यावर अवलंबून आहे. पृथ्वीवरील जीवन टिकवण्यासाठी मातीचे जीव सतत कार्यरत असतात. माती हवामान बदल आणि ग्लोबल वार्मिंगशी लढायलाही मदत करते.

शालेय अभ्यासक्रमातील पाठ्यघटकांशी सांगड घालत विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली मातीचे विविध प्रकार आणि वैशिष्ट्ये यांचा अभ्यास केला. यावेळी मुख्याध्यापक गंगाधर ढवळे यांनीही विद्यार्थ्यांना माहिती दिली. ते म्हणाले, माती जीवनासाठी महत्त्वाची आहे. कारण ती अन्न, वस्त्र, निवारा आणि औषध यासह जीवनाच्या चार प्रमुख साधनांचा स्रोत आहे. त्यामुळे मातीचे संवर्धन आवश्यक आहे. माती जीवनासाठी अत्यावश्यक आहे. कारण ती अन्न, वस्त्र, निवारा आणि औषध यासह जीवनाच्या चार प्रमुख साधनांचा स्रोत आहे. त्यामुळे मातीचे संवर्धन आवश्यक आहे.

याशिवाय माती वेगवेगळ्या प्रमाणात खनिजे, सेंद्रिय पदार्थ आणि हवा यांनी बनलेली असते. जीवनासाठी ते महत्त्वाचे आहे कारण ते वनस्पतींच्या वाढीसाठी एक माध्यम आहे. अनेक कीटक आणि इतर जीवांचे घर आहे. हे पृष्ठभागावरील पाण्यासाठी आणि वातावरणातील वायूंच्या देखभालीसाठी गाळण्याची प्रक्रिया प्रणाली म्हणून देखील कार्य करते. त्यामुळे मातीच्या नुकसानाबाबत अधिक जनजागृती करण्याची गरज आहे.

# राजू निवारे तिहेरी खुनातील आरोपीला ट्रिपल जन्मठेप

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०५ डिसेंबर : २८ नोव्हेंबर २०२१ रोजीच्या रात्री अवघ्या संभाजीनगर जिल्ह्याला हादरुन ठेवणाऱ्या पैठण शहरापासून जवळच्या जुने कावसन येथील राजू उर्फ संभाजी निवारे, पत्नी अश्विनी निवारे, मुलगी सायली निवारे यांची गळा चिरून निर्घृण खून तसेच मुलगा सोहम याच्यावर वार करून गंभीर जखमी केल्या प्रकरणी आरोपी आकाश प्रकाश जाधव याला जिल्हासत्र न्यायालयाने तिहेरी जन्मपेठेची तसेच सात वर्षीय सोहम निवारे मुलाला जखमी केल्या प्रकरणी १० वर्षांची सक्त मजुरी व चारही घटनेत ४० हजारांचा दंड अशी शिक्षा ठोठावली आहे.





तिहेरी खून करून पोलिसांना गुल्ला देण्यासाठी आरोपी मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, जालना असे फिरत होता. येवला येथून तो एका दुचाकीवरछत्रपती संभाजीनगर कडे येणार अशी खबर गुन्हे अन्वेषण विभागाला मिळाल्यानंतर पोलीस निरीक्षक भागवत फुंदे यांनी दहा वेगवेगळ्या ठिकाणी सापळा रचून त्याचा शोध घेतला शेवटी तो ७ डिसेंबर २०२१ रोजी एका विनानंबर प्लॅटिना दुचाकीवर महालगाव रोडवरून गंगापूरच्या दिशेने जात असतांना त्याला पोलिसांनी हटकले हे पाहतच त्याने दुचाकी ठेऊन शेतात धूम ठोकली होती. पोलिसांनी त्याचा दोन किलोमीटर पर्यत पिच्छा करत त्याला ताब्यात घेतले यावेळी त्याच्याकडून चाकू, लोखंडी रॉड, सायकल चेन, मोबाईल असा ऐवज हस्तगत करण्यात आला. जुन्या वादातून आपण वरील तिघांना संपवाल्याची कबुली त्याने पोलिसांना दिली होती. त्याच्यावर कलम ३०२,३०७,३२६,४५९ भादंवी कलम ५,२७ भारतीय हत्यार कायदा नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस अधीक्षक मोक्षदा पाटील, गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक भागवत फुंदे, पैठण पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली वरील कारवाई करण्यात आली होती. यावर ५ डिसेंबर २०२४ रोजी सत्र न्यायालयाचे न्यायाधीश एन. एम जमादार यांनी आरोपी अक्षय प्रकाश जाधव रा. माळवाडी सोलनापूर शिवार ता. पैठण याला तिघांच्या खुन प्रकरणी तिहेरी जन्मठेपेची शिक्षा व ३० हजरांचा दंड तसेच मयतांचा मुलगा सोहम याला गंभीर जखमी केल्याप्रकरणी सात वर्षे सक्तमजुरी व १० हजरांचा दंड अशी शिक्षा ठोठावली आहे. सरकारी वकील एस. टी. शिरसाठ, पैठण पोलीस निरीक्षक संजय देशमुख, पो. उ. निरीक्षक वाघमारे, पो हे घुनावत, महिला पोलीस शिपाई बबिता भालेकर यांनी या केस मध्ये महत्वाची भूमिका बजावली.

# मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रीदाची शपथ; पेढे भरवत जल्लोषात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि.०५ डिसेंबर**

: राज्याच्या मुख्यमंत्रीपदी सर्वांचे लाडके भाऊ देवेंद्र फडणवीस यांनी तर उपमुख्यमंत्री म्हणून शिवसेनेचे एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादीचे अजित पवार यांनी आज मुंबई येथील आझाद मैदानावर हजारो मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडलेल्या शपथविधी सोहळ्यात मंत्रीपदाची शपथ घेतली.

याचा आनंदोत्सवाचा जल्लोष



माहूर येथील आंबेडकर चौकात फटाक्यांची आतिषबाजी करून एकमेकांना पेढे भरवत आज ०५ डिसेंबर रोजी मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.यावेळी लाडके भाऊ देवेंद्र फडणवीस आप आगे बढो हम सब तुम्हारे साथ है, एक है तो सेफ है अशा नारेबाजीने माहूरगडाचा सबंध आसमंत दणाणून गेला होता. यावेळी भाजपा ता.अ.कांतराव घोडेकर, विमुक्त जाती प्रदेश सचिव अनिल वाघमारे, ज्येष्ठ नेते विजय आमले,माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक राजेंद्र केशवे, नंदकुमार जोशी,रहेमत अली, सरचिटणीस अपील बेलखोडे, पत्रकार बजरंगसिंह हजारी, दत्ता शेरेकर, नंदकुमार कोलपवार, विनायक मुसळे, संजय बनसोडे,अजय पवार,शुभम ठाकुर, निळकंठ मस्के,संजय तिवसकर,विशाल खरे,किशोर आत्राम, निर्मला जोशी,वंदना मुंढे

यासह भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अवकाळी पावसाने मोडले शेतकऱ्यांचे कंबरडे; पिकांचे मोठे नुकसान

नाशिक, ५ डिसेंबर : जिल्ह्यामध्ये गुरुवारी पहाटेच्या सुमारास झालेल्या अवकाळीपावसामुळे मोठे नुकसान झाले असून त्याचा फटका द्राक्ष कांदा व इतर पिकांनाही बसणार असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहे. जिल्ह्यातील बहुतांशी भागांमध्ये पाऊस पडला आहे.

दोन-तीन दिवसापासून नाशिक जिल्ह्यात ढगाळ वातावरण होतं. फेगान चक्रीवादळामुळे अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे हवामान खात्याच्या वतीने सांगण्यात येत होते. परंतु गुरुवारी मात्र नाशिक जिल्ह्यातील नाशिक सह इगतपुरी त्रंबक बागलाण सटाणा मालेगाव चा काही भाग नांदगाव येवला सह इतर काही भागांमध्ये काही ठिकाणी तुरळक तर काही ठिकाणी जोरदार पाऊस झाला. अचानक पहाटेच्या वेळी आलेल्या या पावसामुळे शेतकऱ्यांची चांगली तारांबळ उडाली तर शहरांमध्ये सकाळी कामासाठी जाणाऱ्या आणि इतर व्यवसायिकांची चांगलीच धावपळ झाली.

आधीच परतीच्या पावसाने हाहाकार केला होता. त्यातून कसाबसा शेतकरी वर्ग सावरत असताना, वाचलेल्या पिकांना तळ हाताच्या फोडाप्रमाणे जपत यातून मार्ग काढत थोड्या प्रमाणात का होईना हातात दोन पैसे मिळतील, या आशेवर जगात असताना आज आलेल्या अवकाळी पावसामुळे हातचे आलेले पीक देखील वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

**कांदा रोपांचे नुकसान होणार**

**आधीच सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अवकाळीमुळे कांदा, कांदे रोप, मका, पिकांचे नुकसान झाले होते. रब्बी हंगामातील कांदा लागवडीसाठी महागड्या दराने बियाणे खरेदी करून कांदा रोप टाकले आहे. या अवकाळी पावसाने कांदा रोप खराब होऊन नुकसान होणार आहे. आधीच्या नुकसानग्रस्त पिकांची भरपाई मिळाली नसतांना पुन्हा नवीन संकटाला सामोरे जावे लागत आहे.**

**- सुनील बागुल, शेतकरी,पिंपळदर**

परतीच्या पावसामुळे जे अतोनात नुकसान झालेले होते त्या नुकसानीचे पंचनामे करून शासकीय सोपस्कार पूर्ण करून तत्परता दाखविण्यात आली, आचारसंहिताचे कारण दाखवून वेळ मारून नेण्यात आली, त्याचा एक रुपयांही मदत रुपी मिळालेला नसताना,पीक विमा कंपनीने डोळ्यांवर पट्टी बांधून घेतलेली दिसत आहे. पीक विमा कंपनीकडून काही मदत मिळेल अशी कोणतीच आशा दिसत नाही.

ज्या प्रकारे सर्वच शेतकरी वर्ग लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीत लोकप्रतिनिधींच्या पाठीशी भक्कम पणे उभा राहिला. त्याची परतफेड करण्याची याहून मोठी संधी कुठलीच नसेल, याची जाण ठेवून लोकप्रतिनिधींनी शासन दरबारी आवाज उठवून जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावे. तसेच पीक विमा कंपनीकडून लवकरात लवकर पीक विमा मंजूर घ्यावा अशी मागणी शेतकरी वर्गाने केली आहे. बागलाण तालुक्यात तीन ते चार दिवसापासून ढगाळ वातावरण होते. तसेच दिवस भर धुके पसरलेले असायचे मात्र उत्तर महाराष्ट्रात पावसाची शक्यता कमी आहे असे हवामान विभागाकडून सांगण्यात येत होते. हवामान विभागाचे सर्व अंदाज खोटे ठरवत आज गुरुवारी सकाळी सात वाजता अचानक मुसळधार स्वरूपात अवकाळी पावसाला सुरवात झाली. या अचानक आलेल्या पावसामुळे शेतकरी वर्गाची झोपच उडाली.

# प्रा. मनोहर धोंडे यांना पत्नीशोक ; वैशालीताई धोंडे यांचे निधन



**तभा वृत्तसेवा**

**लोहा,दि.०५ डिसेंबर :** सेवा जनशक्ती पार्टी चे पक्षप्रमुख तथा शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे सर यांच्या पत्नी सौ. वैशालीताई मनोहर धोंडे वय ५५ वर्ष यांचे दि. ५ नोव्हेंबर रोजी पहाटे १.४० वाजता छत्रपती संभाजीनगर येथे एका खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले.

त्यांच्या पश्चात पती , १ मुलगा, २ मुली असा परिवार आहे. कै.वैशालीताई धोंडे या सेवा जनशक्ती पार्टी चे पक्षप्रमुख तथा शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.मनोहर धोंडे सर यांच्या पत्नी होत्या तर लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बसवेश्वर धोंडे यांच्या काकू व सरपंच कैलास धोंडे यांच्या वहिनी होत्या. कै. वैशालीताई धोंडे यांच्या पार्थिवावर त्यांचे मुळ गाव लोहा तालुक्यातील शेवडी बाजीराव येथे त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज यांचे उत्तराधिकारी राजशेखर महाराज,माजी आमदार मोहन अण्णा हंबर्डे, माजी आमदार रोहिदास चव्हाण,शिवसेनेचे महाराष्ट्र प्रदेश संघटक एकनाथ दादा पवार, शिवाचार्य डॉ . सिध्ददयाल् महाराज,भाजपाचे प्रा.एच डी गोपछडे, दत्ताभाऊ खंकरे, माजी शिक्षण संचालक गोविंद नांदडे,अविनाश भोसीकर, माजी शिक्षण सभापती संजय बेळगे, अरविंद ठक्करवार , संजय भोसीकर, बालाजी पांडागळे,संजय कंठाळे दत्ता वसमतकर, परमेश्वर सोलापूरकर,अनेक धर्म गुरूवर्य , यांच्यासह शेवडी ,पेनूर ,लोहा, कंधार,सोनखेड, नांदेड, लातूर, अहमदपूर ,परभणी, औरंगाबाद, सोलापुर सह महाराष्ट्र , कर्नाटक, तेलंगणा , आंध्रप्रदेश,हजारोंच्या संख्येने सामाजिक , शैक्षणिक , सर्व पक्षीय राजकीय क्षेत्रासहीत जनसमुदाय उपस्थित होता.

**लोहा बाजारपेठ बंद :** सौ.वैशालीताई मनोहर धोंडे यांच्या निधनाची वार्ता समजताच लोहा येथील व्यापाऱ्यांनी आपले दुकाने, प्रतिष्ठाणे बंद ठेवून सौ. वैशालीताई मनोहर धोंडे यांना श्रद्धांजली वाहिली.

# ग्रिस्टॅक योजना:शेतजमिन होणार आधार संलग्न

## प्रत्येक तालुक्यातील एका गावात सोमवार पासून अंमलबजावणी

छत्रपती संभाजीनगर,दि.५ : विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने व परिणामकारकरित्या पोहोचवता यावा यासाठी कृषी क्षेत्रासाठी सर्वसमावेशक डिजीटल पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी ग्रिस्टॅक (उ्‌ळसळींरश्र झ्रीलश्रळल खपषीरींीूीलींीीश षीं -सीळर्लीश्रींीश) ही योजना राबविण्यात येत असून या योजनेचे प्रत्यक्ष काम जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील एका गावात सोमवार दि.९ पासून सुरु करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले. त्यानंतर सखोल नियोजन करुन सोमवार दि.१६ पासून या योजनेच्या अंमलबजावणीची व्याप्ती जिल्हाभर करुन महिनाभरात हे काम पूर्ण करावे,असेही त्यांनी सांगितले.

ग्रिस्टॅक योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात आज जिल्हा नियोजन सभागृहात बैठक पार पडली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, अपर जिल्हाधिकारी डॉ.अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख तसेच सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी, कृषी विस्तार अधिकारी आदी उपस्थित होते.

शेतजमिन व पिकांच्या माहितीचा डिजीटल संच तयार करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असून यात शेतकऱ्यांची, त्यांच्या जमिनीची आणि त्यात त्यांनी लागवड केलेल्या पिकांची नोंद होणार आहे. यासाठी संपूर्ण प्रक्रिया डिजीटल पद्धतीने राबविण्यात येणार असून त्यासाठी मोबाईल प विकसित करण्यात आले आहे. त्याद्वारे ही नोंदणी होणार आहे. या अभियानात महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग संस्था, जमाबंदी आयुक्त आणि कृषी आयुक्त अशा तीन विभागांचा सहभाग आहे. सन २०२३-२४ मध्ये बीड जिल्ह्यात पथदर्शी प्रकल्प म्हणून ही योजना राबविण्यात आली आहे. तेथे इष्ट परिणाम दिसून आल्याने ही योजना आता रब्बी हंगामापासून राज्यभर राबविण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख यांनी दिली.

जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, गावपातळीवर जाऊन शेतकऱ्यांच्या नोंदण्या होतील यासाठी नियोजन तयार करावे. गावनिहाय कालबद्ध कार्यक्रम करुन तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांनी ही अंमलबजावणी करावी. प्रत्येक गावात मुक्कामी थांबून नोंदणी करावी. येत्या सोमवारी दि.९ रोजी प्रत्येक तालुक्यातील एका गावात ही नोंदणी करावी. त्याअनुभवाच्या आधारे पुढील नियोजन करावे,असे ही त्यांनी सांगितले.

ग्रिस्टॅक योजना

केंद्र शासनाच्या डिजीटल कृषी अभियानाचा भाग म्हणून ही योजना राज्यशासनातर्फे राबविण्यात येत आहे. कृषी क्षेत्रात डेटा व डिजीटल सेवा यांचा वापर करुन शेतकऱ्यांपर्यंत विविध शासकीय योजना पोहोचविण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे.

शेतकऱ्याचा आधार क्रमांक, शेतांची भुसंदर्भिकृत माहिती आणि शेतकऱ्याने आपल्या शेतात त्या त्या हंगामात लागवड केलेल्या पिकांची नोंद या तीन प्रकारच्या डिजीटल डेटाच्या आधारे या योजनेची अंमलबजावणी करण्यात येईल. यामुळे केंद्र आणि राज्य शासनातर्फे ज्या ज्या योजना शेतकऱ्यांसाठी राबविल्या जातात त्यांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे तसेच कृषी कर्ज, कृषी निविष्ठा, विपणन शिवाय तज्ज्ञांचे मार्गदर्शन, झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यासाठी करावे लागणारे सर्व्हेक्षण यासारख्या सुविधाही पोहोचविता येणार आहे. या शिवाय विविध योजनांचे अभिसरण करण्यासाठीही ही माहिती उपयक्त ठरेल.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा व तालुकास्तरापर्यंत अंमलबजावणी समित्या तयार करण्यात आल्या आहेत. जिल्हास्तरीय समितीत जिल्हाधिकारी हे अध्यक्ष असून निवासी उपजिल्हाधिकारी हे सदस्य सचिव आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय अधिकारी, राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्राचे अधिकारी, जिल्हाधिकारी यांनी निमंत्रित केलेले सदस्य हे या समितीचे सदस्य असतील.

या योजनेत शेतकऱ्याच्या शेताची माहिती घेऊन त्या माहितीशी शेतकऱ्याचा आधार क्रमांक जोडला जाईल. अशाप्रकारे राज्यातील सर्व शेतकऱ्यांची माहिती संकलित केली जाईल. त्याद्वारे शेतकऱ्यांना शेतकरी ओळख क्रमांक दिला जाईल. शेतकऱ्यांची ही माहिती गोळा करण्यासाठी तहसिलदार हे गावनिहाय पथके निर्माण करतील. प्रत्येक गावात हे पथक तीन दिवस मुक्कामी राहतील. या कालावधीत हे पथक योजनेचा प्रचार करुन शेतकऱ्यांचे ओळख क्रमांक तयार करण्याचेही काम करतील. मोहीम राबविण्याच्या आदल्या दिवशी सायंकाळी ग्रामसभा घेऊन लोकांना माहिती द्यावी. तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक यांना हे काम करता यावे यासाठी मोबाईल पही तयार करण्यात आले असून त्यामार्फत ही नोंदणी होणार आहे.


## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.एन. काटकर मॅडम दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र. ३३५/२०२४

अर्जदार - १- रामचंद्र पि. पदम राठोड, वय ४० वर्षे, धंदा शेती. रा. भिलदरी, सागव्हाण ता. कन्नड जि. औरंगाबाद २- बाबुलाल पि. पदम राठोड, वय ४४ वर्ष, धंदा शेती, रा. भिलदरी, सागव्हाण ता. कन्नड जि. औरंगाबाद ३- ग्यारसीबाई भ्र. पदम राठोड, वय ७५ वर्षे, धंदा घरकाम. रा. भिलदरी, सागव्हाण ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

अर्ज : वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे विधीज्ञ एस. आर. शिंदे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की. अर्जदार १ ते ३ हे वरील ठिकाणचे कायमचे रहीवाशी असून, अर्जदार क्र. १ व २ हे आपसात सख्खे भाऊ आहे, तसेच अर्जदार क्र. ३ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र. १ व २ यांचे वडील व अर्जदार क्र. ३ यांचे पती नामे पदम फत्तु राठोड हे होते ते दिनांक २८/०६/२०१९ रोजी मौजे भिलदरी, सायगव्हाण ता. कन्नड येथे मयत झालेले असुन त्यांचा अंत्यविधी सागव्हाण येथे झालेला आहे. सोबत मृत्यु प्रमाणपत्र दाखल करीत आहे.

अर्जदार यांना शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात देण्यासाठी तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच तहसिल कार्यालयात, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी, तसेच ग्राम पंचायत कार्यालयात नोंद करण्यासाटी, जिल्हाधिकारी कार्यालयात नोंद करण्यासाठी, पंचायत समीतो कार्यालयात नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी मा. न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे असे

सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे. त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्वांना सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन मिळाल्यापासुन ३० दिवसाचे आत मा. न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक १६/११/२०२४

आदेशावरुन

क. लिपिक सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड



## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/ सिआर-५२२ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

दिनांक १३/०९/२०२४

अर्जदार : शिवाजी फकीरराव पवार रा. अंधानेर ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय अंधानेर ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगीच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलगीचा जन्म दिनांक १२-०४-२०२१ रोजी अंधानेर ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगीचा जन्म दिनांक १२-०४-२०२१ रोजी अंधानेर ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगीचा जन्म दिनांक १२-०४-२०२१ रोजी अंधानेर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०६-११-२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १२-०४-२०२१ रोजी अंधानेर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक १३/०९/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता



## जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/ सिआर-६०५ उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

दिनांक २७/०९/२०२४

अर्जदार : अरूण दामोधर भोसले रा.आडगाव (पिशोर) ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय आडगाव (पि.) ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगाच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ०२-१२-१९९८ रोजी आडगाव (पि.) ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ०२-१२-१९९८ रोजी आडगाव (पि.) ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ०२-१२-१९९८ रोजी आडगाव (पि.) येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २०-११-२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०२-१२-१९९८ रोजी आडगाव (पि.) येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २७/०९/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता



## Municipal Council Bhokardhan Dist.Jalna

**Notice For Tender**

Municipal Counil Bhokardhan Dist. Jalna invites proposals from reputed and experienced companies to participate in the competitive bidding process to Purchasing of Various Fire Safety Equipments Under Agnishaman Balkatikaran Yojna.

For the Detailed Tender Document, interested bidders should visit www. mahatenders.com.

Tender submission would be online and the deadline to submit the proposals is 17.12.2024 evening 04:00P.M.

**(Santosh Waghmare)**
Chief Officer
Municipal Council Bhokardhan

## अग्रलेख...

# पाकिस्तानच्या मार्गावर निघालेला बांगलादेश

शेख हसीना यांच्या विरोधातील कारस्थान यशस्वी झाल्यानंतर गेल्या चारेक महिन्यांपासून बांगलादेश एका वेगळ्या स्थितीतून जात आहे. हसीना यांना पदच्युत केल्यानंतरच्या काळात बहुसंख्यकांचा उन्माद वाढले, अल्पसंख्यकांवर हल्ले होणे आणि या हल्ल्यांचा विरोध केला म्हणून इस्कॉन या सेवाभावी संघटनेचे नेते चिन्मय कृष्ण दास यांना अटक होणे, इस्कॉनवर बंदी घालण्याची मागणी होणे, इस्कॉनच्या लोकांना कुठेही जाण्यास अटकाव करणे असे सारे अकल्पित वाटेल, असे बांगलादेशात घडू लागले आहे. इस्कॉनचा अपराध एवढाच की, त्या संघटनेने हिंदूंवरील अत्याचाराला संघटित विरोध दर्शविला आणि अल्पसंख्यकांना सरकारने संरक्षण द्यावे, अशी मागणी केली. बांगलादेशातून शेख हसीना यांना पदच्युत करण्यात आले. सध्या बांगलादेशच्या हंगामी सरकारचे प्रमुख नोबेल विजेते मोहम्मद युनुस हे आहेत. समाजाच्या शेवटच्या थरातील लोकांच्या आर्थिक सबलीकरणासाठी मायक्रो फायनान्सची संकल्पना मांडणारे हेच ते डॉ. मोहम्मद युनूस. हा माणूस अर्थशास्त्रात पीएच. डी. झालेला. त्यांना शांततेचा नोबेल पुरस्कार २००६ मध्ये मिळाला होता. पण, त्यांच्या नेतृत्वातील हंगामी सरकारला बांगलादेशात शांतता प्रस्थापित करण्यात यश येताना दिसत नाही. बांगलादेशाची स्थापना ही प्रादेशिक व सांस्कृतिक ओळख तसेच धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांवर झाली होती. बंगाली मुस्लिमांना इतर प्रदेशातील मुस्लिमांच्या तुलनेत उदार मानले जाते. त्यांचे बांगला संस्कृती, खाद्य, वस्त्र प्रावरणे आणि रीतिरिवाज यावर प्रेम आहे. बांगलादेशाचे राष्ट्रगीत 'आमार शोनार बांगला' हे असून ते गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांनी लिहिलेले आहे. स्वतंत्र राष्ट्र म्हणून उदयास आल्यावर काही वर्षांनी बांगलादेशात पुन्हा धर्मवेडाने शिरकाव केला. सत्तांतरे झाली, लष्करी बंड झाले. गेल्या काही दशकांपासून शेख हसीना आणि खालिदा झिया या दोन महिलांभोवती बांगलादेशचे राजकारण फिरत असते. काही महिन्यांपूर्वी बांगलादेश अवामी लीगच्या नेत्या आणि बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांना पदच्युत करण्यात आले. त्यांना देश सोडावा लागला. बांगलादेश नॅशनॅलिस्ट पार्टीच्या बेगम खालिदा झिया या शेख हसीना यांच्या राजकीय स्पर्धक-विरोधक. गेल्या २५-३० वर्षांपासून या दोघींनीच बांगलादेशचा कारभार चालविला आहे. एखाद्या मुस्लिमबहुल देशाचा कारभार दीर्घकाळ महिलांकडून चालविला जात असल्याचे बांगलादेश हे आशियातले एकमेव उदाहरण. आशियातला अल्पकालीन अपवाद म्हणजे पाकिस्तानच्या बेनझीर भुट्टो. १९७१ मध्ये भाषिक एकता, सांस्कृतिक अस्मिता आणि धर्मनिरपेक्षतेशी असलेली बांधिलकी या आदर्शातून बांगलादेशाचा जन्म झाला. १९७१ चा मुक्ती संग्राम हा केवळ स्वातंत्र्याचा लढा नव्हता तर सांस्कृतिक अस्मिता आणि धर्मनिरपेक्षता जपण्याची धडपडही होती. १९७२ च्या संविधानाने ही तत्त्वे अंगीकारली आणि बांगलादेशाला धर्मनिरपेक्ष प्रजासत्ताक घोषित केले. बांगलादेशची सुरुवातीची वर्षे अल्पसंख्यक समुदायांना एकत्रित करण्यासाठी आणि धार्मिक भेदापेक्षा सांस्कृतिक वारशाला महत्त्व देणारी प्रादेशिक व राष्ट्रीय ओळख निर्माण करण्यासाठी वापरली गेली. मात्र, लगेच तेथे राजकीय हत्यासत्र, लष्करी उठावांची मालिका सुरू झाली. यादरम्यान आशियातील धर्मनिरपेक्ष तसेच प्रगतिशील मुस्लिम राष्ट्र ही ओळख बांगलादेशाने दीर्घकाळ टिकविली. तयार कपड्यांसह एकूणच वस्त्रोद्योगात बांगलादेशने मोठी भरारी घेतली. अगदी अलिकडच्या काळापर्यंत वेगाने वाढत असलेल्या अर्थव्यवस्थांमध्ये बांगलादेशाचा समावेश होता. एकीकडे पाकिस्तानमध्ये अंतर्गत कलह जोरात असल्यामुळे त्या देशाचा विकास ठप्प झालेला. अशात बांगलादेश विकसित होत होता आणि त्याचे कारण होते तेथे धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वामुळे बऱ्यापैकी शांतता आणि स्थैर्य होते. ताज्या घडामोडी हे सांगतात की, बांगलादेशमधील शांतता आणि स्थैर्य भंग पावले आहे. त्यामागे गतकाळातील काही घटक कारण ठरले आहेत. एकीकडे औद्योगिक प्रगती सुरू असताना बहुसंख्यक वादाचा अनुनय करण्यासाठी बांगलादेशात मदरसा शिक्षणाला पाठबळ मिळू लागले. पुराणमतवादी विचारसरणीला प्रोत्साहन दिले जाऊ लागले. आर्थिक असमानता होतीच. ती हळूहळू दूर झाली असती. पण, कट्टरपंथीयांनी असमानतेचा वापर धार्मिक द्वेषाची पेरणी करण्यासाठी सुपीक जमीन म्हणून केला. त्यातून संघर्ष वाढले. हिंदू, बौद्ध आणि ख्रिश्चन यांसारख्या अल्पसंख्यक समुदायांना भेदभाव आणि हल्ल्यांना सामोरे जावे लागले. जातीय हिंसाचार वाढला. दुर्गापूजेदरम्यान हिंदू मंदिरांवरील हल्ले किंवा ब्लॉगर्सच्या हत्या यासारख्या घटनांनी तेथील परिस्थिती चिघळत असल्याकडे आधीच अंगुलिनिर्देश केला होता. शेख हसीना यांना पदावरून घालवण्याची घटना हा दीर्घकाळ सुरू असलेल्या कटाचा शेवट नव्हता; तो मध्यंतर होता, हे आता स्पष्ट झाले आहे. कारण आता बांगलादेशात कुणीही प्रगती, अर्थकारणावर बोलत नाही. अल्पसंख्यकांचा विरोधात बोलणे आणि त्यांच्यावर हल्ले करणे हा राष्ट्रप्रेमाचा पुरावा बनला आहे. महिलांच्या हक्कांवरही गदा आली आहे. खरे तर बांगलादेशने भारत आणि पाकिस्तान यांच्या उदाहरणातून शिकावे, असे बरेच काही आहे. भारताची फाळणी धार्मिक मुद्द्यावर झाली होती. तरीही भारताने धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाचा अंगीकार करून जागतिक स्तरावर नेता बनण्यापर्यंतची प्रगती साध्य केली. धार्मिक आधारावर निर्माण झालेला पाकिस्तान मात्र फेल्ड स्टेट ठरला. बांगलादेशाच्या निर्मितीत भारताची भूमिका होती. त्यामुळे त्या देशाचे भारताशी चांगले संबंध होते. अचानक त्या संबंधांत मिठाचा खडा पडल्यागत झाले. बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचारात प्रचंड वाढ झाली. भारतातही धार्मिक वैविध्य भरपूर आहे. लोकसंख्याही मोठी आहे. तरीही भारतीय संविधानानुसार राज्यकारभार हाकले जात असल्यामुळे देशात शांतता, स्थैर्य आहे. ते असल्यामुळेच प्रगती आहे. भारताचे अनुकरण करणे बांगलादेशला शक्य होते. ते त्याने केले तोपर्यंत त्याचा विकास झाला. आता तो पाकिस्तानचे अनुकरण करायला निघाला असेल तर त्याचा विनाश ठरलेला आहे. याचे कारण असे की, कोणत्याही धर्माचा अतिरेक हा आधुनिक काळात प्रगतीचे मार्ग अवरुद्ध करतो. त्यातही इस्लामी कट्टरपंथी हे तर अडथळ्यांसाठीच ओळखले जातात. भारतात असोत, पाकिस्तानात असोत की बांगलादेशात; इस्लामी कट्टरपंथीयांना देशाविषयी आपुलकी वाटत नाही. त्यामुळे शांततामय सहजीवनाच्या तत्त्वावर त्यांचा विश्वास नसतो. बांगलादेशात जे काही घडते आहे, त्यावरून असे वाटते की, तो देश पाकिस्तानच्या मार्गावर निघालेला आहे. तसे झाले तर तिथली परिस्थिती आणखी बिकट होईल. म्हणायला घटनात्मक सुधारणा आणि सर्वसमावेशक धोरणांच्या निर्मितीची जबाबदारी अंतरिम सरकारकडे देण्यात आलेली आहे. मात्र, कट्टरपंथीयांचा दबाव कायम राहणार असेल तर अंतरिम सरकार फारसे काही करू शकेल, असे वाटत नाही. भारताने बांगलादेशच्या सरकारने अल्पसंख्यकांना संरक्षण देण्याचे आवाहन केलेले आहे. तरीही इस्कॉनसारख्या सेवाभावी संघटनेला दाबून टाकण्याचे प्रयत्न बांगलादेशात सुरूच आहेत. त्यांच्या कार्यकर्त्यांना, प्रचारकांना, समर्थकांना अटक करणे सुरू आहे. यातून शांतता कधीच निर्माण होऊ शकत नाही. शांततेचा मार्ग सामंजस्यातून जातो आणि सामंजस्य केवळ मोकळ्या चर्चेतून प्राप्त केले जाऊ शकते. अजूनही वेळ गेलेली नाही. बांगलादेशातील अंतरिम सरकारने पुढाकार घेऊन सर्वात आधी अल्पसंख्यकांवरील हल्ले, हिंदूंवरील अत्याचार, इस्कॉनची मुस्कटदाबी हे सारे प्रकार थांबविले पाहिजेत. सर्वसमावेशकतेचे धोरण बांगलादेशासाठी नवे नाही. ते स्थापनेपासून तेथे अस्तित्वात होतेच. मध्यंतरी हा देश कट्टरपंथीयांमुळे भरकटला आणि आज विनाशाच्या काठावर पोहोचला आहे. धार्मिक वेडाचाराच्या अंधारडोहात उडी मारून स्वतःला कायमचे संपवून घ्यायचे की धर्मांधतेला गाडून नव्या प्रगतीच्या क्षितिजांकडे झेप घ्यायची, हे बांगलादेशाच्या अंतरिम सरकारला आणि तिथल्या बहुसंख्यक मुस्लिमांना ठरवायचे आहे. अल्पसंख्यकांना मारणे आणि धाकात ठेवणे यातच बांगलादेशीयांना पुरुषार्थ वाटत असेल तर अल्लाहदेखील त्यांचे रक्षण करू शकत नाही, हे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे.

## प्रासंगिक

राहुल गोखले

# आत्मक्लेश, आत्मपरीक्षण अन् आत्मवंचना!

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालांनी राज्यातील महाविकास आघाडीसमोर अस्तित्वाचा प्रश्न उभा केला असल्याने त्या आघाडीचे तिन्ही घटक पक्ष निकालांच्या वैधतेवर प्रश्न उपस्थित करीत आहेत, हे एक वेळ समजू शकते; कारण ते त्यांच्या बिथरलेपणाचे द्योतक आहे. तथापि, स्वतःस बिगर-राजकीय म्हणवून घेणारे समाजसेवक आणि लोकशाहीचे आपणच काय ते कैवारी असा दावा करणारे विश्लेषक व सामाजिक कार्यकर्त्यांनी महाविकास आघाडीच्या घटक पक्षांच्या नेत्यांच्या भूमिकेची री ओढण्याचे काही कारण नव्हते. त्यामुळे एक बरे झाले. या मंडळींच्या भूमिका वस्तुनिष्ठ नाहीत, हे पुन्हा एकदा उघड झाले. मतदान यंत्रांच्या मुद्यावरून सर्वोच्च न्यायालयात धाव घेतलेल्या के. ए. पॉल यांची जनहित याचिका फेटाळून लावताना न्यायमूर्ती विक्रम नाथ यांनी अतिशय मार्मिक आणि तितकीच तिखट टिप्पणी केली. 'तुम्ही हरलात की मतदान यंत्रांशी छेडछाड झालेली असते आणि तुम्ही जिंकलात की मतदान यंत्रांशी छेडछाड झालेली नसते' अशी टिप्पणी त्यांनी केली. पॉल यांना भारतातील मतदान यंत्रांद्वारे मतदानाची पद्धत का बदलायची आहे, असे विचारता पॉल यांनी 'आपण १५५ देशांचा प्रवास करून आलो आहोत आणि तेथे मतपत्रिकांवर मतदान घेण्यात येते' असा युक्तिवाद केला. तेव्हा 'भारताने वेगळा मार्ग का स्वीकारू नये?' असा प्रश्न न्यायालयाने पॉल यांना विचारला. त्यावर निवडणुकीतील भ्रष्टाचार रोखण्यासाठी, असे कारण पॉल यांनी दिले. या युक्तिवादास काहीएक अर्थ नव्हता आणि त्यामुळे ती याचिका फेटाळून लावणे एवढाच पर्याय न्यायालयासमोर होता. असले उद्योग करून दिशाभूल करू पाहणारे पॉल एकटे नव्हेत.

पुण्यात समाजसेवक बाबा आढाव यांनी मतदान यंत्रांच्या विरोधात आत्मक्लेश उपोषण केले. मतदान यंत्रांचा वापर सुरू झाला तो काँग्रेसच्या काळात. त्याच यंत्रांद्वारे मतदान होऊन काँग्रेस आणि बिगर भाजपा पक्ष २०१४ सालापर्यंत केंद्रासह राज्यांत सत्तेत येत होते. त्यावेळी मतदान यंत्रांत काही छेडछाड होत आहे, असे आढाव यांना वाटले नाही; ना त्यांच्या उपोषण स्थळी जमलेल्या महाविकास आघाडीच्या नेत्यांना वाटले. आता केवळ भाजपाला सत्ता मिळत आहे म्हणून मतदान यंत्रांवर खापर फोडायचे हा केवळ दुटप्पीपणा नव्हे तर दांभिकपणा झाला. अर्थात समाजवादी आणि काँग्रेसजन असल्या दांभिकपणासाठीच ओळखले जात होते आणि जातात. आणिबाणीनंतर सत्तेत आलेल्या जनता पक्षाच्या सरकारला सुरुंग समाजवाद्यांमधीलच एका गटाने लावला होता. जनसंघाच्या सदस्यांच्या कथित दुहेरी सदस्यत्वाचा मुद्दा या हेकेखोर समाजवाद्यांनी त्यावेळी ऐरणीवर आणला होता. त्याने जनता पक्षाचे सरकार कोसळलेच; पण जो बिगर काँग्रेसवादाचा प्रयोग जुळवून आणलेला होता, त्याला कायमचा सुरुंग लागला. त्यानंतर अशी बिगर काँग्रेसवादाची मोट कधीच दिसली नाही. अर्थात प्रश्न तो नाही. प्रश्न आहे समाजवाद्यांच्या अगोचरपणाचा.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांचे निकाल इतके भिन्न कसे, असा प्रश्न याच समाजवाद्यांनी उपस्थित केला आहे. या प्रश्नाचा एकच अर्थ; तो म्हणजे ते पूर्णपणे हतबल झाले आहेत. त्या अगतिकतेमुळे नेमके कोणते प्रश्न विचारायचे हेही त्यांना समजेनासे झाले आहे. याचे कारण हा बदललेला कल केवळ महाराष्ट्रात पाहायला मिळाला आहे असे नाही तर झारखंडमध्येदेखील तसेच घडले आहे. झारखंडमध्ये लोकसभा निवडणुकीत भाजपाप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने १४ पैकी तब्बल ९ जागांवर विजय मिळविला होता. विधानसभा मतदारसंघांच्या फूटपट्टीवर भाजपा व मित्रपक्षांची सुमारे ५१ जागांवर आघाडी होती. मात्र, महाराष्ट्राबरोबरच झालेल्या विधानसभा निवडणुकीत झारखंड मुक्ती मोर्चा प्रणीत आघाडीने ५६ जागांवर विजय मिळवीत सत्ता प्राप्त केली; तर भाजपाला अवघ्या २१ जागा जिंकता आल्या. झारखंडमध्ये जनादेशात एवढा बदल कसा झाला असा प्रश्न या समाजवाद्यांपैकी किंवा त्यांच्या भोवती गोळा झालेल्यांपैकी कोणाला पडलेला नाही आणि पडला असल्यास तसा कोणी उपस्थित केलेला नाही.

महाराष्ट्रात मात्र असा कलबदल होणे म्हणजे 'सत्तामेव जयते' असा हा अतार्किक युक्तिवाद आहे. अर्थात हा केवळ अतार्किकपणा नव्हे किंवा खरोखरच लोकशाहीचा असणारा कळवळा तर मुळीच नव्हे, एवढा आटापिटा करूनदेखील आपण भाजपाचा वारू रोखू कसे शकलो नाही, ही ठसठस त्यातून जास्त डोकावते. जातिभेदापासून सर्व आयुधे भाजपाच्या विरोधात वापरूनदेखील भाजपाला १३२ जागांवर विजय मिळतो, हे पचनी पडणे कठीण असल्याने स्वतःची समजूत घालण्यासाठी आता मतदान यंत्रांवर खापर फोडणे, पुन्हा मतपत्रिकेवर मतदान घेण्यात यावे यासाठी सह्यांची मोहीम आखणे, उपोषण करणे इत्यादी उद्योग केले जात आहेत. अशाने या मंडळींचा केवळ दांभिकपणाच चव्हाट्यावर येतो आहे असे नाही तर त्यांचे हसे होत आहे. समाजवादी काय किंवा काँग्रेस काय अथवा काँग्रेसचे मित्रपक्ष काय; लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला मात दिली तेव्हा मोदींच्या बहुमताला महाराष्ट्राने आळा घातल्याच्या उकळ्या याच मंडळींना फुटत होत्या. सर्वोच्च न्यायालयाने केलेली टिप्पणी येथे चपखल लागू पडते. लोकसभा निकालांमध्ये समाजवादी आणि काँग्रेस व मित्रपक्षांना राजकीय बदलाचा प्रारंभ दिसत होता; लोकशाहीचा विजय दिसत होता आणि भाजपाच्या घसरगुंडीची सुरुवात दिसत होती. आता अपेक्षाभंग झाल्याने मतदान यंत्रांचा हा विजय असल्याची आवई उठवली जात आहे. हा सगळा निव्वळ भंपकपणा आहे, यात शंका नाही. जनतेने आपल्याला नाकारले आहे हे स्वीकारून त्याच्या कारणांचा शोध घेण्याऐवजी असल्या रडकेपणात विरोधक धन्यता मानत आहेत. ते एकवेळ क्षम्य कारण पराभूत मनःस्थितीत त्यांच्याकडून उमदेपणाची अपेक्षा करता येणार नाही. प्रश्न स्वतःस समाजसेवक म्हणवून घेणाऱ्यांनी त्यात सामील व्हावे का हा. एखाद्या प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह लावणे, यात वरकरणी गैर काही नाही. त्यात प्रामाणिकपणा असेल तर त्याचे स्वागतच करायला हवे. मात्र त्यात सोयीस्करपणा असेल तर मात्र त्यामागील हेतूंवर प्रश्नचिन्ह लागल्याखेरीज राहत नाही. आपले आंदोलन भाजपाविरोधात आहे असे सकृद्दर्शनी भासवायचे नाही; आपला दृष्टिकोन व्यापक उद्दिष्टांसाठी आहे, असा दावा करायचा आणि प्रत्यक्षात २०१९ साली जनादेशाचा अवमान करणाऱ्यांच्या हस्तेच उपोषण सोडायचे हा विरोधाभास जनतेला समजत नाही, असे मानण्याचे कारण नाही. भाजपाला सत्ता मिळाली की लोकशाही धोक्यात येते आणि बिगर भाजपा पक्षांना सत्ता मिळाली की लोकशाही जिंकते, असा दुजाभाव करून आपण आपली वैचारिक दिवाळखोरीचे प्रदर्शन मांडत आहोत, याचे तरी भान राखणे गरजेचे. कोणीही आत्मक्लेश करून घेण्यास कोणाची हरकत असण्याचे कारण नाही. पण ज्यांना आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे अशांच्याच गराड्यात ते करणे ही आत्मवंचना झाली!

९८२२८२८८१९

## वेध

गिरीश शेरेकर

# आता स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांची लगबग

लोकसभा निवडणुकीनंतर नुकत्याच महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या. आता कोरोनापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे वेध लागले आहेत. सध्या निवडणुकांचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात आहे. याच महिन्यात त्यावर सुनावणी होऊन निकाल आला तर येत्या मार्च महिन्यात या निवडणुका होतील, अशी चर्चा आहे. त्यामुळेच इच्छुकांची लगबग सुरू झाली आहे. आपल्या देशात कुठे ना कुठे वर्षभर कोणत्या ना कोणत्या निवडणुका सुरूच असतात. हा प्रकार कुठे तरी थांबावा म्हणून 'एक देश एक निवडणूक' ही संकल्पना पुढे आली. त्या अंतर्गत लोकसभा व सर्व विधानसभांच्या निवडणुका एकाच वेळी घेण्याचा मानस आहे तर स्थानिक स्वराज संस्थांचा निवडणुकादेखील एकाच टप्प्यात व्हाव्यात, असे अनेकांना वाटते. दोन्ही संकल्पनांवर काम सुरू आहे. त्या संदर्भातला अहवाल माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या समितीने सादर केला आहे. केंद्र सरकार त्यावर गंभीरतेने विचार करीत असून, त्या संदर्भातले विधेयक लोकसभेत येण्याची शक्यता आहे. हे विधेयक पारित झाल्यास वारंवार होणाऱ्या निवडणुकांच्या डोकेदुखीतून कर्मचाऱ्यांची सुटका होणार आहे. प्रशासकीय यंत्रणा पाच वर्षांतून एकदाच निवडणुकीत गुंतणार आहे. प्रशासकीय कामाला त्यातून गती मिळणार असून हा निर्णय लाखमोलाचा ठरणार आहे. नागरिकांनादेखील मोठा दिलासा त्यातून मिळेल.

प्रत्येक पक्षाला आपले संघटन मजबूत करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका फारच उपयोगी ठरत असतात. कार्यकर्त्यांची दमदार फळी तयार होऊन नवे नेतृत्व या निवडणुकांमधून समोर येत असते. या निवडणुकांची गेल्या तीन वर्षांपासून सर्वपक्षीय कार्यकर्ते आतुरतेने वाट पाहत आहे. ओबीसी आरक्षण, प्रभागांची संख्या व अन्य मुद्द्यांमुळे निवडणुकांचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहोचले आहे. त्यावर काही सुनावण्या झाल्या असून तारीख पे तारीख मिळत आहे. सदर प्रकरणावर याच महिन्यात पुन्हा सुनावणी होऊन निकाल येण्याची शक्यता आहे. राज्यात एकूण २८ हजार ८१३ ग्रामपंचायती आहेत. त्यातील बहुतांश ग्रामपंचायतींच्या निवडणुका मध्यंतरी झाल्या होत्या. पण, राज्यातल्या २९ महानगर पालिका, २३२ नगर परिषदा, ३४ जिल्हा परिषदा, ३५५ पंचायत समित्यांच्या निवडणुका काही एक-दोन अपवाद वगळता थांबलेल्या आहेत. या निवडणुका आता लवकरच होतील, अशी चर्चा जोरात सुरू झाली आहे. भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस या महायुतीच्या तीन पक्षांना विधानसभेत चांगले यश मिळाल्याने या पक्षाचे स्थानिक कार्यकर्ते उत्साहित आहेत. ते स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या तयारीला लागले असून निवडणुका लवकर झाल्यास विधानसभेसारखा फायदा होऊ शकतो, अशी भावना या कार्यकर्त्यांची असल्याने त्यांचा निवडणुकांसाठी पाठपुरावा सुरू झाला आहे.

राज्यात भाजपाच्या नेतृत्वात नवे सरकार स्थापन झाल्यावर स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या हालचालींना वेग येऊ शकतो. महायुतीच्या मावळत्या सरकारने जो निर्णय घेतला होता, त्याच निर्णयानुसार प्रभाग रचना राहते की बदलते, याकडे आता लक्ष आहे. आरक्षणाचादेखील प्रश्न आहे. हे दोन्ही मुद्दे न्यायालयात चर्चेला आहेत. सर्व प्रश्न निकाली काढल्यावरच स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचा मार्ग मोकळा होणार आहे. जवळपास तीन वर्षांपासून थांबलेल्या या निवडणुका न्यायालयाचा आदेश होताच सरकारला घ्याव्या लागणार आहे. निर्णय झाल्यावर दहावी आणि बारावीच्या परीक्षा आटोपल्यावर या निवडणुका होऊ शकतात. सत्तेत बसणारे सरकार फार विलंब करणार नाही. कारण सध्या त्यांच्या बाजूने वातावरण आहे. त्याचा फायदा ते निश्चित घेण्याचा प्रयत्न करणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था थेट नागरिकांशी जुळलेल्या असतात. सर्वसामान्यांना ज्या प्राथमिक अडचणी येतात, त्या निकाली काढण्याचे कामच या संस्थेच्या कर्मचाऱ्यांकडे व लोकप्रतिनिधींकडे असते. पण, तीन वर्षांपासून निवडणुकाच न झाल्यामुळे लोकप्रतिनिधी नाही. सर्व कारभार प्रशासकांच्या हाती आहे. जाब विचारणारा स्थानिक पातळीवरचा प्रतिनिधीच नसल्यामुळे कारभार सैरभैर झाला आहे. अधिकारी व कर्मचारी बिनधास्त आहेत. छोट्या छोट्या कामासाठी नागरिकांना हेलपाटे घ्यावे लागत आहे. ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात मूलभूत सुविधांच्या अडचणी जास्त आहेत. एकदा लोकनियुक्त व्यवस्था उभी झाल्यास नागरिकांना आपल्या समस्या मांडण्याचे हक्काचे व्यासपीठ मिळणार असल्याने निवडणुका आवश्यक आहेत.

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# परंतु अन्न वाया दवडणे, हा धर्म नव्हे!

आपल्या भारतीय संस्कृतीत अन्न हे पूर्णब्रह्म म्हणून ओळखले जाते. अन्नग्रहणाला 'उदरभरण नोहे, जाणिजे यज्ञकर्म' म्हटले आहे. श्रीमद्भगवद्गीतेत 'पचाम्यअन्नम् चतुर्विधम्- भक्ष्य, लेय्य, पेय्य, चोश्य' हे अन्नाचे प्रकार मीच पचवतो, हे भगवंतांनी सांगितले आहे. थोडक्यात भारतीय जीवन पद्धतीत अन्न हे देवस्वरूप आहे. पंचतत्त्वाची महत्त्वपूर्ण कडी आणि न्यून परिपूर्णता अन्न आहे.

सर्वांत प्रथम आकाशतत्त्व आहे. आकाशतत्त्वातून वायुतत्त्व निर्मिती आहे. वायुतत्त्वातून अग्नितत्त्व निर्माण झाले. अग्नीतून जलतत्त्व आणि जलतत्त्वातून पृथ्वीतत्त्व निर्माण झाले. पृथ्वीतत्त्वातून अन्न तयार झाले. थोडक्यात अन्न हे पंचतत्त्वाचा अर्क आहे. या अर्काचे मूर्तस्वरूप म्हणजे आपला देह आहे. आपला देह हा पंचतत्त्वांचा बनलेला आहे. म्हणजे पंचतत्त्वाचे स्थूलस्वरूप देह आहे.

जर अन्नाचे इतके महत्त्व आहे तर अन्नाकडे आपण 'पूर्णब्रह्म' म्हणून गांभीर्याने पाहतो का? तर, याचे उत्तर नाहीच येईल. जगात अजूनही अब्जावधी लोक दररोज उपाशी झोपतात. आपण रोज जे खरकटे टाकतो, त्यात किंवा शिळे अन्न म्हणून फेकून देतो, त्यात करोडो लोक जेवू शकतात. पण त्याकडे आपण अजिबात लक्ष देत नाही. आपली कुटुंब संख्या जितकी, तितक्या प्रमाणात आपण अन्न शिजवतो का? याचेही उत्तर नकारार्थीच येईल. एखाद्या दिवशी अंदाज चुकला तर आपण समजू शकतो. पण रोजच्या रोज पातेलेभरून भाज्या, पोळ्यांची थप्पी आणि भाताचे कुप्पे वाया जात असतील तर आपल्याला चिंतनाची गरज आहे.

घरातील शीतकपाट (फ्रिज) एकदा इमानदारीने उघडा आणि मनातून तपासा. खराब झालेले दही-दूध, सडलेला पालक, पिचलेले टमाटे, घट्ट वरण असे अनेक अन्नपदार्थ आठवडा आठवडा तसेच पडून असलेले दिसतील. म्हणजे अन्न खराब होऊ नये म्हणून फ्रिजमध्ये अनेक दिवस ठेवतात आणि मग खराब झाले म्हणून फेकून दिले जातात. फ्रिजच्या फ्रीजरबद्दल न बोललेले बरे. बर्फाने ओतप्रोत भरलेला फ्रीजर; बर्फात अडकलेले हिमक्रीम, पेय आणि बरेच काही. काही लक्षात येते का आपल्या?

दरवर्षी लोणचे घालण्याचा मिथ्याग्रह शेजारीण घालते म्हणून मी घातलेच पाहिजे म्हणून उगाच दिसता घाट करायचा आणि दोन-चार महिन्यांनी खराब झाले म्हणून रात्री चोरून कचराकुंडीत टाकून आमचे लोणचे चविष्ट झाले म्हणून 'संपले सर्व'ची दवंडी पिटायची. आग्रहपूर्वक फळफळावळ आणायची आणि दोन-चार दिवस न खाताच तसेच पडून राहतात आणि खराब झाले म्हणून फेकून द्यायचे. विशेषतः डाळिंब, सफरचंद, शेवटची दोन-चार केळी हमखास फेकून दिली जातात. चिरायचा, सोलायचा कंटाळा हे त्याचे कारण.

घरात अन्न तयार असून उगाच पिज्झा, मंच्युरियन किंवा हॉटेलातील पदार्थ आणायचे. ते पण पूर्ण न खाता सकाळी फेकून द्यायचे, रात्रीच्या उरलेल्या शिळ्या अन्नासोबत. अन्न आणि पैशाचा अपव्यय उगाच. धान्यसाठा हवा घरात म्हणून पोत्याने धान्य विकत घ्यायचे. त्याची काळजी न घेता तशीच साठवण करायची. दोन-तीन महिन्यांतच कीड लागली म्हणून त्यातले अर्धाधिक धान्य फेकून द्यायचे. कुरडया, खारोड्या, शेवया बनवायच्या; हल्ली विकत आणतात. त्या डब्यात घालून ठेवायच्या. त्या आहेत याचा विसर पडतो. काही दिवसांनी कुठल्या तरी कारणांनी डब्यापर्यंत आपण पोहोचतो. लक्षात येते की, अरे! याचा तर वास येतोय. मग काय! द्या फेकून. सातूचे पीठ, लाह्याचे पीठ, मेतकूट यांच्याबाबतीतही हेच होते. वर्षभरातील अन्नाचा विचार केला तर जवळजवळ ३० टक्के अन्न वरील प्रकारे वाया दवडतो आपण. याला समर्थांनी 'अधर्म' म्हटले आहे. पूर्वी आपल्याकडे म्हणायचे की, 'खाऊन माजा, टाकून माजू नका!' पूर्वीच्या काळी स्वयंपाकापूर्वी अंदाज घेतला जायचा. त्यानुसार स्वयंपाक केला जायचा. एकत्रित भोजन घेतले जायचे. अन्नपूर्णा असायची. एक माणूस जेवू शकेल इतके अन्न घरात असायचे, पण वाया जाईल इतके शिजत नसे. आणि चुकलाच अंदाज एखादवेळी तर दुसरे दिवशी 'शिळीसप्तमी' असायची. म्हणजे भात उरला तर त्याला फोडणी देऊन चमचमीत फोडणीचा भात बनायचा. पोळ्या उरल्या तर तुकडे बनवले जायचे. त्या पदार्थातील शिळेपणा मारून टाकला जायचा. ते खाण्यातही किती उल्हास असायचा. उल्हास गृहिणीमध्येही आणि खाणाऱ्या कुटुंबीयांमध्येही असायचा. दुर्दैवाने हा उल्हास घराबाहेर कुठेतरी हरवला. 'गाडीवाला आया घरसे कचरा निकाल' हा भोंगा कानावर पडताच शिळे पदार्थ वापरात आणण्यापेक्षा फेकून देण्याचीच घाई. लक्षात ठेवा! लग्न समारंभादी विविध कार्यक्रमांत होणारी अन्नाची नासाडी न बघवता येणारी आहे. रेल्वे किंवा इतर प्रवासात खाणे कमी आणि फेकून अधिक देतात माणसे. अन्न पूर्णब्रह्म आहे. त्याचा आदर करा. अजूनही दुर्गम भागात मागून आणलेल्या पोळ्या-भाकरी उन्हात सुकविल्या जातात. वर्षभर त्याच भाकरी शिजवून खाल्ल्या जातात. इतकी बिकट स्थिती अन्नाची आहे. अनेक जण अन्नान्न जीवन जगत आहेत जगात.

अन्न सुरक्षा निर्देशांकात भारत ११३ प्रमुख राष्ट्रांतून ६८ व्या क्रमांकावर आहे. वैश्विक उपासमारीत भारत १२५ प्रमुख देशांपैकी १११ व्या क्रमांकावर आहे. भारतात १९५ दशलक्ष कुपोषित बालके आहेत. बिकट स्थिती त्यांच्यावर आहे. आपल्यावर जर ही स्थिती नसेल तर देवाची कृपा समजा. आपल्या घरातील अन्नाचा कणही वाया जाणार नाही, याची काळजी घ्या.

स्वयंपाक करताना घरातील सर्व यथेच्छ जेवले पाहिजेत याची काळजी घ्या; पण जेवढे आवश्यक तितकेच शिजवा. फळफळावळ जरूर आणा, पण ती फळे केवळ चिरण्याचा कंटाळा म्हणून वाया जातात. कुणीतरी पुढाकार घेऊन चिरली पाहिजेत; विशेषतः डाळिंब फोडून दाणे काढून त्यावर चव म्हणून मीठ-साखर घालून सर्वांना खायला दिली पाहिजे. लोणची दररोजच्या जेवणात आवर्जून ठेवा म्हणजे ती वापरात येतील. कुरडया, खारोड्या, सातू हे पदार्थ एकत्रित बसून त्याचा आस्वाद घ्या. हे पदार्थ वाया जातात. कारण त्याची प्रक्रिया कंटाळवाणी आहे. गप्पाटप्पांनी ती आनंददायी होते.

धान्य साठवण योग्य प्रक्रिया करून ठेवा नाहीतर महिन्याला एकेक कट्टा आणा. आजकाल साठवणुकीची गरज नाही. पदार्थ बनविताना 'तुम करते म्हणून हम करते' असा भाव नको. घरातील सदस्यांना काय आवडते ते बनवा. उगाच शेजारणीशी मिथ्या शर्यत नको. लग्न समारंभात तर सर्वांनी खूप काळजी घेतली पाहिजे.

एका हॉटेलने नियमच केला की, ताटात टाकाल तर दंड आणि टाकलेले अन्न घरी घेऊन जा! जगात अनेकांना खायला मिळत नाही आणि आपला अन्न टाकून माज असतो. वाया घालविल्याचे जराही दुःख, लाज-शरम, चुकल्याची भावना आपल्या चेहऱ्यावर नसते. उलट त्याचा गर्व आणि अभिमान वाटतो कित्येकांना. हे पशुवत् वागणे आहे. आपण जर महिन्यातून एक दिवस उपवास धरला तर जगातील अब्जावधी माणसे पोट भरून जेवू शकतात. उपवास जाऊ द्या, पण काटकसर तर करा. म्हणूनच समर्थ रामदासांनी आपल्याला खडसावले...

*आपण यथेच्छ जेवणे । उरले ते वाटणे ॥*
*परंतु वाया दवडणे । हा धर्म नव्हे ॥*

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### पथदिव्यांची शोकांतिका

नागपूरमध्ये नवनवीन पद्धतीने सुशोभीकरणाचे काम सुरू आहे. त्यात महत्त्वाचा वाटा पथदिव्यांचा आहे. त्यामुळे रात्री परिसर सुंदर दिसतो व नागरिकांची सोय होते. पण त्या पथदिव्यांची दुरुस्ती व देखभाल होत नसल्याने सुशोभीकरणाचे तीनतेरा वाजले आहेत. उदाहरणार्थ प्राईड हॉटेल ते चिंचभुवन बसस्टॉपपर्यंत जवळपास १५० ते २०० पथदिवे आहेत पण ते सुरू नसतात. खांबांवरील दिवे गायब आहेत. जूने काढून नवीन आकर्षक खांब लावले पण ते फक्त देखावा आहे त्यावरील दिवे नसतात किंवा बंद आहेत. इतका पैसा खर्च होतो पण नागरिकांना काहीच फायदा नाही. वरून सरकारची बदनामी होते. चिंचभुवन पुलावरील पथदिवे नागपूर महानगर पालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग व राष्ट्रीय महामार्ग या तीन संस्थांच्या भांडणात दुरुस्तीची वाट पाहत आहे. चिंचभुवन परिसरातील नागरिक किती काळ अंधारात चाचपडत राहतील, हा प्रश्नच आहे. याकडे अधिकारी लक्ष देतील अशी अपेक्षा आहे.

**आनंद हरकरे**/९४०३२११२२८

### शत्रूसुद्धा शिवरायांसारखा असावा

निवडणुकीच्या निकालाच्या निमित्ताने जी गरळ विरोधकांकडून ओकली जात आहे ती ऐकल्यावर औरंगजेबाच्या शब्दांची आठवण होते, तो म्हणाला होता, शत्रूसुद्धा शिवासारखा असावा, याचा बोध सध्याचे विरोधक घेतील का? मशाल विझली, तुतारीचे सूर थांबले, हिंदू जागा झाला आणि तलवारी तळपू लागल्या. हिरव्या फूत्कारांचा पराभव झाला, कर्ण पांडव असताना सुद्धा दुर्दैवाने दुर्योधनाचा मित्र बनून कौरवांच्या पक्षाला मिळाला आणि सर्व विद्या फुकट जाऊन तो मारला गेला हा महाभारताचा इतिहास आहे. पैशाने विकत घेता येते हा भ्रमाचा भोपळा मतदारांनीच फोडला. शेंडी-जानव्याच्या वाटेला गेले आणि संतांचा अपमान केला की भट, ब्राह्मणांचा परशुरामही होतो हेच या निकालातून स्पष्ट झाले. लाचार चाणक्य हिरव्याची तरफदारी करतो तेव्हा तो फक्त १०-२० जागांवरच विजयी होतो हेसुद्धा स्पष्टपणे दिसले. काफिरांना पंधरा मिनिटात कापून काढण्याची भाषा करणारे ओवैसी यांनीही औरंगजेबापासून बोध घ्यावा. वडिलोपार्जित हिंदुत्व सोडल्यामुळेच पराभव झाला हे आता तरी उद्धव ठाकरे मान्य करतील का? पाच टक्के मतदान वाढल्यामुळे सिंहाने फक्त शेपटी हलवून आयाळीवरची माशी बेशुद्ध पाडली आहे, जर संपूर्ण हिंदू निद्रेतून जागा झाला तर काय घडेल? याचे चिंतन महाआघाडीने केले तरच विरोधी नेते म्हणून तरी सभागृहात बसण्याची संधी प्राप्त होईल अन्यथा भविष्य ना उरले हाती, अशी झाली दुर्गती आणि सत्ताधारी श्रीराम सतत गर्जती हे बघण्याशिवाय पर्याय उरणार नाही.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### प्लॅस्टिक कप टाळावेत



प्लॅस्टिक कपमधील चहा आरोग्यास हानिकारक असल्याचे अनेक वेळा वाचण्यात आले आहे. परंतु आजही अनेक हॉटेल्स, टपरीमध्ये ग्राहकास प्लॅस्टिक कपातच चहा दिला जातो. हॉटेल, टपरीमालक यांनाही हे चांगल्या प्रकारे माहीत असताना देखील ते प्लॅस्टिक कपच का वापरतात, हेच समजत नाही. हॉटेलमालक आणि हॉटेलमधील नोकरांच्या अज्ञानामुळे हे घडत असेल तर आता चहा पिणारे ग्राहकच मोठ्या प्रमाणात जागरूक होणे आवश्यक आहे. प्लॅस्टिककपातील चहा आरोग्यास हानिकारक आहे. याचा चहा पिणाऱ्या प्रत्येक ग्राहकाने जाणीवपूर्वक विचार करून केवळ चिनी मातीतील कपातच चहा विक्रीसाठी हॉटेल, टपरीचालकास प्रवृत्त करावे. केवळ चहा पिणाऱ्या ग्राहकावरच हे अवलंबून आहे. चहा पिणाऱ्यांनी तातडीने चिनी मातीच्या कपाचा आग्रह धरावा. आपले आरोग्य सांभाळावे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### मविआचे विकासाकडे दुर्लक्ष, ईव्हीएमकडे लक्ष

नुकतेच विधानसभा निवडणुकीचे निकाल जनतेसमोर आले असून, त्यांचा कल ज्याकडे होता ते विधानसभा निवडणुकीत दिसून आले आणि जनतेचे उमेदवार विजयी झाले. त्यामुळे महायुतीला त्यात बहुमत प्राप्त झाले परंतु निवडणुकीत महाविकास आघाडीच्या बहुतांश उमेदवारांना पराभूत व्हावे लागल्याने त्यांनी ईव्हीएम यंत्रावर आक्षेप घेतला आणि आंदोलन उभारले. सत्ताप्राप्तीसाठी राज्यभर आंदोलन छेडले जात आहे. निवडणूक ही मतदारांच्या पसंतीनुसार होते. ज्याकडे त्यांचा कल असतो तेच उमेदवार निवडून येतात. प्रत्यक्ष मतदान आधारावर जय-पराजय होत असतो याची जाणीव असून देखील विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा पराभव झाल्याने त्यांनी मतदान यंत्रावर आक्षेप घेतला आहे. त्यांचे विकासाकडे, जनतेच्या समस्यांकडे दुर्लक्ष झाले आणि पराभवाचे तोंड पाहावे लागले.

**मुनीश्वर मलेवार**/७७४४०१०७८७

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com




बीड शहरातील खंडोबा दिपमाळ मंदिरावर चंपाषष्ठी निमित्त शुक्रवार आणि शनिवारी दोन दिवस यात्रेनिमित्त मंदिरावर अशी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे (छाया कृष्णा शिंदे)

# शिक्षक साजेद अली खुन प्रकरणी १४ आरोपी दोषी ;सोमवारी आरोपींना शिक्षा सुनावण्यात येणार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ डिसेंबर**

बीड शहरातील बालेपीर भागात राहणाऱ्या शिक्षक साजेद अली यांचा निघूणपणे खून करण्यात आला होता. या प्रकरणी १८ आरोपी विरोधात शिवाजी नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. हे प्रकरण बीड येथील विशेष मोक्का न्यायालयात सुरू होते. काल या प्रकरणाचा निकाल होता. न्यायालयाने १८ पैकी १४ आरोपींना दोषी ठरविले असून ३ आरोपींना निर्दोष ठरविलेले आहे. दोषींना सोमवारी शिक्षा सुनाविण्यात येणार आहे. साजेद अली खुन प्रकरणाचा आज निकाल असल्याने जिल्हा न्यायालयाच्या परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

बीड शहरातील बालेपीर भागात राहणारे सैनिकी विद्यालयातील शिक्षक सय्यद साजेद अली (वय ३८) यांची ५ डिसेंबर रोजी धारधार शस्त्राने हत्या करण्यात आली होती. या घटनेने जिल्ह्यात खळबळ उडाली होती. या प्रकरणी गुजर खान उर्फ अन्वर खान मिर्झा खान, सरफराज काझी, फैज मोहम्मद खान उर्फ पापा भाई, सय्यद नुर उर्फ मिनाज, मुजी खान पठाण, सय्यद नासेर सय्यद नुर, सय्यद शाहरूख सय्यद नुर, शेख उबेद शेख बाबू, शेख सरफराज, इम्रान पठाण, शेख शाहबाद शेख कलिम, शेख अमर शेख अख्बर, शेख बाबर युसूफ, आवेज काझी, शेख इम्रान उर्फ काला, शेख मजर उर्फ हमसफर, बाबर खान गुल मोहंमद खान पठाण, शेख वसीम शेख बदरोद्दीन यांच्या विरूध्द शिवाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

हे प्रकरण बीड येथील विशेष मोक्का न्यायालयात सुरू होते.या प्रकरणाचा काल निकाल होता. न्यायालयाने १४ आरोपींना दोषी ठरविले असून ३ जणांना निर्दोष मुक्त केलेले आहे. दरम्यान या प्रकरणातील एक आरोपी अद्यापही फरार आहे. दोषींना सोमवारी शिक्षा सुनाविण्यात येणार आहे. साजेदअली खुन प्रकरणाचा निकाल असल्यामुळे जिल्हा न्यायालयाच्या आवारामध्ये कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी स्वतःडीवायएसपी गोल्डे, चार पीआय आणि १५० पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले होते.सरकारी पक्षाच्या वतीने विशेष सरकारी वकील ॲड.अजय तांदळे हे काम पाहत आहेत.

# स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाची अंबाजोगाईत गुटख्याच्या गोदामवर धाड

## १० लाख ६७ हजार रुपयांचा माल जप्त

अंबाजोगाई (प्रतिनिधी)–राज्य भरात गुटखा विक्रीस बंदी असतानाही अंबाजोगाई व परिसरात १० ते १२ गुटख्याचे व्यापारी बिनधास्त पणे गुटखा पानपट्टी धारका पर्यंत पोचवण्याचे काम करत असून बीड येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुटख्याच्या गोदामवर धाड टाकून १० लाख ६७ हजार रुपयांचा माल जप्त केल्याने गुटखा विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

महाराष्ट्रामध्ये तंबाखूजन्य पदार्थावर बंदी असताना देखील बीड जिल्ह्यात सर्रासपणे खुलेआम गुटखा विक्री होत असून याकडे अन्न व औषध प्रशासनाने अर्थपूर्ण दुर्लक्ष केल्यानेच खुलेआम गुटखा विक्री होत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यात किराणा दुकान, पान टपरी, हॉटेल मध्ये सहज गुटखा उपलब्ध होतो. स्थानिक गुन्हे शाखा बीडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक दराडे यांना आंबेजोगाई शहरात एक गुटक्याचे गोडाऊन असल्याची गुप्त माहिती मिळाल्याने मंगळवारी दराडे यांनी एका गुटख्याच्या गोडावूनवर छापा मारून लाखोंचा माल ताब्यात घेतला. बाळराजे दराडे यांनी जिल्ह्यात अवैध धंद्यांवर वाळू, मुरूम, बनावट ग्रीस, गुटखा यावर मोठ्या कारवाया केल्या होत्या. बाळराजे दराडे यांनी पुन्हा एकदा अवैध धंद्यांवाल्यांकडे आपला मोर्चा वळविला असून अंबाजोगाई शहरातील गणेश प्रोव्हिजन या गोडावूनवर छापा मारून रजनीगंधा, आर.एम.डी, विमल, गोवा, बाबा या नावाचा गुटखा ताब्यात घेतला आहे. या कारवाईत १० लाख ६७ हजारांचा माल पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे कळत असून या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे, पोलीस उपनिरीक्षक घाडगे, पो.ह.मोराळे, मुंडे, पो. मोराळे पो. मस्के, पो.ना. नामदेव सानप यांचा सहभाग होता. या कारवाईने अवैधधंदे करणाराचे व गुटखा माफीयांचे धाबे दणाणले आहेत.



**परळी वैजनाथ – उपजिल्हा रुग्णालय व लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक एड्स दिनानिमित्त सोमवारी (दि.०२) एड्स जनजागरण रँलीचे आयोजन करण्यात आले होते.**

# देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेताच

## माजी आ.लक्ष्मण पवारांच्या भाजप कार्यालयात जल्लोष

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.५ डिसेंबर**



विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपा महायुतीला घवघवीत यश मिळाले आहे त्यामुळे भाजपाचे विधीमंडळ गटनेते देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा करण्यात आली होती तेव्हाच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच होणार जवळपास निश्चित झाले होते त्या.अनुषंगाने आज दि ५ डिसेंबर रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिदे यांना पद व गोपनीयतीची शपथ दिली याप्रसंगी देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी, यांच्या अनेक राज्याचे मुख्यमंत्री तसेच केंद्रीय मंत्रिमंडळाती मंत्री उपस्थित होते.

महायुती सरकारच्या शपथ विधीचा लाईव्ह कार्यक्रमाचे आ.लक्ष्मण पवारांच्या संपर्क कार्यालयात आयोजन करण्यात आले होते यावेळी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथग्रहण सुरु असतांना गेवराई भाजपा कार्यालयात पेढे वाटून फटाके फोडून जल्लोष साजरा करण्यात आला होता यावेळी नागरिकांसह पदाधिकाऱ्यांसह कार्यक्रत्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

# अखिल भारतीय ग्राहक पंचायतीची परळी तालुका कार्यकारिणी जाहीर

## अध्यक्षपदी चित्रा देशपांडे, सचिव गोपाळ आंधळे तर संघटन मंत्री पदी विजया दहिवाळ यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.५ डिसेंबर**



अखिल भारतीय ग्राहक पंचायत परळी वैजनाथ तालुक्याची कार्यकारणी निवडण्यासाठी बुधवार दिनांक ४ डिसेंबर रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीत परळी वैजनाथ तालुका अध्यक्षापदी चित्राताई देशपांडे, तालुका सचिव पदी माजी न.प. शिक्षण सभापती गोपाळ आंधळे, संघटन मंत्रीपदी विजयाताई दहिवाळ, तर विधी सल्लागारपदी ड.अशोक शहाणे व ड. वैजनाथ वांजरखेडे यांची नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली.

याबाबत अधिक माहिती अशी की अखिल भारतीय ग्राहक पंचायत ही संघटना देश पातळीवर ग्राहकांच्या संरक्षणासाठी निर्माण झाली असून, या समितीची परळी वैजनाथ तालुक्याची कार्यकारणी निवडण्यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे देवगिरी प्रांत अध्यक्ष डॉक्टर विलास मोरे सर यांच्या अध्यक्षतेखाली परळी येथे बैठक संपन्न झाली. यानंतर परळी वैजनाथ तालुक्याची नवीन कार्यकारणीची घोषणा करण्यात आली .यामध्ये परळी तालुका अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्त्या चित्रा देशपांडे सचिव पदी नगरपरिषदेचे माजी शिक्षण सभापती गोपाळ आंधळे संघटन मंत्रीपदी समाज सेवीका विजया दहिवाळ विधी सल्लागार पदी ड. अशोक शहाणे अँड .वैजनाथ वांजरखेडे, कोषाध्यक्षपदी विद्या खिस्ती ,उपाध्यक्षपदी शोभा कुलकर्णी यांची निवड करण्यात आली तर या समितीच्या सदस्य पदी अनिता माळवतकर ज्ञानेश्वरी चाटे संध्या सर्व दे सुनीता बोडके अपर्णा वेताळ सुनिता नरंगलकर डॉक्टर आनंद टिंबे प्रीती टाक तारा अग्रवाल रुक्मिणी अग्रवाल तारामती बनसोडे आदींची निवड जाहीर करण्यात आली. नवनिर्वाचित कार्यकारणीतील पदाधिकाऱ्यांनी या समितीमध्ये कशा पद्धतीने ग्राहकांच्या हक्काचे संरक्षण करावे याबाबत पुढील प्रमाणे सूचित केले आहे.

दिवसेंदिवस ग्राहकांचे न्याय आणि हक्क राजरोसपणे पायदळी तुडवले जात आहेत त्यामुळे सामान्य माणूस जेरीस आलेला आहे. त्यातच वाढत्या महागाईमुळे त्यांना जीवन जगणे अवघड होत चालले आाहे. ग्राहकांपर्यत जीवनावश्यक वस्तू पोहोचणेही दुरापास्त झाले आहे. शाळा, कॉलेजमध्ये मोठ्या प्रमाणावर देणग्या दिल्याशिवाय प्रवेश मिळेनासे झाले आहे. शासकीय योजनांना भ्रष्टाचाराची गळती लागल्याने नागरिकांपर्यत एक रुपयातील पंधरा पैसे जाईनासे झाले आहे. जनसामान्य माणसाचे स्वातंत्र्य धोक्यात येते की काय ? अशी भिती निर्माण झाली आहे. ग्राहकांच्या हितांचे प्रश्न हाताशी घेऊन अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या गाध्यमातून आपणासारखे ध्येयवादी कार्यंर्ते गेल्या अनेक वर्षापासून कार्य करत आहेत. त्यामूळे समाजात लोकशिक्षण व लोकजागृतीचे कार्य वृध्दींगत होत आहे. आपण करत असलेल्या कार्य अहवालानुसार आपली नियुक्ती करण्यात येत आहे. अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे उदिष्ट ध्येय धोरणानुसार आपणाकडून कार्य अपेक्षित आहे.

या बैठकीस राज्य कार्यकारणी वरील गंगाधर कानेटकर अशोक कोकणावर यांचीही उपस्थिती होती या बैठकीचे सूत्रसंचालन विजया दहिवाळ यांनी केले प्रस्ताविक चित्रा देशपांडे तर आभार प्रदर्शन गोपाळ आंधळे यांनी केले. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# एपीआय गणेश मुंडेंची गेवराई येथे बदली

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ डिसेंबर**

एपीआय गणेश मुंडे यांची गेवराई येथे बदली करण्यात आली आहे, त्यांच्या बदलीचे आदेश (दि.३ डिसेंबर) रोजी काढण्यात आले आहेत.

गणेश मुंडे एक कर्तव्यदक्ष अधिकारी आहेत, त्यांनी बीड जिल्ह्यात अत्यंत चांगल्या पद्धतीने कर्तव्य बजावलेले आहे, अनेक कारवयाच्या माध्यमातून त्यांनी माफीयांना दणके दिलेले आहेत, विशेष म्हणजे त्यांनी वाळूच्या अनेक रेड केल्या असून १० कोटीपर्यंत मुद्देमाल जप्त केलेला आहे, त्यामुळेच माफियानी त्यांची धास्ती घेतली होती, मागच्या काही दिवसांपूर्वी त्यांची नळदुर्ग येथे बदली करण्यात आली होती, आता पुन्हा एकदा त्यांची गेवराई येथे महामार्ग पोलिस विभागात बदली करण्यात आली आहे, तीन डिसेंबर रोजी त्यांच्या बदलीचे हे आदेश काढण्यात आले असून ते लवकरच आपल्या पदाचा पदभार स्वीकारणार आहेत.

# महादेव बादाडे यांचे निधन



**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.५ डिसेंबर**

वाघोरा (ता. माजलगाव) येथील शेतकरी महादेव रंगराव बादाडे (वय, ६० वर्ष) यांचे मंगळवारी (ता. तीन) रात्री ११ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी (ता. चार) वाघोरा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना नातवंड असा परिवार आहे. सार्वजनीक बांधकाम विभागातील शाखा अभियंता धनंजय बादाडे, मनोज बादाडे यांचे ते वडील होत.

# धनंजय मुंडेंचे सिरसाळा एमआयडीसी पूर्णत्वाच्या दिशेने महत्वाचे पाऊल

## मुंडेंनी प्रस्तावित केलेल्या औद्योगिक क्षेत्र विकास आराखड्यास एमआयडीसी ने दिली मंजुरी

**तभा वृत्तसेवा**
**मुंबई दि.५ डिसेंबर**

परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी परळी तालुक्यातील शिरसाळा येथे औद्योगिक विभागाने अधिग्रहीत केलेल्या जागी पंचतारांकित एमआयडीसी पूर्ण करण्याचा ध्यास घेतलेला असून एमआयडीसीमध्ये प्रत्यक्ष उद्योगांना सुरुवात करण्याच्या दृष्टीने एमआयडीसी पूर्णत्वाच्या साठी अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.

धनंजय मुंडे यांच्या विनंतीनुसार प्रस्तावित केल्याप्रमाणे शिरसाळा येथे अधिग्रहित करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवर औद्योगिक क्षेत्रात पूरक बाबी विकसित करण्यास औद्योगिक विकास महामंडळाने मंजुरी दिली असून, यामध्ये प्रामुख्याने २० मीटर मुख्य रस्ता, १२ मीटर अंतर्गत रस्ते, १५ मीटर सर्व्हिस रस्ते यांसह लघु व मध्यम उद्योगांसाठी राखीव जागा (प्लॉट) निर्मितीसाठी त्याचबरोबर सहाय्यभूत सुविधा निर्माण करण्याच्या प्रस्तावास औद्योगिक विकास महामंडळाने मंजुरी दिली आहे.

सिरसाळा येथे अधिग्रहित करण्यात आलेल्या जमिनीवर एकूण १६ हेक्टर क्षेत्र हे संबंधित सुविधांसाठी मंजुर करण्यात आले असून, यासाठी धनंजय मुंडे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. धनंजय मुंडे यांनी नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिरसाळा येथील मंजूर असलेल्या एमआयडीसीला पूर्णत्वाकडे नेऊन या ठिकाणी पायाभूत सुविधांची निर्मिती करणे तसेच येथे उद्योगांना निमंत्रित करण्याचे आश्वासन दिले होते; या शब्दाला पूर्ण करण्यासाठी आणखी आमदार म्हणून शपथ घेणे सुद्धा बाकी असतानाच मुंडेंनी आपल्या कामाला सुरुवात केल्याचे पाहायला मिळत आहे.

सिरसाळ्यात सुमारे २०० हेक्टर पेक्ष्या अधिक क्षेत्र हे एमआयडीसी म्हणून घोषित करण्यात आले असून त्यापैकी ७८ हेक्टर पेक्षा अधिक जमीन आतापर्यंत अधिग्रहित करण्यात आली आहे. सदर ठिकाणास राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे सह दळणवळणाच्या सोयी व पाण्याची उपलब्धता प्रमाणात असल्याने येथे उद्योग उभारणीस मोठा वाव आहे. त्यामुळे सदर एमआयडीसी पूर्ण झाल्यास याठिकाणी मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती करण्याचा धनंजय मुंडे यांचा प्रयत्न आहे.

# गुटखा माफिया मुळे आबाची हर्सूलमध्ये रवानगी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.५ डिसेंबर**

गुटखा माफिया असलेल्या महारूद्र उर्फ आबा मुळेला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने बुधवारी रात्री धाराशिवमधून अटक केली आहे. आबा मुळेवर एमपीडीए अंतर्गत कारवाई करण्यात आली असून मुळेला हार्सुल कारागृहाकडे रवानगी करण्यात आल्याचे स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी सांगितले.

बीड जिल्ह्यात गुटख्याची तस्करी आणि विक्रीसह गंभीर स्वरूपाचे गुन्हे आबा मुळेवर दाखल होते. काही दिवसांपूर्वी आबा मुळेला आंबडच्या बसस्थानकातून सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे यांनी अटक केली होती. त्याच्यावर मोठे गुन्हे दाखल असल्याने एमपीएडीचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला होता. अखेर त्याला मंजूरी मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने आरोपीला धाराशिवमधून काही वेळापूर्वी अटक केल्याचे कळते. स्थानिक गुन्हे शाखेतील विघ्ने यांच्या पथकाने ही कारवाई केल्याची माहिती असून आरोपीला हार्सुल कारागृहाकडे घेवून जात असल्याचे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी बोलताना सांगितले आहे.

# कै बाबासाहेब नाईक मूकबधिर निवासी विद्यालयात शिवसेना प्रणित दिव्यांग आघाडीच्या वतीने मूकबधिर विद्यार्थ्यांना ब्लँकेट आणि फळ वाटप

## शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांच्या हस्ते मूकबधिर विद्यार्थ्यांना फळ वाटप

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय दिव्यांग दिनानिमित्त शिवसेना प्रणित दिव्यांग दिन मोठा उसात साजरा करण्यात आला असून यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाचफुले मुख्याध्यापक पी वाय गन्द्रे लक्ष्मी भुतडा पत्रकार राहुल मुळे शिवसेना दिव्यांग आघाडीचे जिल्हाध्यक्ष अनिल मगदुले आदींची उपस्थिती होती यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे शिवसेना शहर प्रमुख विष्णू पाच फुले यांच्या हस्ते मूकबधिर विद्यार्थ्यांना फळ आणि ब्लँकेट वाटप करण्यात आले आहे यावेळी भाऊसाम्हणे घुगे म्हणाले दिव्यांगांसाठी आमदार अर्जुन खोतकर पाच टक्के निधी





दिव्याच्या कल्याणासाठी खर्च करणार आहे मागील आमदार कैलास गोरंट्याल यांनी खर्च केला असेल किंवा नसेल मात्र आमदार खोतकर पाच टक्के निधी दिवंग्यासाठी खर्च करणार असल्याचे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी केले आहे यावेळी शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाच फुले म्हणाले आमदाराला पाच टक्के निधी खर्च करावा लागतो आमदार अर्जुन खोतकर पाच नव्हे तर दहा टक्के खर्च करणार असल्याचे प्रतिपादन शिवसेनेचे शहरप्रमुख विष्णू पासफुले यांनी केले आहे यावेळी यावेळी मुख्याध्यापक श्री. पी.वाय.गन्दे विशेष शिक्षक .एस.एस.काळगे .आय. एच.नाईक श्री. व्ही. बी. पवार सौ.व्ही.एच.नाईक श्रीमती.एस के.जाधव रवी तायडे शेख इस्माईल आदिची उपस्थित होते

## संक्षिप्त

### आ.लोणीकरांचा कॅबीनेट मंत्रीमंडळात समावेश करावा -प्रभाकर जाधव

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**



मौजे सिरसगाव चे उपसरपंच प्रभाकर माधवराव जाधव सिरसगाव कर यांनी आमदार बबनराव लोणीकर यांना पहिल्याच कॅबिनेट मंत्री मंडळात समावेश करावा यासाठी माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना स्वतःच्या रक्ताने पत्र लिहून विनंती केली आहे . हे स्वतःच्या रक्ताने लिहिलेल पत्र शोषलमिडीयावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहे .

### शिवेंद्रसिंहराजे आणि उदयनराजे भोसले यांना कॅबिनेट मंत्री करा राजूर मध्ये चक्क पोलिस कर्मचाऱ्यानेच केले शोले स्टाईल आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

राज्याच्या मंत्रिमंडळात शिवेंद्रसिंहराजे ,आणि केंद्राच्या मंत्रीमंडळात उदयनराजे भोसले यांना कॅबिनेट मंत्री करा.या मागणीसाठी राजूर-टेंभुर्णी महामार्गाजवळ असलेल्या एका मोबाईल टॉवर वर चढून हसनाबाद पोलीस ठाण्यातील सदाशिव ढाकणे या पोलीस कर्मचार्याने चक्क वर्दीवरच शोले स्टाईल आंदोलन सुरु केलंय.

जो पर्यंत अमित शहा किंवा देवेंद्र फडणवीस हे शिवेंद्रसिंहराजे आणि उदयनराजे भोसले यांना कॅबिनेट मंत्री करण्याचे आश्वासन देत नाही तो पर्यंत आपण आंदोलन सुरूच ठेवणार असल्याची भूमिका या पोलीस कर्मचार्यांने घेतलीय.

घटनेची माहिती मिळताच हसनाबाद पोलीस ठाण्याचे पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असून या तरुणाला खाली उतरवण्यासाठी त्याची मनधरणी करण्याचा पर्यंत सुरू केला असून गावातील नागरिक ही मोठ्या प्रमाणात घटनास्थळी दाखल झाले आहेत. वर्दीवरच आंदोलन करणार्या या पोलिस कर्मचार्यावर वरिष्ठ पोलीस अधिकारी काय भुमिका घेतात हे बघावे लागतात.

### मागासवर्गीय युवकांनी उद्योग विश्व साकारावे -घनश्यामदास गोयल

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

मागासवर्गीय युवकांना उद्योगाच्या प्रवाहात आणण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या अनेक कल्याणकारी योजना असून युवकांनी या योजनांचा लाभ घेऊन स्वतःचे उद्योग विश्व साकारावे असे आवाहन कालिका स्टील चे संचालक उद्योजक घनश्यामदास गोयल यांनी केले.

एम. एस. एम. ई.भीम उद्योग अभियाना तर्फे बुधवारी ( ता.०४) हॉटेल सागर ईन मध्ये उद्योजगता जागरूकता कार्यशाळेच्या उद्दघाटन प्रसंगी घनश्यामदास गोयल बोलत होते. अध्यक्षस्थानी एम एस एम इ छत्रपती संभाजी नगरचे संयुक्त संचालक नरेंद्र इस्टोलकर हे होते. यावेळी उद्योजक सुनील भाई रायठठ्ठा, सहाय्यक संचालक राहुल मिश्रा ,एन.एस आय. सी. चे व्यवस्थापक बी. एन.बरनवाल, जिल्हा उद्योग केंद्राचे जगदीश जगताप, महाबँक आरसेटी चे संचालक मंगेश डामरे ,भीम उद्योग अभियानाचे संस्थापक संजय भालेराव, महासचिव राजेश राऊत, सिनेअभिनेत्री वैशाली दाभाडे, यांची प्रमुख उपस्थिती होती. घनश्यामदास गोयल म्हणाले, नोकरी मागण्यापेक्षा नोकरी देणारे व्हा घेतलेल्या कर्जाची उद्योगातून परतफेड करून आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या उद्यमशीलतेचा ठसा उमटवा असा सल्ला गोयल यांनी अध्यक्षीय समारोपात नरेंद्र इस्टोलकर यांनी प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना क्लस्टर डेव्हलपमेंट याविषयी माहिती देऊन उद्योगात चिकाटी, सातत्य ,कठोर परिश्रमाची तयारी ठेवा असे सांगितले. राहुल मिश्रा यांनी सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योगांचे स्तर उत्पादन सेवा क्षेत्र, मोठ्या उद्योगांना लागणारा कच्चामाल, सौंदर्यप्रसाधने, उत्पादनांची पॅकेजिंग , ब्रॅण्डिंग , ई- मार्केट, शासकीय खरेदी -विक्री ,स्टॅन्ड अप आणि स्टार्टअप याविषयी माहिती दिली. बी. एन. बरनवाल यांनी अनुसूचित जच्यानव उद्योजकांना कर्ज सुविधा, राष्ट्रीय, अंतरराष्ट्रीय प्रदर्शनांसाठी सबसिडी, सुविधांबद्दल सखोल माहिती दिली. जगदीश जगताप, मंगेश डामरे, अभिनेत्री वैशाली दाभाडे यांनी मार्गदर्शन केले. संजय भालेराव यांनी भिम उद्योग अभियानाचे ध्येय, युवकांना उद्योगाविषयी प्रेरणा मिळावी, उद्योजक घडावेत अशी भूमिका विषद केली. सुत्रसंचालन आशीष रसाळ यांनी केले तर श्रावण गायकवाड यांनी आभार मानले. भीम उद्योग अभियानाचे प्रदेश महासचिव राजेश राऊत, कार्याध्यक्ष सचिन बावस्कर ,उपाध्यक्ष डॉ. सुरेंद्र खाडे ,जिल्हा समन्वयक मनोज वाकडे यांना नियुक्तीपत्रे देऊन सत्कार करण्यात आला. कार्यशाळेत सुरेश खंडाळे , डॉ. शिवाजी लहाने,यशवंत राऊत, अनिकेत भालेराव, प्रदीप गौतीस, संगीता राऊत, शितल भारती, संतोषी गिरी, प्रियंका मगरे, सत्यशीला राऊत ,कविता गिरी ,कपिल मगरे यांच्यासह ७५ युवक- युवतींनी सहभाग नोंदवला.

# आ.बबनराव लोणीकर यांना कॅबीनेट मंत्रीपद देण्याची माळी महासंघाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**





परतुर मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनरावजी लोणीकर हे पाचव्यांदा आमदार झाल्याने , मराठवाड्यात सर्वात सर्वात जैष्ठ असल्याने त्यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात यावे अशी मागणी माळी महासंघ परतूर मंठा यांनी भारतीय जनता पार्टीचे नेते तथा भावी मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडवणीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

आमदार बबनराव लोणीकर यांची मागील त् कारकिर्द पाहता त्यांनी महाराष्ट्रचे पाणीपुरवठा मंत्री असतांना वाटर ग्रिड सारखी महत्वकांक्षी योजना संपुर्ण महाराष्ट्रात राबवुन ती यशस्वी करून दाखविली आहे. शेगाव ते पंढरपुर राष्ट्रीय महामार्ग,मतदार संघात रस्ते, विज, पाणी प्रत्येक गांवात सभागृह शाळेसाठी लागणाऱ्या इमारती, सभामंडप अशा अनेक विकास कामातुन त्यांनी परतुर व मंठा मतदारसंघ सुजलाम सुफलाम केलेला आहे. तसेच परतुर व मंठा मतदार संघातील सर्व समाजातील लोकांना एकत्र घेवुन त्यांचा मतदार संघात चांगल्या प्रकारे संपर्क असुन या बळावरच ते पांचव्यादा आमदार पदी पुनश्च एकदा विजय संपादन केला आहे. तरी वरील बाबींचा यथोचित विचार करून आमदार बबनरावजी लोणीकर यांना कॅबीनेट मंत्रीपद देण्यात यावे अशा प्रकारची मागणी माळी महासंघ परतूर मंठा वतीने करण्यात आली आहे.या निवेदनावर माळी महासंघाचे मराठवाडा कार्याध्यक्ष तथा परतूर पंचायत समितीचे माजी सभापती माणिकराव वाघमारे यांच्यासह बाबाराव थोरात , श्री गांजाळे सर (ओबिसी शहर अध्यक्ष), रमेश आढाव, महादेव बोरकर, अनिल शिंदे, वासुदेव महाराज, डिगांबर अब्दल, नारायणराव वाघमारे,गंगाधर माने, श्रीरंग जईद,सुधाकर सातोनकर, सोपान जईद, संतोष राऊत, किसन राऊत,अशोकराव आंबेकर,अशोकराव वाघमारे, बाबाराव थोरात,राजाभाऊ गोरे,रामप्रसाद गाढवे, अंगद राऊत तसेच सामाजिक कार्यकर्ते भगवानराव मोरे, द.या काटे, पद्माकर कवडे , भगवान आरडे, गणेशराव खवल यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मनोज जरांगे यांची उपोषण आंदोलनाची तयारी सुरूच

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



महाराष्ट्रात मराठा समाजाशिवाय अन्य कोणी सत्तेत बसू शकत नाही. आता सर्वांना सोबत घेऊन मुंबईमध्ये बेमुदत उपोषण करणार आहे. त्याची तयारी सुरू आहे, असा इशारा मनोज जरांगे यांनी बुधवारी दिला. आरक्षणाच्या मागणीवर ठाम असल्याचे सांगताना ते म्हणाले, 'समीकरण जुळाले नाही, त्यामुळे आम्ही विधानसभा निवडणुकीत उतरलो नाही. आम्ही निवडणुकीत उतरलो असतो, तर अनेक जणांचा सुपडा साफ केला असता. आरक्षण दिले नाही, तर तुमच्याच पक्षातील मराठा समाजातील कार्यकर्ते तुम्हाला गद्दारांच्या यादीमध्ये टाकतील. आरक्षण दिले नाही, तर देवेंद्र फडणवीस यांनाही सत्तेत येऊन आनंद घेऊ देणार नाही. शेतकऱ्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषण सुरू केले जाऊ शकते.'


विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर जरांगे यांच्याकडून काय भूमिका घेण्यात येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या पार्श्वभूमीवर, त्यांनी वरील भूमिका मांडली आहे.

### माहोरा येथील १५ दिवसातील दुसरी घटना

# मोटारसायकल स्वारास वाचवितांना ऊसाचा ट्रॅक्टर गेला खड्यात

**तभा वृत्तसेवा**
**माहोरा/प्रतिनिधी**

माहोरा येथुन जवळच असलेल्या गंगाधर आहिरे यांच्या शेताजवळ आज दि . ५ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजेच्या सुमारास शेतकरी प्रदिप फदाड खामखेडा यांच्या शेतातील ऊस ट्रॅक्टर क्र . चक ०५-८९५० मधून पैनगंगा (धाड) कारखान्याकडे जात असतांना माहोरा गावाजवळ भरधाव वेगाने असलेल्या मोटरसायकल स्वारास वाचवितांना डबल ट्रॉली ऊसाने भरलेले ट्रॅक्टर रस्त्यालगत असलेल्या खोल खड्डयात गेले . सुदैवाने ट्रॅक्टर चालक मनोज राठोड रा. देव्हारी साळवतबारा यास कसलीही दुखापत झाली नाही. माहोरा - जाफ्राबाद , माहोरा - धाड बुलढाणा , माहोरा - भोकरदन - छत्रपती संभाजीनगर जाण्यासाठी रस्त्याचे चौपदरीकरण झाले असल्याने या रस्त्याने वाहने भरधाव वेगाने चालतात , आणि असे अपघात होतात , बऱ्याच दिवसांपासून माहोरा येथील मुख्य रस्त्यावर गतिरोधक बसविण्याची मागणी आहे परंतु आजपर्यंत तरी



गतिरोधक बसविण्यात आले नाही , होणारे अपघात रोखण्यासाठी संबंधीत विभागाने त्वरित लक्ष देण्याची मागणी येथील नागरिकांमधून होत आहे .

# एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुलमधील प्रवेशासाठी स्पर्धा परीक्षेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

चिखलदरा, नारवटी, सहस्त्रकुंड आणि बोटोणी येथील एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुलमधील प्रवेशासाठी दि.२५ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे.

तरी वर्ष-२०२४-२५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता पाचवी, सहावी, सातवी आणि आठवीमध्ये शिकत असलेल्या अनुसूचित जमातीचे विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेसाठी अर्ज सादर करावेत, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर येथील एकात्मिक आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प अधिकारी चेतना मोरे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

छत्रपती संभाजीनगर येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पातंर्गत कार्यक्षेत्रात असलेल्या जिल्ह्यातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, जिल्हा परिषद शाळा, नगरपालिका व महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक शाळा तसेच सर्व शासनमान्य अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता पाचवी, सहावी, सातवी आणि आठवीमध्ये शिकत असलेले अनुसूचित जमातीचे विद्यार्थी या स्पर्धा परीक्षेसाठी पात्र राहतील. सर्व शाळेतील मुख्याध्यापकांनी प्रवेश परिक्षेचे आवेदन पत्र विद्यार्थ्यांकडून भरुन घेवून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, छत्रपती संभाजीनगरकडे सादर करावेत. विहीत नमुन्यातील अर्ज संबंधित शासकीय आश्रमशाळेतील मुख्याध्यापक किंवा प्रकल्प अधिकारी कार्यालयात विनामुल्य उपलब्ध आहेत. अर्ज दि.२५ जानेवारी २०२५ पर्यंत संबंधित प्रकल्प कार्यालयाकडे मुख्याध्यापकां मार्फत सादर करावेत, असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# परतूर शहरातील किराणा व्यापाऱ्याची तीन लाखांची पिशवी पळवणाऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळल्या

**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

शहरातील गाव भागात असलेले किराणा दुकान बंद करून घरी जाणाऱ्या व्यापाऱ्याच्या डोळ्यात मिरच-पूड टाकून तीन लाख रुपयांची बॅग पळविणाऱ्या आरोपीच्या मुसक्या आवळण्यात परतूर पोलिसांना यश आले आहे. विशेष म्हणजे आरोपी परतूर शहरातीलच रहिवाशी असून त्याने इतरही काही चोऱ्या केल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिस निरीक्षक एम.टी.सुरवसे यांनी दिली आहे. शहरातील विठ्ठल नगरातील रहिवाशी प्रसाद कांतीलाल पोरवाल यांचे गाव भागात किराणा दुकान आहे. १६ नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास पोरवाल दुकान बंद करून दिवसभरातील रोख रक्कम तीन लाख रुपये एका कापडी पिशवीत टाकून घराकडे निघाले होते. मुख्य रस्त्यावरून घराकडे जाणाऱ्या रस्त्याने वळण घेत असतांना मोटार सायकलवरून आलेल्या दोघांनी मिरची पूड टाकून त्यांच्याकडील तीन लाख रुपये असलेली कापडी पिशवी लांबवल्याची घटना घडली होती. या बाबत परतूर पोलिसात गुन्हा दाखल झाल्यानंतर परतूर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवून आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत. आमेर अमनजी कुरेशी रा. लड्ढा कॉलनी, परतूर असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याने त्याच्या इतर दोन साथीदारांच्या मदतीने सदरील गुन्हा केल्याची कबूली दिली आहे. गुन्हात वापरलेली मोटार सायकल आणि शहरातील एका फायनान्स कंपनीच्या ऑफिसमधून चोरलेली बॅटरी त्याच्याकडून जप्त करण्यात आली आहे. शहरातील इतर चोरीच्या घटनांचा तपास लागण्यास यामुळे मदत होणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. आरोपीची पोलीस कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. सदरील कारवाई पोलीस निरीक्षक एम.टी.सुरवसे,पोउ निरिक्षक विठ्ठल केंद्रे, पोकॉ सतीश जाधव, दीपक आढे, अच्युत चव्हाण, विजय जाधव यांनी केली आहे.

# जिल्हा महिला व बाल रुग्णालयात सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी

## महासंघाचे जिल्हाधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सकांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना येथील शासकीय जिल्हा महिला व बाल रुग्णालयाचा अनागोंदी कारभार सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. ग्रामीण भागातील रुग्णांना योग्य उपचार व सुविधा मिळवून देण्यात हे रुग्णालय अपयशी ठरत असून, रात्री शिकाऊ डॉक्टरांच्या भरोश्यावर रुग्णांना सोडले जात आहे. या प्रकारास मराठा महासंघाने तीव्र विरोध दर्शवून रुग्णालयातील अपुऱ्या सुविधा, मनुष्यबळाचा अभाव व डॉक्टरांच्या कारभारामुळे हे रुग्णालय केवळ रेफर सेंटर बनले असल्याचा आरोप केला आहे.

या संदर्भात गुरुवार दि. ५



डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी आणि जिल्हा शल्य चिकित्सकांना मराठा महासंघाच्यावतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ग्रामीण भागातील रुग्ण मोठ्या आशेने जिल्हा व महिला बाल रुग्णालयात येतात. मात्र, आयसीयु नसल्याचे कारण पुढे करून, रुग्णांना औरंगाबादच्या घाटी रुग्णालयात रेफर केले जाते अथवा परिसरातील ओळखीपाळखीच्या खाजगी दवाखान्यात रेफर करण्याचा सल्ला दिला जातो. रुग्णालयात असलेल्या मोठ्या जागेत मंजूर १० बेड्सचा आयसीयु कक्ष कार्यान्वित करून तज्ज्ञ डॉक्टर व नर्सेसची तातडीने नियुक्ती झाल्यास ही समस्या सुटेल. रात्रीच्या वेळेस फक्त शिकाऊ डॉक्टरांच्या भरोशावर रुग्णालय चालवले जात असल्याने गंभीर रुग्णांना संभाजीनगर घाटी रुग्णालयात हलवावे लागते, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दिवाळीपासून आतापर्यंत सहा ते दहा रुग्णांनी उपचाराअभावी प्राण गमावले आहेत. याला प्रशासनाची निष्क्रियता व रुग्णालयाच्या डॉक्टरांचा हलगर्जीपणा कारणीभूत ठरल्याचे महासंघाचे म्हणणे आहे.

१० बेड्सचा आय सी यु कक्ष तातडीने सुरू करून तज्ज्ञ डॉक्टर व नर्सेसची नियुक्ती करून रुग्णसेवा सुधारावी, रुग्णांना बाहेर पाठवण्याऐवजी रुग्णालयातच उपचारांची सोय करावी, परिसरातील खाजगी दवाखान्यात रुग्ण पाठवण्याच्या प्रकरणांची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, रुग्णालयातील सुविधा व बेड्सची संख्या वाढवावी व रुग्णालयातील परिस्थिती सुधारण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची करावी. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले, तर रुग्णहितासाठी तीव्र आंदोलन छेडावे लागेल, असा इशाराही महासंघाने दिला आहे.

निवेदनावर मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ, युवक जिल्हाध्यक्ष अँड. शैलेश देशमुख यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड,दि. ०५ डिसेंबर**

प्रधानमंत्री रब्बी पीकविमा भरलेल्या हरभरा, गहू अन्य पिकांचे अवकाळी पावसामुळे सोनखेड, शेवडी, कलंबर, टेलकी, वडेपुरीसह लोहा, कंधार, दक्षिण नांदेड येथील शेतकऱ्यांचे सामूहिक पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष पीकविमा जिल्हा समिती नांदेड यांना द्यावेत व शेतकऱ्याला न्याय द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे राज्याच्या मुख्य सचिव यांच्याकडे मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर यांनी केली आहे.

सोनखेड, टेळकी, कलंबर, शेवडी, वाजेगाव, लोहा, कंधार, दक्षिण नांदेड वरील गावांमध्ये ३ डिसेंबर रोजी अवकाळी अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे रब्बी पीक गहू, हरभरा याचे अतोनात नुकसान झाले आहे. आधीच खरीप हंगामामध्ये अतिवृष्टीमुळे शेतकरी आर्थिकदृष्ट्या हलाकीच्या परिस्थितीतून जात असताना रब्बीमध्येही असे आसमानी संकट निर्माण झाले आहे. तसेच खरीप पीकविमा व बाजारभाव यामुळे सुलतानी संकट शेतकऱ्यासमोर आहे.


वरील आसमानी व सुलतानी संकटाचा विचार करून प्रधानमंत्री पीकविमा योजनेच्या शासन निर्णयानुसार ऑटोमॅटिक हवामान केंद्राच्याद्वारे जे प्रत्येक मंडळामध्ये ऑटोमॅटिक हवामान केंद्र करोडो रुपये खर्चून सरकारने उभारले आहेत, त्याच्या अहवालाद्वारे व शासन निर्णयानुसार पेरणीपूर्व नुकसानी अंतर्गत प्रधानमंत्री पीकविमा रब्बी योजनेत नुकसान गृहीत धरून विमा कंपनीला सामूहिक पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकारी अध्यक्ष जिल्हा पीकविमा योजना समिती नांदेड तसेच अध्यक्ष तथा मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य मुंबई यांना देऊन जागतिकीकरणाच्या काळात तात्काळ नुकसान भरपाई देण्याचे आदेश द्यावेत, असेही निवेदनात म्हटले आहे. या निवेदनावर मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर, माधवराव देसाई, गोविंदराव मुकादम, त्र्यंबकराव पाटील जानापुरीकर, लिंबोजीराव पाटील हरबरकर, बळी पाटील मडकीकर, खुशाल पाटील दगडगावकर, ज्ञानोबा टोणगे दापसेडकर, शंकरराव टेळकीकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# आ. भीमराव केराम यांना मंत्रीपद मिळावे ही समस्त लाडक्या बहिणींची ईच्छा : उषाताई धात्रक

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. ०५ डिसेंबर**

किनवट तालुका हा मागास दुर्गम भाग असल्यामुळे आमदार भीमराव केराम यांना मंत्रिपद मिळावे यासाठी किनवट माहूर तालुक्यातील भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते देवाला साकडे घालत असताना आता लाडक्या बहिणीचाही आग्रह वाढला असून किनवट माहूर तालुक्यातील लाडक्या बहिणीच्या आग्रहास्तव विकासप्रिय आ.भीमराव केराम यांचा मंत्रिमंडळात समावेश करावा अशी मागणी भाजपा महिला मोर्चा आघाडीच्या तालुकाध्यक्ष उषाताई धात्रक यांनी केली आहे

किनवट विधानसभेतून आमदार भीमराव केराम यांनी ऐतिहासिक विजय प्राप्त केला असून त्यांच्या विजयात किनवट माहूर तालुक्यातील महिला मतदारांचे मोठे योगदान राहिले आहे लाडक्या बहिणींच्या आशीर्वादामुळे महायुतीला अभूतपूर्व यश मिळाले आहे किनवट विधानसभेतुन भीमराव केराम हे विजयी झाल्यानंतर त्यांना मंत्रिपद मिळावे अशी मागणी भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते रेटून धरत आहेत. मंत्रीपदासाठी जागोजागी देवाला साकडे घातले जात आहेत.



दरम्यान विधिमंडळाच्या गटनेतेपदी व मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचे नाव जाहीर झाल्यानंतर भीमराव केराम यांच्या मंत्रिपदाच्या आशा आणखी बळावल्या आहेत.यात आता किनवट माहूर तालुक्यातील लाडक्या बहिणीची भर पडली असून किनवट तालुका हा मागास दुर्गम असल्यामुळे या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी किनवट विधानसभेचे आमदार भीमराव केराम यांना मंत्रिपद मिळावे अशी आग्रही मागणी किनवट तालुका भाजपा महिला मोर्चा आघाडीने केली असून यासंदर्भात भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन सादर करून मंत्रीपदासाठी साकडे घालणार आहोत अशी माहिती भाजपा महिला मोर्चा आघाडीच्या तालुकाध्यक्ष उषाताई धात्रक यांनी तरुण भारतशी बोलताना दिली आहे यावेळी भावनाताई दीक्षित सौ सागरताई शिंदे, गंगुबाई परेकर,पुनम दीक्षित,शोभाताई सानप, कविता बोईनवाड, करिष्मा भगत, विद्या पाटील प्रभावती भुरे यांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### ऋतुजा राजेश मालुसरे यांना इंग्लंड येथे मास्टर्स पदवी प्रदान

**नांदेड**-कु.ऋतुजा राजेश मालुसरे यांनी परदेशात उच्च शिक्षण घेत असताना इंग्लंड येथील न्यु कॅसल युनिव्हर्सिटी - टेने अपॉन, (इंग्लड) णघ येथे



मास्टर्स इन अर्बन प्लॅनिंग अँन्ड डेव्हलपमेंट या विषयात मास्टर्स ही पदवी प्राप्त केली आहे. युनिव्हर्सिटीमध्ये नुकत्याच पार पडलेल्या पदवीदान समारंभात झौष. ऊाश पपश गेहपीप यांनी पदवीपत्र सन्मानपूर्वक प्रदान केले. या विषयात असे यश मिळवणारी ऋतुजा पोलादपूर तालुक्यात प्रथमच असावी. याच युनिव्हर्सिटीत यापुढे ती असोसिएशट प्रोफेसर म्हणून रुजू होत आहे. ऋतुजाचे शालेय शिक्षण हॉली क्रास हायस्कूल परेल मुंबई, प्राथमिक शिक्षण बारावी सायन्स महर्षि दयानंद कॉलेज परेल मुंबई तर पदवी शिक्षण मनोहर फाळके आर्किटेक्ट कॉलेज मुंबई मुंबई विद्यापीठ येथून घेतले आहे.

### सशस्त्र सेना ध्वजदिन निधी सकंलन शुभारंभ कार्यक्रमाचे सोमवारी आयोजन

**नांदेड**-सशस्त्र सेना ध्वजदिन निधी २०२४-२५ संकलन शुभारंभ कार्यक्रम सोमवार ९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १२ वाजता नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालयात होणार आहे. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून या कार्यक्रमास पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल आणि इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमामध्ये सशस्त्र सेना ध्वजदिन निधी २०२३-२४ मध्ये उत्कृष्ट संकलन करणाऱ्या कार्यालय प्रमुख, कर्मचाऱ्यांचा, सह संस्था यांना प्रगस्तीपत्रके देवून सत्कार करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता, विशेष गौरव पुरस्कार प्राप्त पाल्यांचा सत्कार व माजी सैनिकांच्या पाल्यांना विशेष गौरव पुरस्कार वाटप करण्यात येणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व वीरपत्नी, वीरमाता, विरपिता, माजी सैनिक, विधवा पत्नी व त्यांचे अवलंबितांनी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थिती राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी नांदेड यांनी केले आहे.

### प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाच्या नांदेड शहराध्यक्षपदी किशन रावणगांवकर


**नवीन नांदेड**-जिल्ह्यातील सामाजिक कार्यकर्ते व सेवेत असताना महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष या पदापासून ते



महाराष्ट्र राज्य शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी महासंघाच्या राज्य सहसचिव पदापर्यंत पोहचलेले तसेच शासन स्तरावर कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न सोडवून. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी विभागीय संघटनेचे विभागीय सचिव म्हणून कार्यरत असलेले, डॉ बाबासाहेब आंबेडकर जेष्ठ नागरिक सिडको महासंघाचे अध्यक्ष म्हणुन ओळखले जाणारे व अनेक सामाजिक संघटनेच्या विविध पदावर कार्यरत असलेले किशनराव रावणगावकर हे सदैव जनतेच्या सेवेसाठी सुख दु:खात सोबत राहुन अडी अडचणी सोडविण्यासाठी पत्रकारितेच्या माध्यमातून जनसेवा व वृत्तसेवा स्वीकारली आहे. म्हणून अशा कर्तुत्वान ज्येष्ठ पत्रकाराची प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष डि.टी आंबेगावे , उपाध्यक्ष, महासचिव, सचिव, कोषाध्यक्ष, मराठवाडा विभागातील अध्यक्ष, उपाध्यक्ष, महासचिव, सचिव, कोषाध्यक्ष, नांदेड जिल्हाध्यक्ष, संजयकुमार गायकवाड, कार्याध्यक्ष भारतभाऊ सोनकांबळे, उपाध्यक्ष उध्दवराव मामडे,इंज.संधू महाराज या सर्वांनी विश्वास ठेवून नांदेड शहराध्यक्षपदी किशनराव रावणगावकर यांची दुसऱ्यांदा फेरनिवड निवड केली आहे.

### विश्वजित चौदंते यांचे निधन

**नांदेड**-शहरातील लूंबिनी नगर येथील रहिवाशी का. विश्वजीत सुनिल



चौदंते ऊर्फ ( मुन्ना ) यांचे दि.४ डिसेंबर रोजी उमरी मुदखेड रोडवर अपघाती निधन झाले. माजी सैनिक सुनिल राघोजी चौदंते यांचे एकुलते एक चिरंजीव होते. त्यांचा अंत्यविधी दि.५ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ४:४० वाजताच्या दरम्यान बौद्ध स्मशानभुमी येथे करण्यात आले.

# नरसी सह परिसरातील रब्बी पिकांनी शिवार बहरले

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. ०५ डिसेंबर**

यंदा प्रथमच रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी पीक पद्धतीमध्ये बदल केला होता. मराठवाड्यात रब्बी हंगामात ज्वारी हे मुख्य पीक असताना यंदा हरभऱ्याचा पेरा वाढला आहे. पण आता ढगाळ वातावरण निवळले असून शेतकऱ्यांकडे मुबलक प्रमाणात पाणीसाठा असल्याने नायगाव तालुक्या तील शिवारात सध्या गहू, हरभरा, ज्वारी ही सगळीच पिके बहरू लागली आहेत.

बदलती परिस्थिती आणि सततच्या पावसामुळे खरीप हंगामातील पिकांवर बुरशी नाशक रोगांमुळे उत्पादनात झालेली तुट रब्बीच्या हंगामात पिकांच्या लागवडीत काही अंशी परिसरातील शेतकऱ्यांनी बदल केला मात्र पेरणीनंतर पिक उगवन होण्यापूर्वीच अवकाळी पाऊस, ढगाळ वातावरण यामुळे रब्बी हंगामाबाबतच प्रश्नचिन्ह उपस्थित होत होते. शिवाय मध्यंतरी वाढलेला गारठा व ढगाळ वातावरण यामुळे देखील पिकांवर किडीचा प्रादुर्भाव झाला होता.

तालुक्यातील नरसी सह, कांडाळा, होटाळा, धानोरा, हिप्परगामाळ येथील शेतकरी या खरिपात हंगामातील पिकांच्या उत्पादनात झालेली घट टाळकी हारभरा, या सारख्या पिकांतून भरुन काढावी या आशेत आहे. या भागातील शेतकरी यंदाच्या रब्बीच्या हंगामात येथील शेतकरी हा कमी खर्चिक असणारे हरभरा करडई टाळकी ज्वारी यासारख्या पिकाकडे अधिकचे लक्ष दिल्याचे पीक पे-यावरुन स्पष्ट पणे दिसून आले आहे.

**१) हरभरा क्षेत्रात होणार वाढ**

सध्या पोषक वातावरणामुळे नायगांव तालुक्यात हरभरा पीक मोठ्या जोमात बहरलेले आहे. परंतू मध्यंतरी निसर्गाच्या ढगाळ व लहरीपणामुळे

हरभरा या पिंकावर ही किडीचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव जाणवू लागला होता. मात्र, वातावरण निवळताच शेतकऱ्यांनी फवारणी करुन पाणी दिल्याने आता हे पीकही बहरू लागले आहे.सध्याचे वातावरण निवळल्याने हे पीक वाढीसाठी उत्तम आहे.शिवाय शेतक-यांकडे पाणी साठाही मुबलक प्रमाणात असल्याने चिंता नाही. त्यामुळे खरिपात झालेले नुकसान भरुन काढण्याची ही संधी असल्याचे येथील कृषितज्ञ सांगत आहेत.

**२) यंदा कोथिंबीरीची ही लागवड**

नैसर्गिक संकटाची शर्यत पार करीत अखेर रब्बी हंगामातील पिके बहरली आहेत. हंगामाच्या सुरुवातीपासून निसर्गाच्या लहरीपणामुळे गहू, हरभरा, ज्वारी ही पिके थोड्या फार प्रमाणात धोक्यात होती.यंदा वाढीव उत्पादना च्या अपेक्षेने शेतकऱ्यांनी पीक पद्धतीमध्ये बदल केला होता.आता सध्या ढगाळ वातावरण निवळल्याने आता पोषक असल्याने उत्पादनात वाढ होईल असा आशावाद व्यक्त केला जात आहे.हंगामी पीक म्हणून कोथींबीर ची लागवडही शेतकऱ्यांनी केली असून. सध्याच्या दर वाढीमुळे याचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे.

**३) तालुक्यातील नरसी सह,मुस्तापुर,लोहगांवात रानभाज्यांचाही प्रयोग**

रब्बीहंगामात केवळ उत्पादनावरच भर दिला जात नाही तर वातावरणामुळे रानभाज्या चे उत्पादनही घेतले जात आहे. विक्रीसाठी नाही पण किमान घरगुती वापरासाठी म्हणून शेतकरी वाची लागवड करतात.मुख्य पिकां बरोबर रानभाज्यानेही शिवार बहरलेले आहे यंदा पोषक वातावरणामुळे खरिपापेक्षा रब्बी हंगामातच शिवार नंदनवन झाल्याचे चित्र आहे.

मागील दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण निवळल्याने सध्या गुलाबी थंडीचे वारे वाहू लागल्यामुळे रब्बी हंगामा तील पिकांना पोषक वातावरणामुळे सध्या तालुक्यातील नरसी सह परिसरातील शेती शिवारातील पिकं ही बहरु लागली आहेत.

# धर्माबाद शहरात पुन्हा मटका सुरू; बंद झालेला मटका कसा झाला सुरू

**तभा वृत्तसेवा**
**धर्माबाद,दि. ०५ डिसेंबर**

धर्माबाद शहरात रेल्वे स्टेशन वर असलेल्या बेकरी मध्ये खुले आम मटका सुरू असून याकडे स्थानिक पोलीस प्रशासन करवाई करीत नाही त्यामुळे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक साहेबांनी कारवाई करावी अशी मागणी जनतेतून होत आहे



नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलिस उप महानिरीक्षक शहाजी उमाप साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार साहेब यांनी ऑपरेशन फ्लश आऊट मोहीम राबवित मटका, गुटका जुगार व्यवसाय बंद करून खाकीचा धाक निर्माण केला होता.

निवडणुक संपली आणि पुन्हा नव्याने खुलेआम मटका सुरू झाला आहे त्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचा धाक केवळ सुरुवातीलाच दोन महीने होता का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. धर्माबाद तालुक्यात पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे यांनी अनेक ठिकाणी धाडी टाकून अवैध दारू, जुगाराचे अड्डे, गुटका विक्री यावर कारवाई केली म्हणून मधल्या काळात अवैध धंदे बंद झाले होते. आता पुन्हा शहरात रेल्वे स्टेशन रोड वर असलेल्या बेकरी मध्ये खुले आम मटका सुरू झाला असून यावर पोलीस प्रशासनाने करवाई करून अवैध व्यवसाय बंद करावे अशी मागणी जनतेतून होत आहे

# व्हॉइस ऑफ मिडियाची कार्यकारणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि. ०५ डिसेंबर**

देशातील नंबर एकची संघटना अशी नोंद असलेल्या व्हॉइस ऑफ मिडिया या आंतरराष्ट्रीय संघटनेची शासकीय विश्रामगृह कंधार येथे दि ३ रोजी मंगळवारी सायं ७ वाजता लोकशाही पध्दतीने कंधार तालुक्याची कार्यकारणी जाहिर करण्यासाठी हात वरती करून मतदान घेण्यात आले त्यातून तालुकाध्यक्षपदी सय्यद हबीब तर उपाध्यक्षपदी मारोती चिलपिपरे, सचिव पदी विनोद तोरणे, सहसचिव संतोष कांबळे, कार्याध्यक्ष माधव गोटमवाड, सदस्य मगदूम परदेशी, प्रा जमील बेग, अँड सिद्धार्थ वाघमारे , माधव जाधव, अड. उमर शेख यांची निवड झाली. या बैठकीला जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश जोशी, कार्याध्यक्ष बाळासाहेब पांडे, उपाध्यक्ष तुकाराम सावंत, सचिव अनिल धमणे पाटील, जिल्हा संघटक ऋषिकेश कोंडेकर, कोषाध्यक्ष सूर्यकुमार यनावार, डॉ प्रदिप राजपूत यांची उपस्थिती होती. बैठकीच्यावेळी संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांच्या सूचनेवरून डॉ. गणेश जोशी यांनी तालुकाध्यक्षाची निवड लोकशाही



प्रध्दतीने होणार असल्याचे सांगितले. यावेळी हात उंचावून मतदान घेण्यात आले. त्याप्रमाणे वरील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमावेळी जिल्हाध्यक्ष डॉ गणेश जोशी यांनी बोलताना म्हणाले, जागतिक पातळीवर पत्रकारासाठी न्याय हक्कासाठी काम करणारी एकमेव संघटना म्हणून व्हाईस ऑफ मीडिया काम करते. पत्रकारासाठी कौशल्य शिक्षण, घरकुल, आरोग्य, निवृत्तीनंतर पेन्शन योजना आदी पत्रकाराच्या प्रश्नासाठी संघटना काम करत आहे.ग्रामीण भागातील पत्रकार सक्षम झाला पाहिजे,छोटे-मोठे उद्योग आदी पंचसूत्री कार्यक्रम घेऊन संघटनेची वाटचाल सुरू असल्याचे सांगितले. यावेळी व्हॉईस ऑफ मीडिया च्या कंधार तालुका अध्यक्ष पदी निवड झाल्या बद्दल जय महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स मीडिया कंधारच्या वतीने सत्कार करण्यात आला. या निवडी बद्दल आमदार प्रतापराव पाटिल चिखलीकर ,प्रविण पाटिल चिखलीकर ,प्रणिताताई देवरे चिखलीकर ,रमेश सिंह ठाकुर, दयानंद कदम, मयूर कांबळे, राजरत्न गायकवाड, शुभम केंद्रे, संभाजी कांबळे, निलेश गायकवाड, अँड शिवराज बनसोडे यांच्यासह आदींनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# उमरी तालुक्यात रोजगार हमी मध्ये करोडोचा घोटाळा

## सामाजिक वनीकरण, कृषी विभाग, वनविभाग, पंचायत समिती आधिकारी चौकशी व्हावी मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०५ डिसेंबर**

उमरी तालुक्यात रोजगार हमी योजनेअंतर्गत पंचायत समिती उमरी येथे विविध विभागात करोडोचा घोटाळा झाला आहे . प्रत्यक्षात शासकीय योजनेचे कामे नसल्याने माहिती घेतल्याने अधिकारी यांची तारांबळ उडाली आहे

उमरी तालुक्यात शेकडो शेतकरी यांना संबंधीत अधिकारी पात्र नसतांना अर्थिक तडजोड करून शासकीय योजनेचा लाभ टककेवारी घेवून करीत आहेत हा अरोप पात्र शेतकरी यांचा अरोप असून चौकशी करणाऱ्यारे माय का लाल असले तरी लाभार्थी शेतकरी यांना न्याय द्यावे अशी अपेक्षा आहे .

उमरी तालुक्यात रोजगार हमीचे कामे जोमात चालू आहेत कुठे रोपवटीक, कुठे फळभाग , लिंबू , चिकू असे रोजगार नुसार कामे चालू आहेत .

हे कामे हुंडा गप बिहार पॅर्टन नुसार पाच कामे आहेत एंकदीरत एका गावच्या कामाला १० ते १५ लाख योजनेचा खर्च गावच्या लोकसंख्ये नुसार असतो. सामाजिक वनिकरण अंतर्गत ही ६ गावात रोपपटीका आहे. कुषी विशग अंतर्गत ७२ कामे मंजूरी कामे चालू आहेत. फॉरेस्ट ऑफिसर (वनविभाग) अंतर्गत ८३ कामे चालू आहेत अभा सामाजिक वनीकरण विभाग, फॉरेस्ट ऑफिसर वनविभाग, उमरी कृषी विभाग, पंचायत समिती रोजगार अंतर्गत करोडोचा घोटाळा आहे यामध्ये अनेक गावात बिहार पॅर्टन रोजगार हमी योजना आहे मात्र उमरी तालुकात गाव निहाय चौकशी केल्या अंती मोठा कांड उघडकीस येण्याच्यी शक्यता आहे.

मात्र जन सामान्यातुन राजकीय नेता पुढे येवून उठाव करण्याची गरज भासत आहे. उमरी तालुक्यात असा मयाळू नेता जमसेवा करण्यासाठी उत्पन्न होवू शकतो की अनुभवी नेत्याची चाकरी करून दिवस काढतो हा प्रश्न निर्माण होत असून उमरी तालुक्यातील सत्ताधारी विरोधीकाची मिलीभगत असल्याने राजकीय नेते, कार्यकर्ते ठोस भुमिका न घेता सामाजिक राजकीय आर्थिक जिवन भागत असल्याचे चित्र उमरी तालुक्यात दिसून येत आहे राजकीय क्षेत्रात असो की सामाजीक धार्मीक क्षेत्र असो भलेही कोणी समाजात धर्मात मोठे असले तरी स्वार्थासाठी भरकट जात असल्याचे चित्र उमरी तालुक्यात दिसत असल्याने उमरी तालुक्यात विविध शासकीय कार्यालयात मोठा शासकीय योजनेचा भ्रष्टाचार झाला असल्याचे खऱ्या लाभार्थींनी दै तरुण भारत सोलापूर जिल्हा नांदेड प्रतिनिधीरी चर्चा केली आहे.

उमरी पंचायत समिती अंतर्गत करोडोचा घोळ आहे यांची चौकशी झाली पाहिजे असे मत पात्र लाशर्थी यांनी केली आहे.

# निवघा परिसरात खुलेआम मटका चालू

**तभा वृत्तसेवा**
**निवघा(बा),दि. ०५ डिसेंबर**


तरूण पिढी व्यसनाच्या आहारी मटक्यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर निवघा बाजार परिसरात तालुक्यात मोठ्या प्रमाणात अवैध धंदे फोफावले आहेत. यामध्ये तरूण पिढी व्यसनाधिन बनत चालली असून अवैध मटका जुगार अड्ड्यावर तरूणांचा गराडा दिसून येत आहे. याकडे पोलिसांचा कानाडोळा होत असल्याने भांडण तंट्यातही वाढ होताना दिसून येते. शिवाय अवैध धंद्यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत. निवघा परिसरात अवैध धंदे बंद करण्याची मागणी होत आहे. जनतेत उलटसुलट ऊत आला आहे. चर्चेला शहरात ठिकठिकाणी मटक्याचे सार्वजनिक ठिकाणी खुलेआम मटक्या चे स्टॉल थाटण्यात आले आहेत हॉटेलमध्ये खुलेआम मटका घेणे चालू आहे. तसेच निवघा बाजार परिसरात व सर्कलमध्ये मोठ्या प्रमाणात मटका सुरू आहे. डोळ्यात धुळ फेकीत निवघा परिसरात व सर्कलमध्ये मोठ्या प्रमाणात मटका खुलेआम पद्धतीने सुरू असून या प्रकरणी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी त्वरीत लक्ष देऊन चालु असलेले मोबाईल दु मोबाईल मटका, बंद करण्याची मागणी जनतेतून मोठ्या प्रमाणात केली जात आहे.

# श्री सुभाष व शिऊर साखर कारखान्याचे पुर्ण क्षमतेने गाळप सुरू

## मोठ्या प्रमाणात ऊसाची लागवड करावी : देशमुख

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. ०५ डिसेंबर**

यावर्षी राज्य सरकारने गळीत हंगाम सुरू करण्यात एक महिना उशिरा परवानगी दिली. तरीही पण हदगावचा श्री सुभाष शुगर व वाकोडी येथील शिऊर साखर कारखान्याने मागील पंधरा-वीस दिवसापासून प्रचंड वेगाने गाळपास सुरू केली असून कारखान्याकडे ऊस लागवडीची नोंद दिलेल्या क्षेत्रातील बऱ्याच मोठ्या प्रमाणात ऊसतोड झालेली आहे. कार्यक्षेत्रातील व या कारखान्याकडे नोंद दिलेल्या संपूर्ण ऊसाची तोडणी मार्च महिन्यापर्यंत पुर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचे कारखाना व्यवस्थापनाने सांगितले आहे.



हदगाव-हिमायतनगर तालुक्यात मोठ्या प्रमाणात ऊसाची लागवड केलेली आहे. यावर्षी सुद्धा ईसापुर धरण पूर्ण क्षमतेने भरलेले आहे. त्यामुळे डिसेंबर महिन्यापासून कयाधू शाखा कालव्याद्वारे पाणी सोडण्यात येणार आहे. कयाधू व पैनगंगा खोऱ्यातील जमीन काळी कसदार व ऊसासाठी अत्यंत उपयुक्त आहे. त्यामुळे या जमिनीत ऊसाचे पीक फार मोठ्या प्रमाणात उत्पादन देत आहे. आमच्या गावच्या शिवारातील अनेक शेतकऱ्यांना सरासरी एकरी ऐंशी ते नव्वद टनापर्यंत उतारा येत असल्याचे बोरगांव येथील दिलीपराव सोळंके यांनी सांगितले.

सध्या श्री सुभाष शुगर या हदगाव शहरा जवळील साखर कारखान्यात मोठ्या प्रमाणात तोडणी यंत्रणा कार्यान्वित झालेली आहे. श्री सुभाष शुगर या साखर कारखान्यात दररोज सरासरी पाच हजार टन ऊसाचे गाळप केल्या जात आहे. तसेच शिऊर साखर कारखान्यामध्ये प्रतिदिन साडेतीन हजार टन ऊसाचे गाळप केल्या जात आहे. त्यामुळे वेगाने होत असलेली तोडणी लक्षात घेता शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात समाधान व्यक्त केले आहे. मागील काही वर्षापासून सोयाबीन पिकाने धोका दिला असून कापसाचे सुद्धा सुधारित जीएम बियाण्यांच्या वाणाला सरकारकडून परवानगी मिळत नसल्याने कापसाचे उत्पादन घटलेले आहे. तसेच भाव सुद्धा अपेक्षेपेक्षा कमी मिळत आहे. त्यामुळे संपूर्ण शेतकऱ्यांची भिस्त असलेल्या या सोयाबीन आणि कापूस पिकातून नफा मिळण्याऐवजी तोटाच होत आहे. त्यामुळे आता बरेच शेतकरी ऊसाचे उत्पादन घेण्याकडे वळले आहेत. शेतकऱ्यांनी आपली प्रगती करण्यासाठी जास्तीत जास्त ऊसाची लागवड करून ऊसाचे उत्पादन घ्यावे. असे आवाहन शेतकरी नेते दत्तराव सुकळकर यांनी शेतकऱ्यांना केले आहे. श्री सुभाष शुगर व शिऊर साखर कारखान्याचे व्यवस्थापनाने सुद्धा कारखान्याकडे नोंद देऊन कितीही लागवड केली तरी कोणत्याही शेतकऱ्यांचा ऊस तोडणी ऐवजी शेतात उभा राहू दिला जाणार नाही. संपूर्ण शेतकऱ्यांचा ऊस मार्च महिन्याच्या आत तोडणीचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून पुर्ण क्षमतेने गाळप करत आहोत असा विश्वास शेतकऱ्यांना दिला आहे.

# हुंड्यासाठी सासरच्या मंडळीकडून मुलीचा खून

## अटकेसाठी आईचा आमरण उपोषणाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. ०५ डिसेंबर**

देगलूर तालुक्यातील नवीन शेवाळा येथील मुलीचा विवाह तमलूर येथील नात्यात करण्यात आला होता. या मुलीचा हुंड्याच्या मागणीसाठी सासरच्या मंडळींनी गळफास देऊन हत्या केल्याचा गुन्हा आईच्या फिर्यादीवरून दाखल करण्यात आला आहे. दोन महिन्याचा कालावधी लोटला असताना देखील आरोपींना अटक करण्यात आली नसल्याने मुलीच्या आईने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण व आत्मदहनाचा इशारा दिला आहे. देगलूर पोलीस ठाणे येथे गु. र.नं. ४६०/ २०२४ नुसार तमलूर येथील विवाहिता निकिता अरुण खांडेकर हिचा दि. २५ सप्टेंबर २०२४ रोजी खून करून तिच्या सासरच्या मंडळींनी दिशाभूल करण्यासाठी आत्महत्या केल्याचा बनाव केला होता. हे प्रकरण मुलीची आई व माहेरच्या मंडळींना तमलुरचे आजी-माजी सरपंच तसेच देगलूर पोलीस ठाण्यातील बीट जमादारासह पोलिसांनी पैशाचेआमिष दाखवून दाबण्याचा प्रयत्न केला होता. परंतु मुलीच्या आई व माहेरच्या मंडळींनी दबाव झुगारून याप्रकरणी दि. २८ सप्टेंबर २०२४ रोजी सासरच्या मंडळींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा दाखल होऊन दोन महिन्याचा कालावधी उलटला आहे परंतु सदर आरोपींना पोलिसांकडून अभय दिल्या जात असल्याचा आरोप मुलीची आई शिवकांता बालाजी बंडगर यांनी पोलीस उपमहानिरीक्षक व जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केला आहे. वारंवार पाठपुरावा करून देखील आरोपींना अटक केल्या जात नसल्याने पोलिसांच्या भूमिकेकडे संशय व्यक्त करीत शिवकांता बंडगर यांनी दि.११ डिसेंबर २०२४ रोजी पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण व आत्मदहनाचा इशारा दिला आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### महापरिनिर्वाण दिनी अभिवादनासाठी मनपाव्दारे व्यवस्था

**परभणी,/प्रतिनिधी-** भारतरत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त येथील स्टेशन रस्त्याावरील पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यासाठी मनपाकडून सर्वतोपरि व्यवस्था करण्यात आली आहे.
महापरिनिर्वाण दिनानिमित्त शुक्रवार ६ डिसेंबर रोजी येथील पूर्णाकृती पुतळा परिसरात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रशासकीय कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी व नागरीक उपस्थित राहणार आहेत. त्याा पार्श्वभूमीवर महानगरपालिका आयुक्त धैर्यशील जाधव यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त मिनिनाथ दंडवते यांनी ४ डिसेंबर रोजी पुतळा परिसराची पाहणी केली व आवश्यक कार्यवाहीच्या सूचना दिल्या. त्याानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात सिडी उभारणे, परिसर स्वच्छता करणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, पथदिवे सुरळीत चालू ठेवणे, पुष्पहार, टेन्ट, खुर्ची, टेबल, सतरंजी, पुतळ्याच्या ओट्याची सजावट विद्युत रोषणाई, ध्वनी-क्षेपण इ. व्यवस्था महापालिकेच्यावतीने करण्यात येणार आहे.

### बाल विद्यामंदिरमध्ये शालेय स्तरावरील विज्ञान प्रदर्शन

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील बाल विद्यामंदिर हायस्कूलच्या नानल पेठ व वैभव नगर शाखेत गुरुवारी (दि.५) शालेयस्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.
या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन नानलपेठ विभागात बाल विद्यामंदिर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.श्री. एन.ए.झरकर तर वैभव नगर विभागात बाल विद्यामंदिर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. विवेक नावंदर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक अरुण बोराडे, उपमुख्याध्यापक आर. जी. तुम्मेवार, पर्यवेक्षक पी. व्ही. रुघे, बी. के. कोपरटकर व पर्यवेक्षिका सौ. एस. एम. बोके उपस्थित होत्याा.
या प्रदर्शनात वर्ग सहावी ते आठवीच्या गटामधून १०२ प्रयोग व वर्ग नववी ते बारावीच्या गटातून २५ प्रयोग असे एकूण १२७ प्रयोग मांडण्यात आले होते. या प्रदर्शनाचे परीक्षण कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राध्यापक करनाडे, डॉ. मोरे, सौ. अग्रवालव सुरवसे यांनी केले. या प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी प्रशालेच्या दोन्ही शाखेतील सर्व शिक्षकांनी परीश्रम घेतले.

### तरुणाच्या धमक्यापोटीच त्या तिघांच्या आत्महत्या

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** तुमच्या मुलीसोबत लग्न लावून द्या, अन्यथा मी तीची बदनामी करेल, अशी वारंवार धमकी देणाऱ्या तरुणाच्या मानसिक त्रासापोटीच गंगाखेडातील शिक्षक मसनाजी सुभाषराव तुडमे यांनी पती व मुलीसह आत्महत्याा केल्याची बाब गंगाखेड पोलिसांच्या तपासात उघडकीस आली आहे.
दरम्यान, या प्रकरणात संबंधित युवक शिवम नारायण राऊत (रा. परभणी) याच्या विरोधात त्याा तिघांना आत्महत्योस प्रवृत्त केल्याबद्दल गंगाखेड पोलिस ठाण्यात ४ डिसेंबर रोजी रात्री उशीरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
२८ नोव्हेंबर रोजी तुडमे यांनी पती रंजना व मुलगी अंजली हीच्यासह रेल्वेसमोर उडी मारुन आत्महत्याा केली. या घटनेने संपूर्ण गंगाखेड शहरासह जिल्हावासीय हादरले. विशेषतः पोलिसांसमोर तपासाचे मोठे आव्हान उभे राहिले. गंगाखेड पोलिसांनी लगेचच या प्रकरणाचे गुढ उकलण्याचा संकल्प सोडला. उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे, पोलिस उपनिरीक्षक दिपककुमार वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक सिध्दार्थ इंगळे व अन्य कर्मचाऱ्यांच्या पथकाने मागोवा घेतला. त्याावेळी केलेल्या चौकशीतून एक तरुण या कुटूंबातील मुलीच्या मागे तू माझ्याशी लग्न कर, असा तगादा लावत होता, अशी माहिती हाती आली. त्याावेळी त्याा तरुणाने या कुटूंबियांना मुलीबरोबर माझे लग्न करुन द्या, नाहीतर मी तीची बदनामी करेल, असे धमकावल्याचीही माहिती कळाल्याबरोबर या पथकाने शिवम नारायण राऊत या परभणीच्या युवकास ताब्यात घेतले. या युवकाने मृत्यू पावलेल्या त्याा मुलीच्या इन्स्ट्राग्राम अकाऊंटवर काही फोटो व्हायरल केल्याची माहिती हाती आली तेव्हा, या पथकाने त्यााला पोलिसी खाक्या दाखवल्या, तेव्हा या आत्महत्योमागील कारणांचा उलगडा झाला. दरम्यान, या प्रकरणात शिवाजी तुडमे यांच्या फिर्यादीवरुन बुधवार ४ डिसेंबर रोजी रात्री गंगाखेड पोलिसांनी शिवम नारायण राऊत या तरुणावर त्याा तिघांना आत्महत्योस प्रवृत्त केल्याबद्दल गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी या प्रकरणात तपास सुरु केला आहे.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# गुट्टेंच्या गळयात पडू शकते मंत्रिपदाची माळ ?

## मुख्यमंत्री यांनी ठरविल्यास शक्य - जुने सहकारी म्हणूनही होवू शकतो मंत्रिपदाने गौरव

**..तर तो क्षण फडणवीस-गुट्टे मैत्रिचा नवा अध्याय ठरेल!**

**मुंबई येथील आझाद मैदानावर आज होत असलेल्या शपथविधी सोहळ्यात भाजपचे गटनेते देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील, हे निश्चित झाले आहे. मात्र, त्याामध्ये किती जण मंत्री म्हणून शपथ घेणार, हे आणखी गुलदस्त्याात आहे. परंतु, त्याा संभाव्य नावांम ध्ये आ.डॉ.गुट्टे यांचे नाव असल्यास तो क्षण फडणवीस-गुट्टे मैत्रीचा नवा अध्याय ठरेल.**

**परभणी,/प्रतिनिधी:** विधानसभेच्या निवडणूक निकालानंतर राज्यामध्ये महायुतीची सत्ता स्थापन होणार आहे. भाजप हा सर्वात मोठा पक्ष असल्याने साहजिकच मंत्रिपदासाठी देखील रस्सीखेच सुरू आहे. २०१४ मध्ये ज्याप्रमाणे भारतीय जनता पक्षाने सोबतच्या काही नवीन चेहऱ्यांना मंत्रिपदाची संधी दिली. त्यााचा आताही विचार केला गेला तर गंगाखेडचे रासप आमदार डॉ. रताकर गुट्टे मंत्रिपदासाठी प्रबळ दावेदार ठरू शकतात. त्यााचप्रमाणे देवेंद्र फडणवीस यांचे मराठवाड्यातील खंबीर व निष्ठावंत सहकारी आमदार म्हणूनही त्याांना मंत्रिपदाची संधी मिळू शकते, अशी चर्चा राजकीय तज्ज्ञांमध्ये होत आहे.
आपल्या पहिल्याच टर्ममध्ये उत्कृष्ट काम करून आ.डॉ.रताकर गुट्टे यांनी जनमानसात आपली प्रतिमा निर्माण केली आहे. त्याामुळे विकासरत आम दार म्हणून ते जिल्ह्याच्या राजकारणात परिचित आहेत. पहिल्या टर्ममध्ये मि ळालेल्या अल्प कालावधीचा उपयोग करून त्याांनी करोडो रुपयांची कामे गंगाखेड विधानसभा मतदारसंघात केली. कोट्यवधींच्या विकासाची गंगा त्याांनी मतदारसंघात वाहती ठेवली. त्याांनी केलेल्या चौफेर विकासकाम ांमुळे
जनता देखील समाधान व्यक्त होत आहे. म्हणूनच नागरिकांनी त्याांना विकासरत ही उपाधी दिली आहे. दांडगा जनसंपर्क, प्रत्योकाला कुटुंबातील सदस्याप्रमाणे दिला जाणारा मान, अडल्यानडल्यांची तातडीने केली जाणारी कामे, समस्या, तक्रारींचा तातडीने निपटारा, यामुळे आ.डॉ. रताकर गुट्टे यांनी मतदारसंघात आपल्या
कार्य कर्तृत्वाची वेगळी छाप पाडली आहे. त्याामुळे संभाव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनावर घेतले तर आमदार डॉ.रताकर गुट्टे हे नाम दार बनतील, अशी चर्चा सर्वत्र सुरू आहे. तसेच पडत्याा काळात भाजपला मोलाची साथ देऊन मदतीचा हात देणारे जुने निष्ठावंत सहकारी म्हणूनही आ.डॉ.गुट्टे यांच्याकडे मंत्रिपद चालून येईल, असा विश्वास कार्यकर्त्याांना आहेच, पण तशी चर्चा राजकीय जाणकारांमध्येही होत आहे.
दरम्यान, निकालाच्या दुसऱ्याच दिवसापासून आ.डॉ.गुट्टे हे मुंबई येथे ठाण मांडून बसले आहेत. त्याा काळात त्याांनी पाच ते सहा वेळा देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. तसेच फडणवीस यांनाच नैसर्गिक न्यायाने मुख्यमंत्री करायला हवी, ही मागणी करून पाठींबा सुद्धा दिला आहे.



### दोन दिवसात कापसाचे भाव घसरले

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरासह जिल्ह्यातील वातावरणातील मोठ्या बदलाच्या पार्श्वभूमीवर गेल्या दोन दिवसांपासून कापसाचेही भाव घसरु लागले आहेत. या जिल्ह्यात यावर्षी कापसास बऱ्यापैकी भाव मिळतो आहे. त्यामुळेच कापूस उत्पादकांना थोडाफार का होईना दिलासा मिळतो आहे. परभणी, मानवत, सेलू, सोनपेठ या भागात कापूस उत्पादक मोठ्या प्रमाणावर कापूस विक्रीस आणतो आहे. कापसाचे भाव आणखीन वाढतील, या अपेक्षेपोटी उत्पादक निश्चितच प्रतिक्षेत आहेत. परंतु, गेल्या दोन-चार दिवसात वातावरणातील बदलाने थंडी ऐवजी ढगाळ वातावरण व हवेत आर्द्रता पसरल्याने, थोडाफार पाऊस झाल्यामुळे कापसाचेही भाव घसरले आहेत.

## पूर्णेत आज महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन सभा

**पूर्णा,/प्रतिनिधी-** भारतरत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमिताने बोधीसत्व डॉ.बि.आर.आंबेडकर बुद्ध विहार समिती व भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे.
या निमिताने सकाळी ९:३० वा डॉ. आंबेडकर चौक येथे उपासक अमृत मोरे यांच्या हस्ते ध्वजारोहन करून अर्ध्यावर उतरवण्यात येईल दुपारी १२ वा. बुद्ध विहार येथे सामुहिक बुद्धवंदना व त्याानंतर शहराच्या मुख्य मार्गावरून डॉ.आंबेडकर चौका पर्यंत डॉ आंबेडकरांच्या प्रतिमेची शोक मिरवणूक निघेल व डॉ.आंबेडकर चौक येथे अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे,या सभेच्या अध्यक्ष स्थानी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष शामराव जोगदंड प्रमुख वक्ते म्हणून युवराज म रे,रिपब्लिकन नेते प्रकाश कांबळे मार्गदर्शन करणार आहेत त्याा नंतर सायं ६ वा डॉ आंबेडकर नगर येथुन मेणबती ज्योत रॅली निघणार आहे या कार्यक्रमास जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन डॉ. बी.आर.आंबेडकर स्मारक बुद्ध विहार समिती व भारतीय बौद्ध महासभा पूर्णा यांच्या वतीने करण्यात येत आहे.



**परभणी- राष्ट्रीय सेवा योजना के. के. एम. कॉलेज मानवत व पी. टी. एस. पी. फार्मसी म हाविद्यालय मानवत यांच्या संयुक्त विद्यमाने १ डिसेंबर ते ७ डिसेंबर या कालावधी मध्ये विविध जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.**

## राष्ट्रीय सेवा योजना व के.के.एम महाविद्यालयाच्यावतनी एडस रॅली

**मानवत,/प्रतिनिधी:** म ानवत शहरात जागतिक एड्स दिन २०२४ निमित्ताने एकात्मि क सल्ला व चाचणी केंद ग्राम ीण रुग्णालय मानवत,रेड रिबिन क्लब, राष्ट्रीय सेवा योजना के. के. एम. कॉलेज मानवत व पी. टी. एस. पी. फार्मसी महाविद्यालय मानवत यांच्या संयुक्त विद्यमाने १ डिसेंबर ते ७ डिसेंबर या कालावधी मध्ये विविध जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.
त्याा अंतर्गत दिनांक २ डिसेंबर रोजी के. के. एम. कॉलेज मानवत येथे भित्तीपत्रक स्पर्धा आयोजित करण्यात आली. विद्यार्थी यांनी एचआयव्ही दिवस याविषयी विविध भित्तीपत्रके तयार केली होती. त्याांचे निरीक्षण प्राचार्य डॉ भास्कर मुंडे, प्राचार्य डॉ. नागनाथ कदम व वैद्यकीय अधीक्षक डॉ शेख सर यांनी करून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक काढले. दिनांक ३ डिसेंबर रोजी ३० गुणांची परीक्षा घेण्यात आली त्याच दिवशी एड्स जनजागरण रॅली मानवत शहरात काढण्यात आली. तर ४ डिसेंबर रोजी महाविद्यालय युवतींसाठी रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदरील कार्यक्रमाचा हेतू युवकांमध्ये एचआयव्ही आजाराविषयी जनजागृती व त्याांच्या मार्फत समाजात जनजागृती होणे हा आहे. वरील सर्व कार्यक्रम वैद्यकीय अधीक्षक डॉ शेख सर , श्री लोळगे सर व श्री यादव यांच्या बहुमूल्य मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रा. से. यो. कार्यक्रमाधिकारी श्री सुभाष शिंदे, श्री सत्यानारायण राठी, सुनीता कुकडे समुपदेशक श्री राजू कच्छवे, प्रयोगशाळा तंत्रज्ञ श्री कपिल भरड यांनी परिश्रम घेतले.

## पाणीपुरवठयाची कामे वेळेत पूर्ण करा-जिल्हाधिकारी

**परभणी,/प्रतिनिधी :** जल जीवन मिशन २०२४-२५ अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा योजनेची कामे विहीत वेळेत आणि गुणवत्ता पूर्ण करा. त्याासोबतच सुधारित प्रशासकीय मान्यता प्राप्त असलेली कामेही कंत्राटटदारांकडून जलदगतीने पूर्ण करून घ्यावीत. त्याासाठी क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांनी त्याांच्या दैनंदिन कामाच्या प्रगतीचा आढावा घ्यावा. या योजनेतील वाढीव कामांना निधी नक्कीच मिळणार असल्यामुळे या कामाला प्राधान्य देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे अध्यक्ष रघुनाथ गावडे यांनी दिले.
जलजीवन मिशन कार्यक्रम सन २०२४-२५ अंतर्गत घेण्यात आलेल्या कामांचा आढावा जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात घेतला. त्याावेळी जिल्हाधिकारी श्री. गावडे बोलत होते.
यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नतिशा माथुर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राहुल गिते, उपअभियंता पी. डब्ल्यू कोहाड, वरिष्ठ भूवैज्ञानिक श्रीमती ए. सी. कुरणे, सहायक वन संरक्षक (प्रादेशिक) गंगाधर ढगे, अधीक्षक कृषी अधिकारी (तंत्र अधिकारी) पी. सी. सिरस यांच्यासह ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उप अभियंता आदिंची उपस्थिती होती.
जलजीवन मिशन योजनेतील ग्रामीण पाणीपुरवठ्याची कामे अधिक करण्याची आवश्यकता असून, क्षेत्रीय स्तरावर काम करणा-या उप अभियंता आणि कनिष्ठ अभियंत्याांनी विशेष लक्ष घालून पाठपुरावा करावा. उन्हाळ्यात ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न उद्भवू नये, यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी कंत्राटदारांकडून ही कामे निर्धारित वेळेत पूर्ण करून घ्यावीत. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती माथुर यांनी लक्ष घालून पाणीपुरवठ्याची गतीने कामे न करणा-या कंत्राटदारांना नोटीस देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. गावडे यांनी केल्या.
जिल्ह्यातील सर्वच भागातील ग्रामीण पाणीपुरवठा योजनांच्या कामांच्या स्थितीबाबत दैनंदिन प्रगती तपासावी. क्षेत्रीय अधिका-यांनी सक्रियतेने आणि अधिक गतीने कामे करून घेणे आवश्यक आहे. त्याासाठी मोठ्या प्रमाणावर पाठपुरावा करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्री. गावडे यांनी बैठकीत दिले.

## राज्यमंत्री मंडळात जिल्हयास स्थान मिळणार



### आमदार मेघना साकोरे बोर्डीकर यांचे नाव आघाडीवर

**जिंतूर,/प्रतिनिधी-** विधानसभा निवडणूकीत भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष व शिवसेना या तीन प्रमुख पक्षांच्या महायुतीने सर्वदूर प्रचंड यश पटावल्याने व या जिल्ह्यातील चार पैकी तीन मतदारसंघात महायुतीचे उमेदवार विजयी झाल्याने राजकीय वर्तूळासह जिल्हावासीयांच्या मंत्रीपदाच्या अपेक्षा उंचावल्या आहेत.
या पार्श्वभूमीवर आता पुन्हा या जिल्हावासीयांना मंत्रीमंडळात भारतीय जनता पार्टीच्या आमदार मेघना साकोरे बोर्डीकर यांना मंत्रीपद निश्चितच भेटेल, अशी अपेक्षा जिल्हावासीय बाळगून आहेत भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्याांना त्याअनुषंगाने मोठ्या अपेक्षा आहेत विशेष म्हणजे आमदार मेघना साकोरे बोर्डीकर या दुसऱ्यांदा निवडून आल्या आहेत आणि देवेंद्रजी फडणवीस यांच्या वर्तूळातील आमदार म्हणून त्याा सुपरिचित आहेत.कालच विधान भवन परिसरात विधीमंडळ पक्षाचा नेता निवडताना दोन्ही केंद्रीय निरीक्षक श्रीमती निर्मलाजी सीतारामन आणि विजयजी रुपाणी यांच्या समक्ष देवेंद्रजी फडणवीस यांच्या नावांचा प्रस्ताव चंद्रकांत दादा पाटील आणि सुधीर भाऊ मुनगंटीवार यांनी मांडला आणि या प्रस्तावास अनुमोदन देण्यासाठी पक्षातील मोजक्याच वरिष्ठ नेत्याांनी या नावाला मान्यता दिलेली आहे यात प्रामुख्याने मराठवाड्यातून आमदार मेघना साकोरे बोर्डीकर यांना सुद्धा यास अनुमोदन देण्याचे भाग्य लाभले आहे यात त्याांचे पक्षातील महत्त्व मात्र वाढल्याचे दिसून येते जिल्हा वासियासाठी अभिमानाची आणि आनंदाची बाब असून यात आमदार मेघना साकोरे बोर्डीकर मंत्रिमंडळात स्थान मिळण्याच्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत या अनुषंगाने आमदार मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या रूपाने मंत्री मंडळात स्थान मिळेल यात शंकाच नसावी.

## जिंतूर-वरुड रस्त्याची दुरावस्था- प्रवाशांना सोसावे लागताहेत हाल

**जिंतूर,/प्रतिनिधी :** अगोदरच रस्ता अरुंद आणि त्याावरील खड्डे विखरलेली जाड खडी, खचलेले पुल अशी जिंतूर ते वरुड-नृसिंह या पाच किलोमीटर अंतराच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने हा रस्ता धोकादायक बनला आहे.
जिंतूर तालुक्यातील श्री.नृसिंहाचे एकमेव देवस्थान असलेले वरुड येथील पुरातन नृसिंह मंदिर असून येथे वर्षात दोन धार्मिक उत्सव साजरे होतात. श्रावण महिन्यात प्रत्योक शनिवारी शहरातून पायी दिंडी जाते शिवाय रोज मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. रस्त्याालगत संतश्री संताबुवा महाराज यांचे पवित्र समाधीस्थळ आहे. तसेच गुरुकुल आश्रम, वीज मंडळाचे कार्यालय, वखार मंडळाचे गोदाम, एक विद्यालय, दोन ऑईल मिल व जिनिंग या रस्त्याालगतच आहे.पुढे हा रस्ता वडाळी, जोगवाड्यापर्यंत जातो. अगोदरच अरूंद असलेल्या या रस्त्याची अनेक वर्षापासून दुरुस्ती नसल्याने अनेक ठिकाणी रस्ता दोन्ही बाजूने खचला, छोटे दोन पूलही एका बाजूने खचले, शिवाय पूर्ण रस्ता उखडून लहानमोठ्या खड्ड्यांनी व्यापला, त्याातील खडी रस्त्याावर पसरली असल्याने शंभर पन्नास फ ूट देखील रस्ता वापरायोग्य व्यवस्थित नाही. त्यामुळे या भागातून तालुक्याच्या ठिकाणी येणारी ग्रामीण जनता, शेतकरी, विद्यार्थी, रस्त्याावर, व्यापारी तसेच वेगवेगळ्या वाहनांची रस्त्याावर सतत रहदारी सुरू असते.
परंतु अपघाताला आव्हान देणाऱ्या या रस्त्याावरील प्रवास जिकिरीचा झाला.बस चालकाला तर मोठी कसरत करावी लागते.पायी चालणाऱ्यांना जीव मुठीत धरुन चालावे लागते. जिल्हा परिषद प्रशासन, तालुका स्तरावरील संबंधित यंत्रणा, स्थानिक पुढारी तसेच माजी व आजी पंचायत समिती, जिल्हा परिषद सदस्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन रस्त्याची तत्काळ दुरुस्ती केल्यास सर्वांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

